Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २२७ * * नागपूर * | रविवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## विकास आणि सुशासनाचा विजय

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २३ :**
भाजपला तिसऱ्यांदा जनादेश देणारे महाराष्ट्र हे सहावे राज्य असून, आमचे गव्हर्नन्स मॉडेल मान्य असल्याचा हा पुरावा आहे, महाराष्ट्रात विकास आणि सुशासनाचा विजय झाला, असे सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महायुतीच्या विजयावर आनंद व्यक्त केला.

.महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे निकाल आल्यानंतर भाजप मुख्यालयात पोहोचल्यानंतर मोदी बोलत होते. भाजप अध्यक्ष जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी त्यांचे स्वागत केले. खोटारडेपणा आणि फुटीरतावादी शक्तींचा पराभव झाला आहे. घराणेशाहीचाही पराभव झाला आहे, असेही मोदी यावेळी म्हणाले.

अग्राग्रलेख

**विशेष खरीखरी..**

# देवेंद्र फडणवीसच महाविजयाचे शिल्पकार

दोन महिन्यांपूर्वी दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल लागले. त्यात एका राज्यात भारतीय जनता पक्षाला विजय मिळाला तर दुस?या राज्यात इंडिया आघाडीने बाजी मारली. आज महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांच्या निवडणुकांचे निकाल लागले. यात महाराष्ट्रात भाजपा प्रणित महायुतीने महा-महापराक्रम करून इंडियाला म्हणजेच महाविकास आघाडीला अक्षरशः चिरडून टाकले आहे. या विजयामुळेच झारखंडचा विजय झाकोळला गेला.

आपल्या महाराष्ट्राची परिस्थिती पाहिली. तर भारतीय जनता पक्षाने दिलेल्या जाहिरातीत केवळ दोनच मोठे चेहरे होते. एक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आणि दुसरा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा म्हणजेच, ही निवडणूक या दोघांच्या प्रभावाभोवतीच फिरत होती. महाविकास आघाडीने उमेदवारांची नावे घोषित करताना हरियाणा सारखी चूक केली. निवडणुकीत अनेक ठिकाणी बदल हवा होता. पण तीच ती थोबाडे पुढे केली गेली. त्यामुळे काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात हे दोन दिवसांपूर्वीचे भावी असणारे मुख्यमंत्री पार रसातळाला गेले. हारलेल्यांना काय मारावे, या नात्याने विजयी झालेल्या महायुतीच्या देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय संयत प्रतिक्रिया दिली. ना शब्दात आक्रमण, ना वागण्यात अतिक्रमण, त्यांनी फक्त आपल्या मार्गक्रमणाची घोषणा केली. मागे म्हणजेच 2019 साली त्यांचा नारा होता 'मीच येणार' पण यावेळी तो नाराही त्यांनी बासनात गुंडाळून ठेवला.

आता विजयी झालेल्या तिन्ही पक्षांचे श्रेष्ठी मुख्यमंत्री ठरवतील आणि तिन्ही पक्ष त्याचे पालन करतील. असे त्यांनी जाहीर करून टाकले. गेल्यावेळी म्हणजे मध्यावधी सरकारच्या घोषणेनंतर दुपारपर्यंत फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील असे दिसत होते. पण दिसते तसे नसते, याची प्रचिती तेव्हाच आली आणि विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरी दिवाळी साजरी झाली. ना ना करत देवेंद्रजींनाही उपमुख्यमंत्री पद स्वीकारावे लागले. ते त्यांनी प्रभावीपणे राबवले. सर्वात मोठा पक्ष असूनही भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी व आमदारांनी संयम राखला. त्यामुळेच अत्यंत कौशल्याने लोकसभेच्या पराभवाचा विचार करून विधानसभेच्या महाविजयाचा पाया रचला.

लाडकी बहीण धावून आली. लाडके भाऊ सुद्धा मागे राहिले नाहीत आणि समाजातील सर्व घटकांना काही ना काही दिल्याने राजकारणाचे चित्र पालटले. भारतीय जनता पक्षाला व त्यांच्या इतर दोन सहकारी पक्षांना महाराष्ट्राच्या जनतेने झोळी भरभरून मते दिली. यावेळी अनेक अपक्ष आणि लहान पक्ष निवडून येतील. असा अंदाज अनेक निवडणूक पंडित पत्रकारांनी केला होता. पण मतदारांनी त्यांच्या पांडित्याला अशी काही ठोकर मारली की, त्यांचे पंडित्य मुंबईच्या महासागरात गडपच झाले. आजपर्यंत एखाद्या पक्ष समूहाला महाराष्ट्रात एवढे मोठे बहुमत मिळालेले नव्हते. यावेळी युती सरकारने ज्या ज्या घोषणा केल्या. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. लाडक्या बहिणीच्या खात्यात प्रत्येकी 7500 जमा करण्यात आले. विजेच्या बिलाची सवलत प्रत्यक्षात आणली गेली. इतरही ज्या ज्या घोषणा केल्या गेल्या. त्यांची तात्काळ अंमलबजावणी केली गेली. पद्धतशीर प्रचार यंत्रणा राबवली. महाराष्ट्राच्या लहान मोठ्या सर्व वृत्तपत्रांना आकर्षक जाहिराती देऊन आपले मुद्दे जनतेपर्यंत पोहोचविले. यात भारतीय जनता पक्षाबरोबर शिंदे यांच्या शिवसेनेचाही तेवढाच मोठा वाटा होता.

तिकडे काँग्रेसनेही फक्त काही वृत्तपत्रात जाहिराती देण्याचे कर्म केले. उद्धव ठाकरे यांनी तर आपल्या जाहिरातीत इतर दोन सहकारी पक्षांच्या निशाणीलाही स्थान दिले नव्हते. त्यामुळे त्यांच्या शिवसेनेचे 12 वाजणार, हे आम्ही यापूर्वीच नमूद केले होते आणि तसेच झाले. आघाडीच्या उमेदवारांविरुद्ध आघाडीचेच बंडखोर उभे होते. तसेच आघाडीची मते खाणारे अनेक उमेदवार सढळ खर्च करून उभे होते. हे सर्व प्रकार महाविकास आघाडीला कळलेच नाहीत. ते आपले स्वतःच्याच तोऱ्यात होते आणि महायुतीने खोऱ्याने मते मिळवली. महाविकास आघाडीला लोकसभेत जो प्रचंड विजय मिळाला. त्याच्या नशेत ही मंडळी एवढी बहकून गेली होती की, आपल्या पायाखालची वाळू घसरत आहे. युती आपले पाय पसरत आहे हे त्यांना कळलेच नाही.

पावसाळी छत्र्यांसारखी कधी इकडे तर कधी तिकडे, वळवळणाऱ्या मनसेला मतदारांनी पार खड्ड्यात टाकून दिले. आपल्याच तोऱ्यात वावरणाऱ्या वंचितलाही विजयापासून वंचितच ठेवले. अखिल महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याच्या नादात आपले बच्चू कडूही वाहवत गेले. त्यांचेही तोंड कडू झाले. इतर पालापाचोळ्या सारख्या पक्षांची तर पार दैना उडाली. जरांगे पाटील यांनी फोडलेल्या डरकाळ्या तर अशाच हवेत विरल्या. इतर अनेकांनी जे जे अंदाज वर्तवले होते. तेही खरे ठरले नाहीत.

आम्ही परवा म्हटल्याप्रमाणे एक्झिट पोल वाले बिलंदर वानरक्रीडा करून केवळ या झाडावरून त्या झाडावर उधळत राहिले. एकाचेही भाकित खरे ठरले नाही. ईव्हीएमचाही मुद्दा या महाविजयामुळे कोणालाही उगाळता येणार नाही. हा विजय निर्विवाद आहे. या विजयाचे शिल्पकार निश्चितपणे देवेंद्र फडणवीसच आहेत आणि तेच या महाराष्ट्राचे नेतृत्व करण्यास तत्पर व्हावेत. अशी जनतेची इच्छा आहे.

यावेळी तरी भाजप श्रेष्ठी त्यांच्या श्रमाचे चीज करतील, याची आम्हाला खात्री आहे. एकनाथ शिंदे यांच्या नावाला कात्री लावली तरी, त्यांनीही यावेळी जी भूमिका त्यांच्या काळात देवेंद्र फडणवीस यांनी भुषवली. ती त्यांना आता भूषवावी लागणार आहे. मुख्यमंत्री झाल्यावर मंत्रीपद स्वीकारणारे चव्हाण पिता-पुत्र आणि इतर अनेक उदाहरणे आपल्याला ठाऊक आहेतच.

अजितदादा हे तर पर्मनंट उपमुख्यमंत्री आहेतच. तेव्हा आता महाराष्ट्र सरकारचे हेच तीन चेहरे महाराष्ट्रावर राज्य करतील यात शंका नाही. एवढ्या कठीण काळातही उबाठा सेना आणि शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाने निदान पन्नाशी तरी पार केली. त्याबद्दल त्यांच्या आमदारांचेही अभिनंदन केले पाहिजे. आता येणाऱ्या नव्या सरकारला जय महाराष्ट्र करून, त्यांचेही अभिनंदन करूया!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महायुतीची त्सूनामी!



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :**
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाचे वादळ दिसून आले. २०१४ मध्ये मोदी लाटेत देखील एवढा मोठा विजय भाजपला मिळाला नव्हता. भाजप राज्यातील एकमेव सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. इतर कोणत्याही पक्षाला तीन अंकी संख्या गाठता आली नाही. त्यामुळे भाजपाच्या नेत्यांनी आता भाजपचाच मुख्यमंत्री होईल, असा दावा केला आहे.

महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल आता समोर येत आहे. सुरुवातीच्या कलानुसार भारतीय जनता पक्ष हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने बहुमताचा आकडा पार केला आहे. तर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष मिळून ५७ आमदारांच्या जवळपास संख्या आहे.

या निवडणुकीत महायुती विरूद्ध महाविकास आघाडी असा सरळ मुकाबला होता. दोन्ही गटांकडून विजय आणि बहुमताचे दावे करण्यात येत होते. दरम्यान, शनिवारी सकाळी मतमोजणीला सुरूवात झाल्यानंतर एक तासापर्यंत महायुती आणि आघाडी एकसारखे धावताना दिसले. मात्र, काही वेळातच निकालाचे चित्र पालटले आणि महायुतीने दणदणीत विजय मिळवला. निकालानंतर महाविकास आघाडीचा पुरता सफाया झाल्याचे दिसून आले.

भाजपा, शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी यांच्या महायुतीने सव्वा दोनशे जागांवर विजय मिळविला असून, १० जागांवर अपक्ष आणि बंडखोर विजयी झालेत. आघाडी मात्र ५० च्या आसपास घुटमळताना दिसली. काँग्रेस, उबाठा आणि शरद पवार राष्ट्रवादीला मोठे नुकसान सहन करावे लागले आहे.

■ **भाजपा सर्वात मोठा पक्ष**
■ **आघाडीचा सुपडासाफ**
■ **अनेक दिग्गजांचा पराभव**

### आधुनिक अभिमन्यू झालो...

विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. महायुतीने २२५ जागांवर आघाडी मिळवली आहे. तर महाविकास आघाडीला केवळ ५६ जागांवर आघाडी मिळवली आहे. या निकालानंतर देवेंद्र फडणवीसांनी प्रतिक्रिया देताना आपण महाराष्ट्रातील जनतेपुढे नतमस्तक होत असल्याचे म्हटलं. त्यांनी लाडक्या बहिणींचेही आभार मानले. आम्ही आधुनिक अभिमन्यू असून चक्रव्यूह भेदले, असेही ते म्हणाले.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने बहुमतापेक्षा जास्त जागा मिळवल्या आहेत.भाजपने जवळपास १३० जागा जिंकल्या असून ५४ जागा या शिवसेना शिंदे गटाने जिंकल्या आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत जो फेक नरेटीव्ह तयार करण्यात आला होता. त्या फेक नरेटीव्हच्या विरोधात लढणाऱ्या सर्व संघटनांचा हा विजय आहे. महाराष्ट्रात लोकांमध्ये जनजागृती करणाऱ्या सर्वांचा हा विजय असल्याचे फडणवीस म्हणाले.

विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे कल स्पष्ट होतात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर भाजपा नेत्यांच्या रांगा लागल्या. भाजपा नेते प्रवीण दरेकर यांनी देवेंद्र फडणवीस हेच पुढचे मुख्यमंत्री असतील, असा दावा केला आहे.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे. माझ्या लाडकी बहिणींचे मनापासून अभिनंदन करतो. आम्ही केलेल्या विकासकामांची जनतेला पोचपावती मिळाली, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांना दिली. या विजयामुळे पुढील काळात आमची जबाबदारी वाढली आहे. जनतेला त्रिवार वंदन करतो. महायुतीला आशीर्वाद दिल्याबद्दल जनतेचे आभार मानतो. समाजातील प्रत?क घटकाचे अभिनंदन करतो. महायुतीच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

## निकाल अनाकलनीय



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :**
राज्यातील निकाल हा अनपेक्षीत आणि अनाकलनीय आहे. या निकालाची अपेक्षाच नव्हती. ही लाट नाही तर त्सुनामीच असल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे. ज्यांनी ज्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार केला, त्या सर्वांचे मी आभार मानत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील एकूण आकडेवारी पाहिल्यानंतर या सरकारला एखादा बिल अधिवेशनात मंजुरीसाठी मांडण्याची आवश्यकताच नसल्याचे दिसत आहे. विरोधी पक्षाच ठेवायचा नाही, असे चित्र भाजपने महाराष्ट्रात ठेवल्याचे ठाकरे म्हणाले. जनतेने महायुतीला मतदान का केले? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. राज्यात सोयाबीनला भाव मिळत नाही, म्हणून महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला मते दिली का? की इतर कोणत्या रागापोटी मते दिली, हे कळत नसल्याचे ते म्हणाले.

## काँग्रेसच्या बड्या नेत्यांना पराभवाचा मोठा धक्का

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :**
विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा पार सुपडासाफ झाला असून, त्यांच्या अनेक नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा सलग ८ वेळा आमदार राहिलेले बाळासाहेब थोरात यांचा यावेळी पराभव झाला आहे . हा निकाल अनपेक्षित मानला जातो. काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनाही पराभवाचा सामना करावा लागला आहे. काँग्रेसच्या तिवसा येथील आमदार यशोमती ठाकूर, माजी मंत्री माणिकराव ठाकरे अशा काँग्रेसच्या दिग्गजांना मतदारांनी धक्का दिला आहे. राज्यात आमचीच सत्ता येईल, असा दावा करणारे दिग्गज नेते स्वतःचाच मतदार संघ वाचवू शकले नाहीत.

## आधी पक्षांतर्गत नेत्याची निवड..

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २३ :**
विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला कौल दिला असून, आम्ही चक्रव्युव्ह भेदले आहे . आता महायुतीमधील पक्षांची अंतर्गत बैठक घेतली जाईल, तेथे चर्चेनंतर मुख्यमंत्री पदाचा निर्णय घेऊ, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. महायुतीच्या विजयानंतर तिन्ही पक्षाच्या नेत्यांनी घेतलेल्या एकत्र पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

विधानसभेत महायुतीचा ऐतिहासिक विजय झाला आहे. आतापर्यंतच्या अनेक वर्षांचा निवडणुका आपण पाहिल्या मात्र अशा पद्धतीने लोकांनी हातात घेतलेली निवडणूक आपण पाहिली नसल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. या ऐतिहासिक विषयासाठी सर्वांना दंडवत घातला पाहिजे, अशा शब्दात मतदारांचे आभार देखील शिंदे यांनी मानले. महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत राज्यातील जनतेचे अभार मानले.

महाराष्ट्राच्या जनतेसमोर महायुती नतमस्तक असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. महायुतीवर महाराष्ट्राने दाखवलेला हा विश्वास आहे. आम्हाला आता मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात काम करावे लागणार असल्याची जाणीव होत असल्याचे फडणवीस म्हणाले.



# हा महायुतीच्या एकजुटीचा विजय

## आम्ही विरोधकांचा चक्रव्यूह यशस्वीपणे भेदून दाखवला : देवेंद्र फडणवीस



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :
आजच्या विजयाने संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे असल्याचे स्पष्ट झाले. मतदारांनी मोदींचा एक है तो सेफ है चा नारा यशस्वी केला. हा महायुतीच्या एकजुटीचा विजय असून, आम्ही महाराष्ट्राच्या जनतेपुढे नतमस्तक आहोत, अशा शब्दांत भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या दैदिप्यमान विजयावर प्रतिक्रिया दिली आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत भाजप प्रणित महायुतीचा मोठा विजय झाला आहे. आतापर्यंतच्या मतमोजणीत महायुतीने सर्वाधिक 225 जागांवर आघाडी घेतली आहे. तर महाविकास आघाडी अवघ्या 50 जागांवर आघाडीवर आहे. देवेंद्र फडणवीस यांनी या विजयावर आनंद व्यक्त करताना हा महायुतीच्या एकजुटीचा विजय असल्याची भावना व्यक्त केली आहे.

देवेंद्र फडणवीस दुपारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आजच्या विजयामुळे संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे असल्याचे स्पष्ट झाले. मोदींनी दिलेला एक है तो सेफ है चा नारा मतदारांनी यशस्वी केला. सर्वांनी एकत्रित मतदान केले. आम्ही आमच्या लाडक्या बहिणींचे विशेष आभार मानतो. त्यांनी आम्हाला मोठा आशीर्वाद दिला.

विरोधकांनी राज्यात फेक नरेटिव्ह तयार केला होता. या नरेटिव्हचा यशस्वी सामना करणाऱ्या आमच्या राष्ट्रीय विचारांच्या विविध संघटनांचा हा विजय आहे. महाविकास आघाडीने महाराष्ट्रात मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला, पण याविरोधात आमच्या विविध पंथांच्या संतांनी जनजागृती केली. हा त्यांचा विजय आहे. खेड्यापाड्यात गावोगावी जाऊन पक्षासाठी घाम गाळणाऱ्या आमच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा हा विजय आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिपाइं नेते रामदास आठवले यांच्यासह सर्वच नेत्यांच्या एकजुटीचा हा विजय आहे. या विजयामध्ये सर्वांचा हातभार आहे. महाराष्ट्राच्या जनतेपुढे आम्ही नतमस्तक आहोत. याहून जास्त काही बोलताच येत नाही. हे प्रेम देणाऱ्या जनतेपुढे आम्ही अक्षरशः साष्टांग दंडवत घालतो. राज्यात झालेल्या विखारी प्रचाराला महाराष्ट्राच्या जनतेने आपल्या कृतीतून उत्तर दिले आहे. आम्ही आधुनिक अभिमन्यू आहोत. आम्ही विरोधकांचा चक्रव्यूह यशस्वीपणे भेदून दाखवला आहे. आज संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान मोदींच्या पाठिशी असल्याचे सिद्ध झाले आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

कोणत्याही लोकशाहीमध्ये एक चांगला विरोधी पक्ष असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे विरोधी पक्षांच्या निवडून येणाऱ्या आमदारांचा आम्ही सन्मान करू. त्यांचा आवाज छोटा असो की मोठा असो ते ज्या योग्य गोष्टी सांगतील, त्यांना आम्ही प्रतिसाद देऊ, असे फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विरोधकांनी ईव्हीएमवर व्यक्त केलेला संशयही फेटाळला. झारखंडमध्ये झामुमोचा विजय झाला. विरोधक तिथे लोकशाहीचा विजय झाल्याचा दावा करतात. पण महाराष्ट्रात पराभव झाल्यानंतर लोकशाही संकटात सापडली आहे, ईव्हीएमशी छेडछाड झाली आहे असे आरोप सुरू आहेत. विरोधकांनी आता आत्मचिंतन करावे. मी त्यांना सल्ला देणार नाही. मी फार छोटा व्यक्ती आहे. पण कधीतरी खरी कारणे काय आहेत याचा विचार करावा लागेल, असे ते म्हणाले.

या निवडणुकीत काँग्रेसच्या बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारख्या बड्या नेत्यांचा पराभव झाला. देवेंद्र फडणवीस यांनी यावरही भाष्य केले. लोकशाहीची हीच खरी गमंत आहे. लोकशाहीमध्ये जनता कुणाला डोक्यावर घेईल व कुणाला पाडेल हे सांगता येत नाही. या निवडणुकीने हे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे, असे ते म्हणाले.

### मुख्यमंत्री कोण होणार?

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मुख्यमंत्रपदाच्या उमेदवारावरही भाष्य केले. आमच्यात मुख्यमंत्रीपदावर कोणताही वाद होणार नाही. अमित शहा यांनी पत्रकार परिषदेत स्पष्टपणे सांगितले आहे. मुख्यमंत्रीपद हे कोणत्याही निकषावर नाही. मुख्यमंत्रीपदाचा निर्णय तिन्ही पक्षांचे नेते एकत्र येऊन घेतील. या प्रकरणी एकनाथ शिंदे, अजित पवार व आमच्या पक्षाचे नेते जे काही निर्णय घेतील ते आम्हाला मान्य असेल, असे ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मराठा आरक्षणाच्या आंदोलनानंतरही विदर्भ व मराठवाड्यात भाजपला मिळालेल्या यशावरही भाष्य केले. ते म्हणाले, माज्या मते तुम्ही वारंवार एक व्यक्ती व एका पक्षाला टार्गेट करता, त्यातून तुमची हवा निघून जाते, त्याची तीव्रता कमी होते व लोकांना त्याचे सत्य समजते. त्यानंतर लोकांच्या मनात त्याची सहानुभूती निर्माण होते. या निवडणुकीत हेच सिद्ध झाले, असे ते म्हणाले.

# सुधीर मुनगंटीवार सलग सातव्यांदा विजयी



■ महासागर प्रतिनिधी,
चंद्रपूर, दि. २३ :
बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात भाजपा महायुतीचे उमेदवार, वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी २६ हजार मतांची आघाडी घेत दणदणीत विजय संपादन केला असून ते सातव्यांदा विधानसभेत पोहोचले आहे. सातव्यांदा विधानसभेत निवडून जाणारे ते एकमेव उमेदवार आहे.

१९९५ मध्ये तत्कालीन चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातुन ५५ हजाराच्या वर मताधिक्य घेत विदभार्तून सर्वाधिक मतांनी निवडून येण्याचा बहुमान त्यांनी पटकाविला.

त्यानंतर १९९९, २००४ पर्यंत सलग ते चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातून निवडून गेले व विजयाची हॅट्रिक त्यांनी केली.

त्यानंतर मतदार संघ पुनर्रचनेनंतर त्यांनी शेजारच्या बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातुन निवडणूक लढली. या विधानसभा क्षेत्रातुन देखील त्यांनी विजयाची हॅट्रिक साधली.

२००९, २०१४, २०१९ मध्ये मताधिक्याने निवडणूका त्यांनी जिंकल्या. २०१४ मध्ये राज्याच्या अर्थ व वनमंत्री पदाची धुरा त्यांनी सांभाळली. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यावर वने, सांस्कृतिक आणि मत्स्यव्यवसाय या खात्यांचे ते मंत्री ते झाले.

### अमरावती जिल्ह्यात दिग्गजांना पराभवाचा धक्का

# भाजप सर्वात मोठा पक्ष





■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २३ :
लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या विजयानंतर कार्यकर्त्यांमध्ये संचारलेल्या उत्साहावर विधानसभा निवडणुकीच्या निकालाने विरजण पडले आहे. माजी मंत्री यशोमती ठाकूर, डॉ. सुनील देशमुख यांच्यासह राज्यात परिवर्तन महाशक्ती ही तिसरी आघाडी उभारणाऱ्या बच्चू कडू यांना पराभवाचा हादरा बसला आहे. भाजपने गेल्या निवडणुकीत मिळालेल्या एका जागेवरून पाच जागांवर झेप घेतली आहे. काँग्रेसला एकही जागा मिळू शकली नाही. महायुतीने चांगली कामगिरी करताना आठपैकी सात जागा पटकावल्या आहेत. एक जागा शिवसेना उद्धव ठाकरे गटाला मिळाली आहे.

अचलपूरचे प्रहार जनशक्ती पक्षाचे बच्चू कडू यांचा भाजपचे नवखे उमेदवार प्रवीण तायडे यांनी १२ हजार १३१ मतांनी पराभव केला. बच्चू कडू यांना ६६ हजार ७० तर काँग्रेसचे बबलू देशमुख यांना ६२ हजार ७९१ मते मिळाली. अमरावतीत अनपेक्षितपणे झालेल्या चौरंगी लढतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) सुलभा खोडके यांनी ५ हजार ४१३ मतांनी बाजी मारली. सुलभा खोडके यांना ६० हजार ८७, तर काँग्रेसचे डॉ. सुनील देशमुख यांना ५४ हजार ६७४ मते मिळाली. आझाद समाज पक्षाचे अलीम पटेल यांना ५४ हजार ५९१ तर भाजपचे बंडखोर उमेदवार जगदीश गुप्ता यांना ३४ हजार ६७ मते प्राप्त झाली. बडनेरामधून युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा हे सुमारे ६६ हजार ३९७ मताधिक्याने निवडून आले. त्यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या बंडखोर उमेदवार प्रीती बंड यांचा पराभव केला. राणा यांना १ लाख २६ हजार ४९६, प्रीती बंड यांना ६० हजार ९९, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे सुनील खराटे यांना ६ हजार ७४४ तर भाजपचे बंडखोर उमेदवार तुषार भारतीय यांना ३ हजार २४२ मते मिळाली.

मेळघाटमधून भाजपचे केवलराम काळे सर्वाधिक १ लाख ६ हजार ८५९ इतक्या मताधिक्याने निवडून आले. त्यांनी काँग्रेसचे डॉ. हेमंत चिमोटे यांचा पराभव केला. काळे यांना १ लाख ४५ हजार ९७८ तर चिमोटे यांना ३९ हजार ११९ मते मिळाली. प्रहारचे राजकुमार पटेल यांना तिसरे स्थान ( २५ हजार २८१ मते) मिळाले. तिवसामध्ये काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांचा भाजपचे राजेश वानखडे यांनी ७ हजार ६१६ मतांनी धक्कादायक पराभव केला. वानखडे यांना ९९ हजार ६६४ तर ठाकूर यांना ९२ हजार ४७ मते प्राप्त झाली.

दर्यापुरातून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे गजानन लवटे हे निवडून आले. त्यांनी युवा स्वाभिमान पक्षाचे रमेश बुंदिले यांचा १९ हजार ७०९ मतांनी पराभव केला. लवटे यांना ८७ हजार ७४९ तर बुंदिले यांना ६८ हजार ४० मते मिळाली. शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे अभिजीत अडसूळ यांना केवळ २३ हजार ६३२ मते प्राप्त झाली. मोशीर्तून भाजपचे उमेश यावलकर हे ६४ हजार ९८८ मतांनी निवडून आले. या ठिकाणी चौरंगी लढत झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे देवेंद्र भुयार यांना ३४ हजार ६९५, काँग्रेसच्या शरद पवार गटाचे गिरीश कराळे यांना ३१ हजार ८४३ मते प्राप्त झाली. धामणगावमध्ये १९ व्या फेरीअखेर भाजपचे प्रताप अडसड हे १२ हजार ८६४ मतांनी आघाडीवर आहेत.

# आदित्य ठाकरे यांचा वरळीत विजय

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :
आदित्य ठाकरे यांचा वरळी मतदारसंघातून विजय झाला आहे. त्यांना जवळपास 61 हजार मते मिळाली आहेत. तर शिंदे गटाचे उमेदवार मिलिंद देवरा यांना 52198 मते मिळाली आहे. या मतदारसंघात संदीप देशपांडे यांना देखील मनसेने उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, त्यांना केवळ 18 हजार मते मिळाली आहेत. आदित्य ठाकरे काही दिवसांपूर्वी म्हणाले होते की, हा लढा कोणत्याही वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी नाही. हा महाराष्ट्राचा लढा आहे. आम्ही स्वार्थी नाही. लुटमारीची राजवट हटवायची आहे, असा निर्धार महाराष्ट्रातील जनतेने केला आहे. महाराष्ट्राचे हे गद्दार सरकार चुकून स्थापन झाले आहे.

शिंदे गटाचे मिलिंद देवरा दिव्य मराठीशी बोलताना काही दिवसांपूर्वी म्हणाले होते की, हा माझा वैयक्तिक लढा नाही. आदित्य ठाकरे यांना मी खूप दिवसांपासून ओळखतो. मुंबई आणि महाराष्ट्रातील जनतेला त्यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या, पण आता जनता 'स्पीड ब्रेकर पॉलिटिक्स'ला कंटाळली आहे. जनतेला महाराष्ट्राचा विकास हवा आहे.

# फडणवीसांवर टीका करणाऱ्यांना स्वतःची औकात कळली असेल : नारायण राणे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :
मी आधीपासून सांगत होती की उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे 20 च्या पुढे आमदार निवडून येणार नाही. त्यांचे 19 उमेदवार आघाडीवर आहेत. त्यांचा सुपडा साफ झाला आहे. त्यांनी आता मला महाराष्ट्रात तोंड दाखवू नये, अन् संजय राऊत यांना समोर आणू नये असे म्हणत नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे.



नारायण राणे पुढे बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांच्यावर ज्यांनी टीका केली त्यांना त्यांची औकात कळाली आहे. महायुतीची सत्ता आल्याने मी खूप खूश आहे. गेल्या 72 वर्षांमध्ये असा आनंद मला झाला नव्हता तो आता झाला.

नारायण राणे म्हणाले की, उद्धव ठाकरे पूर्ण संपले आहे. त्यांना आज दुःख झाले आहे. म्हणून त्यांच्यावर टीका करत अजून दुःख देऊ नये असे मला वाटते. बाळासाहेब ठाकरेंनी पक्ष सत्तेवर आणला होता, यांनी पक्ष धुळीस मिळवला असा टोला राणेंनी लगावला आहे.

नारायण राणे म्हणाले की, संजय राऊत यांच्यावर न बोललेले बरं, शिवसेना जी संपली उद्धव ठाकरेंची झालेली अवस्था ह्यासाठी केवळ राऊत यांच्यामुळेच झाली आहे. जनता माज्या बाजूने होती, मी दोन्ही मुलांना नाहीतर केसरकरांनाही निवडून आणले.

माज्या मतदारसंघातील 6 पैकी 6 मतदारसंघात आमचे उमेदवार विजयी झाले आहेत. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस, आणि एकनाथ शिंदे यांचे आभार मानतो, असे भाजपचे नेते नारायण राणे यांनी म्हटले आहे.

नीतेश अन् नीलेश राणे यांना तिकीट दिली आणि योग्य नियोजन करत आशिर्वाद दिला, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, असे त्यांनी म्हटले आहे.

# ५० पैकी एकही पडला, तर गावाकडे शेती करेन : एकनाथ शिंदे

## शिवसेनेची ५५ जागांवर आघाडी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकालाचे कल समोर येत असून महायुतीला 200 पेक्षा अधिक जागांवर बहुमत मिळताना दिसत आहे. या सर्व धामधुमीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा एक जुना व्हिडिओ व्हायरल आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी सभागृहात बोलताना मोठा दावा केला होता. 50 मधला एकही माणूस पडू देणार नाही, भाजपच्या 115 लोकांसोबत मिळून 200 आकडा पार करणार, असे एकनाथ शिंदे म्हणाले होते. आता येत असलेले निकाल पाहता एकनाथा शिंदे यांनी आपला शब्द खरा करून दाखवला.

एकनाथ शिंदे यांनी जून 2022 मध्ये शिवसेनेत बंडखोरी केली होती. ते शिवसेना आणि अपक्ष असे 50 आमदार सोबत घेऊन बाहेर पडले होते. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे सरकार पडले होते. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर भाजपसोबत सत्ता स्थापन केली होती. उद्धव ठाकरे यांच्याकडील धनुष्यबाण हे चिन्हही निवडणूक आयोगाने त्यांना दिले होते. विधानसभा निवडणुकीत बंडखोरांमधील एकही आमदार निवडून येणार नाही, असा दावा शिवसेनेच्या नेत्यांकडून केला जात होता. पण हा दावा आता फोल होताना दिसत आहे.



त्यावेळी झालेल्या विधानसभेच्या अधिवेशनात मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी आपले पहिले भाषण केले होते. आमचा 50 मधला एकही आमदार आम्ही पडू देणार नाही. तसेच भाजपचेही 115 आमदार मिळून आम्ही 200 चा आकडा पार करू. हा सभागृहात शब्द आहे आणि तसे नाही केले, तर गावाला शेती करायला जाईन, असे एकनाथ शिंदे म्हणाले होते. आता शिंदेंच्या शिवसेनेने 55 जागांवर आघाडी घेत आपला स्ट्राईक रेट वाढविला आहे. तसेच महायुतीचा आकडा 220 पेक्षा अधिक होताना दिसत आहे.

# कोपरी पाचपाखाडीतुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विजयी

■ महासागर प्रतिनिधी,
ठाणे, दि. २३ :
कोपरी - पाचपाखाडी विधानसभा मतदार संघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे १ लाख ५९ हजार ६० मतांनी विजयी झाले आहेत. एकनाथ शिंदे हे पहिल्या फेरी पासून मोठ्या फरकाने आघाडीवर असल्याचे कळताच त्यांच्या कार्यकर्त्यांनी शिंदे यांच्या निवासस्थाना बाहेर फटाके फोडून जल्लोष करायला सुरुवात केली होती. एकनाथ शिंदे यांना १ लाख २० हजार ७१७ इतकी आघाडी मिळाली आहे.

कोपरी - पाचपाखडी विधानसभा मतदार संघातून दिवंगत धर्मवीर आनंद दिघे यांचे शिष्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांची महत्वाची लढत मानली जात होती. प्रचारा दरम्यान, धर्मवीर आनंद दिघे आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे वारसदार, लाडकी बहिण योजना, शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या योजना, महिला सशक्तीकरण, युवांसाठी योजना, वीज सवलत असे मुद्दे एकनाथ शिंदे यांच्या प्रचारात मांडण्यात आले होते.

तर, गद्दार विरुद्ध निष्ठावंत, रक्ताचे आणि खरे वारसदार, वाढलेली महागाई, गॅस सिलेंडरच्या दरात झालेली वाढ, रोजगार, गुजरातला गेलेले प्रकल्प, वाहतूक कोंडी, पाणी टंचाईची समस्या, जाती-धमार्चे राजकारण, असे मुद्दे केदार दिघे यांच्या प्रचारात होते. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे आणि केदार दिघे यांच्यात चूरशीची लढत होईल असा अंदाज वर्तविण्यात येत होता. परंतु, मतमोजणीच्या पहिल्याच फेरीत मुख्यमंत्री शिंदे यांना मोठ्या फरकाने आघाडी मिळाल्यामुळे शिंदे यांचा विजय निश्चित असे चित्र स्पष्ट झाले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी देखील शिंदे यांच्या घराबाहेर जल्लोष करण्यास सुरुवात केली होती.

# छगन भुजबळ यांचा येवल्यातून विजय



■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. २३ :
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ हे येवल्यातून विजयी झाले आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधानंतरही त्यांनी आपला गड राखला आहे. शरद पवार गटाचे उमेदवार माणिकराव शिंदे यांचा जवळपास 27 हजार मतांनी पराभव केला आहे.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड झाले यावेळी छगन भुजबळ यांनी अजित पवार यांना साथ दिली. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाला विरोधकेल्यानंतर भुजबळांना विरोध केला होता. पण शरद पवारांनी विरोधात उमेदवार देऊनही भुजबळ विजयी झाले.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू असून महायुती पुन्हा एकदा विजयाच्या दिशेने वाटचाल करताना दिसत आहे. या निकालावर प्रतिक्रिया देताना भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी उद्धव ठाकरे यांच्याबाबत मोठे विधान केले आहे. उद्धव ठाकरे आमच्यासोबत आल्यास त्यांचे स्वागत आहे, असे वक्तव्य चंद्रकांत पाटील यांनी केले. त्यामुळे उद्धव ठाकरे पुन्हा महायुतीकडे जातील का हे पहावे लागणार आहे. ते कोथरूडमध्ये पत्रकारांशी बोलत होते.

चंद्रकात पाटील यांना उद्धव ठाकरे हे पुन्हा महायुतीच्या सोबत आल्यास तुमची काय भूमिका असेल? असे विचारण्यात आले असता त्यावर बोलताना ते म्हणाले, उद्धव ठाकरे हे आमच्यासोबत आल्यास त्यांचे स्वागत आहे. आता महायुतीला पूर्ण बहुमत मिळताना दिसत आहे. काही अपक्षांची साथही मिळणार आहे. अशा परिस्थिती महायुतीकडून उद्धवजींना आमंत्रण दिले जाण्याची शक्यता नाही.

# नैसर्गिक युती तोडल्याचा जनतेच्या मनात राग : विनोद तावडे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल समोर येत असून महायुतीला बहुमत मिळताना दिसत आहे. निकालाच्या या कलांवर अनेक राजकीय नेत्यांचा प्रतिक्रिया येत आहेत. विनोद तावडे यांनी प्रतिक्रिया देत महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले. तसेच भाजप-शिवसेनेची नैसर्गिक युती तोडल्याचा राग जनतेच्या मनात होता. त्यामुळे एकनाथ शिंदे यांना बाळासाहेबांच्या विचारांची मते मिळाली, असे विनोद तावडे म्हणाले.



विनोद तावडे म्हणाले, महायुतीला प्रचंड दिला, त्याबद्दल महाराष्ट्रातील जनतेचे मनापासून मानतो, धन्यवाद देतो. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि रामदास आठवले या सगळ्यांनी एकत्रित काम केले. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, रस्ते, पाणी, वीज, मेट्रो, वंदे भारत असे अप्रत्यक्ष लाभाचे राजकारण आणि लाडकी बहीण, शेतकरी सम्मान निधी, शून्य वीज बील असे प्रत्यक्ष लाभाचे राजकारण या दोन्हीचा बॅलेन्स देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी केल्यामुळे जनतेचा त्यांच्यावर विश्वास बसला.

### मुख्यमंत्रीपदाबाबत सगळे मिळून निर्णय घेतील

मुख्यमंत्री पदाबाबत बोलताना विनोद तावडे म्हणाले की, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि भाजपचे केंद्रीय नेतृत्व याबाबतचा निर्णय घेतील. आज महायुती म्हणून आम्ही विजयाचा आनंद घेतोय, असे ते म्हणाले.

भाजप-शिवसेनेची नैसर्गिक युती शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी 2019 मध्ये तोडली. त्याचा वेगळा राग मतदारांच्या मनात होता, असे विनोद तावडे म्हणाले. रोज सकाळी राज्याचे वातावरण कलुशित होणारे वक्तव्य भांडूपवरून यायचे, अशी टीका संजय राऊत यांच्यावर केली. एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांचे हिंदुत्वाचे धनुष्यबाण आणि हिंदुत्वाचे शिवसेना नाव हे हिंदुत्वाच्या मूळ प्रवाहात भाजपबरोबर आणल्यामुळे एकनाथ शिंदे यांना बाळासाहेबांच्या विचारांची मते मिळाली.

महाराष्ट्रातील हा विजय, बिहार पोटनिवडणुकीत 4 जागांवर, उत्तर प्रदेशमध्ये 9 पैकी 6 जागांवर भाजप तसेच राजस्थानमध्ये 4 जागांवर भाजप पुढे आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीएवर जनतेने विश्वास दाखवला आहे, असे विनोद तावडे म्हणाले.

# वरुण सरदेसाई ११३६५ मतांनी विजयी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :



मातोश्रीच्या अंगणात अर्थात वांद्रे पूर्व विधानसभा मतदारसंघातील तिरंगी आणि अतितटीच्या लढाईत अखेर शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) उमेदवाराने वरुण सरदेसाई यांनी अखेर बाजी मारली. राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) झिशान सिद्दिकी यांचा सरदेसाई यांनी ११ हजार ३६५ मतांनी पराभव केला. एक्झीट पोलमध्ये वांद्रे पूर्व मतदारसंघात शिवसेनेचा (एकनाथ शिंदे) विजय होईल, असा दावा करण्यात आला होता. मात्र हा दावा खोटे ठरवत पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या सरदेसाई यांनी विजय मिळवला. विधानसभेच्या २०१९ मधील निवडणुकीतील शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) विश्वनाथ महाडेश्वर यांच्या पराभवाचा वचपा यावेळी काढला.

वांद्रे पूर्व मतादार संघ शिवसेनेचा गड मानला जातो. विधानसभेच्या २००९, २०१४ मधील निवडणुकांमध्ये या मतदारसंघातून शिवसेनेचे बाळा सावंत विजयी झाले होते. मात्र २०१५ मध्ये बाळा सावंत यांचे निधन झाले. यानंतर झालेल्या पोटनिडणुकीत बाळा सावंत यांच्या पत्नी तृप्ती सावंत या विजयी झाल्या होत्या. पण त्यानंतर २०१९ मध्ये मात्र शिवसेनेने तृप्ती सावंतऐवजी विश्वनाथ महाडेश्वर यांना उमेदवारी दिल्याने नाराज तृप्ती सावंत यांनी बंडखोरी केली. बंडखोरीचा परिणाम म्हणून महाडेश्वर यांचा पराभव झाला.

# आधुनिक तंत्रज्ञानाने शेती समृदध होईल : नितीन गडकरी

## ऊस उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञान विषयावरील कार्यशाळा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
ऊस उत्पादन वाढीसाठी शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग केला तर एकरी उत्पादन वाढवू शकते आणि उत्पादन खर्च कमी होऊ शकतो. विदर्भाचा विकास करायचा असेल तर शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर वाढवावा लागेल, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. पीडीकेव्ही, दाभा येथील मैदानात सुरू असलेल्या अॅग्रोव्हिजनमध्ये दुसऱ्या दिवशी ऊस उत्पादनवाढीसाठी तंत्रज्ञान विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. रमेश हापसे, वर्मा, अजय झाडे, आनंदराव राऊत, अनिलजी मेंढे, फुलके, पद्माकर वैद्य, अनिल भुजाडे, छाया जोशी, सय्यद, जांभुळकर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक आनंदराव राऊत यांनी केले. ऊसाचे पैसे ताबडतोब मिळावे अशी शेतकऱ्यांची मागणी असते. परंतु, तयार साखर लगेच विकली जात नसल्याने पैसे मिळायला उशीर होतो. इथेनॉल आणि अल्कोहोल तयार करीत असल्याने यातून येणारे पैसे देता येतात. बांबू, ऊसाचे फड यांच्यापासून ऑर्गेनिक कार्बन तयार करता येतो. विदर्भामध्ये ऊस उत्पादन वाढविणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. यावेळी नितीन गडकरी यांच्या हस्ते कृषी कल्याण या मासिकाचे विमोचन करण्यात आले. तसेच उत्कृष्ट ऊस उत्पादकांचा सत्कार करण्यात आला. डॉ. रमेश हापसे यांनी ऊस उत्पादन वाढ व खोडवा उत्पादन यावर तांत्रिक मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन जयंत ढगे यांनी, तर आभारप्रदर्शन अनिल मेंढे यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

**माहिती तंत्रज्ञानाचा शेतीतील वापर या विषयावर चर्चासत्र**

तंत्रज्ञान, कच्च्या मालाची उपलब्धता, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि बाजाराची मागणी पूर्ण करणाऱ्या उत्पादनाची देशाला अधिक गरज असल्याचे मत अॅग्रोव्हिजनचे प्रवर्तक व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. सकाळच्या सत्रात सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया (एसटीपीआय), नागपूरच्या सहकार्याने माहिती तंत्रज्ञानाचा शेतीतील वापर या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात नितीन गडकरी ते बोलत होते. चर्चासत्रात कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चर इंजिनियरींगचे अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाच्या फार्म स्ट्रक्चर विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सुचिता गुप्ता, एसटीपीआय पुणेचे अतिरिक्त संचालक सचिन पुणाळे, नागपूर केंद्राचे अतिरिक्त संचालक संजय दरणे, फसलचे सीईओ प्रा. प्रशांत खांडे, डिजीक्रॉपचे संस्थापक धनंजय झिंगे व कृषीगतीचे संस्थापक तुकाराम सोनवणे यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला मध्य प्रदेशचे अन्न प्रक्रिया मंत्री नारायण सिंग कुशवाह व प्रधान सचिव कृषी विभाग अनुपम रंजन यांनीदेखील हजेरी लावली.

मिलिंद कापजे यांच्या हस्ते सर्वांचा सत्कार करण्यात आला. नितीन गडकरी म्हणाले, परदेशात कृषीला लागणारी छोटी छोटी उपकरणे मोठ्या प्रमाणात तयार केली जातात. तशीच उत्पादने आपल्या तरुण पिढीने संशोधित करून तयार केल्यास त्यांना चांगली मागणी आहे. भौगोलिक परिस्थितीनुसार उत्पादने तयार केल्यास ती जास्त उपयोगी ठरतील, असे ते म्हणाले.

अॅग्रोटेकशी संबंधित संघटना तयार करावी, अॅग्रोव्हिजन त्या शक्य ती सर्व मदत करेल, असेही ते म्हणाले. डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी पीडीकेव्हीमध्ये असलेल्या तीन इन्क्युबेशन सेंटरची माहिती दिली. व्हर्टीकल फार्मिंगसाठी लॅब, पॉलिहाऊसेस, संशोधन, स्टार्टअप्सला मेंटरशिप उपलब्ध करून दिली जाते, असे ते म्हणाले. प्रा. डॉ. सुचिता गुप्ता यांनी पर्यावरणातील बदलांमुळे प्रोटेक्टेड स्ट्रक्चर काळाची गरज झाली असून तरुण पिढीला आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कृषीशी जोडले जाऊ शकते. कृषी क्षेत्रातही उत्तम तंत्रज्ञ तयार होऊ शकतात, असे त्या म्हणाल्या.

सचिन पुणाळे यांनी आयटी, आयटीजचा कृषी क्षेत्रात वापर करून शेतकऱ्यांसाठी उत्पादकता वाढवण्यासाठी मदत करू शकतात असे सांगितले. तर संजय दरणे व डॉ. प्रशांत खोंड यांनी नागपूर व पुण्याच्या एसटीपीआयच्या कार्याची माहिती दिली.

धनंजय झिंगे यांनी त्यांचे डिजीक्रॉप स्टार्टअप शेतकरी व ग्राहकांना जोडण्याचे काम करीत असल्याचे सांगितले. कृषीगती स्टार्टअपच्या जन्माची कहाणी तुकाराम सोनवणे यांनी सांगितले. मोहन राव यांनी परिचय करून दिला तर या सत्राची सुत्रे अमीत कुरील यांनी सांभाळली.

# कृष्णा खोपडे चौथ्यांदा विजयी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :



पूर्व नागपुरातील मतदारांनी चौफेर विकासाला भरभरुन मतदान केले आहे. एक लाख पेक्षा जास्त मतांनी मला विजयी करुन जनतेने विकास कामावर शिक्कामोर्तब केले असल्याने अपूर्ण कामांना प्राधान्य क्रमाने पूर्ण केल्या जाईल, असा विश्वास आमदार कृष्णा खोपडे यांनी केला. राज्यात लाडकी बहीण योजना सुरु झाल्यानंतर महिलांना आर्थिक पाठबळ मिळाले आहे.

स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी लाडक्या बहिणींना दरमाह दिली जाणारी मदत आगामी काळात महिलांना आत्मनिर्भर करण्यास मोलाची ठरणार आहे. गत ६० वर्षात काँग्रेसने काळोख निर्माण केला होता. भाजपाने सत्तेत येताच विकासाचे पर्व सुरु करीत शहराचा पूर्णतः कायापालट केला चौथ्यांदा विजयी होण्याचा आनंद नक्कीच आहे. त्यापेक्षा सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नाला न्याय देण्यासाठी पूर्वीप्रमाणेच व्यस्त राहणार आहे.

पूर्व नागपूरात विकासाची गंगा आणल्यामुळे चौथ्यांदा मला जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. भांडेवाडीच्या रिकाम्या जागेवर जागतिक मान्यतेचे सिम्बायोसिस विद्यापीठ आणल्यामुळे अनेक युवकांना शिक्षणाचे दार मोकळे झाले आहे. साडेचारशे गुंतवणूक करून हा प्रकल्प उभारण्यात आल्यामुळे युवकांना इतर ठिकाणी जाण्याची गरज राहिली नाही.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यशस्वी नेतृत्वामुळेच नागपूर शहरासोबतच संपूर्ण राज्याचा चेहरा मोहरा बदललेला आहे. पूर्व नागपूरातील विकासाचे मॉडेल यशस्वी ठरविण्यात मतदारांचा मोठा वाटा आहे. राज्यात आता सोमवारी महायुतीचे घेणार आहे. त्यामुळे पुन्हा राज्यात विकास कामाचा सपाटा सुरु होणार आहे. निवडणूकीच्या प्रचारादरम्यान महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सातत्याने दिशाभूल करण्याचे काम केले आहे. भाजपची सत्ता आल्यामुळे विकास कामाचा झपाटा कायम राहील, असा विश्वा कृष्णा खोपडे यांनी व्यक्त केला.

# बजाजनगर येथील संत श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिरात आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
संत श्री ज्ञानेश्वर महाराज माउली यांचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा २४ ते २९ नोव्हेंबरदरम्यान बजाजनगर येथील संत श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिरात आयोजित करण्यात आला आहे. अवघ्या २१ व्या वर्षी देहत्याग करणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

संजीवन समाधी सोहळ्यात २४ नोव्हेंबरला सकाळी १० ते दुपारी १२.१० वाजतादरम्यान सर्वांसाठी 'संताची चित्रे किंवा त्यांचे जीवन प्रसंग' या विषयावर चित्रकला स्पर्धा आणि फक्त विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर, हरिपाठाचे पहिले ३ ते १२ श्लोकापैकी कोणतेही दोन श्लोक पाठांतर स्पर्धा आणि सुलभ वाचन स्पर्धा होणार आहे. सायंकाळी ५ वाजता 'संताच्या गोष्टी' विषयावर

साभिनय कथाकथन स्पर्धा, ६.३० वाजता संगीतिका (संत ज्ञानेश्वर यांचा जीवनपट) आणि रात्री ८.३० वाजता आरती आणि पसायदान होणार आहे. २६ नोव्हेंबरला सायंकाळी ५.३० वाजता नीता पांडे व चमू यांचे सांगीतिक हरिपाठ होणार आहे. २७ नोव्हेंबरला पुण्याचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे परिमल कोल्हटकर व नागपूरचे प्रथितयश कलाकारांचे अभंग, भावगीत, नाट्यगीतांचा कार्यक्रम होईल. २८ नोव्हेंबरला सायंकाळी ६ वाजता चारुल अनिखिंडी यांचे पसायदानावर कथक नृत्य, ज्ञानेश्वर संशोधित सापशिडीचे सादरीकरण आणि उपासना कथक कला केंद्रातर्फे 'ज्ञानियांचा राजा' ही नृत्य नाटिका सादर करण्यात येणार आहे. २९ नोव्हेंबरला सायंकाळी ६ वाजता चैतन्य देशपांडे यांचे कीर्तन, आरती व पसायदान आणि पाऊलभजन होणार आहे. अतिशय साधेपणाने होणाऱ्या पाच दिवसांच्या या सोहळ्यात माउलींच्या उपासकांनी तसेच भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संत श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिराने केले.

# बुथ क्रमांक 33 वर मशीनमध्ये सील नाही : काँग्रेसचा आक्षेप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
पश्चिम नागपूर मतदारसंघात तिसऱ्या फेरी दरम्यान बुथ क्रमांक ३३ वर मशीनमध्ये सील नाही, असा आक्षेप काँग्रेसने घेतला आहे. काँग्रेसचे विकास ठाकरे पहिल्या तीन फेरीत भाजपचे सुधाकर कोहळे यांच्यापेक्षा मागे होते. पण, चौथ्या फेरीपासून ही तूट भरून काढत ३६१३ मतांनी पुढे झाले. पाचव्या फेरीत ठाकरे ४६५३ मतांनी समोर आहेत. तपासणीअंती काँग्रेसचा आक्षेप फेटाळला.

मतदानाची टक्केवारी वाढण्यास अनेक घटक कारणीभूत असल्याचे दिसून येते. यामध्ये काँग्रेस, भाजप तसेच अपक्ष उमेदवाराकडून झालेला आक्रमक प्रचार हा एक आहे. त्याचा परिणाम मतदाराच्या टक्केवारीवरून दिसून आले आहे. शिवाय मुस्लीम समाजाच्या काही संघटनांनी महाविकास आघाडीला पाठिंबा जाहीर केला होता. परिणामी मुस्लीम महिलांनी मोठ्या संख्येने मतदान केले.

काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी मतदानाच्या दोन दिवसआधी नागपुरात रोड-शो घेतला होता. यावेळी मुस्लीम महिला मोठ्या प्रमाणात रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असल्याचे चित्र होते. अनुसूचित जातीचे २० ते २१ टक्के मतदार आहेत. हा समाज निवडणुकीबाबत सर्वांत जागृत समजला जातो. लोकसभा निवडणुकीत मतांचे विभाजन होऊ नये म्हणून तो काँग्रेसच्या बाजूने उभा राहिला होता. यावेळी देखील अशीच स्थिती असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

# २ लाखांच्या दागिन्यांवर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
घराला कुलूप असल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत 2 लाख 8 हजार 800 रुपये किंमतीच्या दागिन्यांवर डल्ला मारला. ही घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी भुनेश्वरी विनोद बारापात्रे (34) रा. डी.डी. व्हीला अपार्टमेंट, न्यू मनीषनगर, सोमलवाडाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 20 नोव्हेंबरच्या सायंकाळी भुनेश्वरी परीक्षेसाठी भंडारा येथे गेल्या होत्या. घरी त्यांच्या सासू एकट्या होत्या. दरम्यान त्यांच्या सासूही काही कामाने घराला कुलूप लावून बाहेर गेल्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील 2,08,800 रुपये किंमतीचे सोन्याचांदीचे दागिने चोरी करून पसार झाला. दुसऱ्या दिवशी सासू घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेबाबत भुनेश्वरी यांना माहिती दिली.

## विद्युत कुंपणाच्या संपर्कात आल्याने सरपंचाचा मृत्यू

**नागपूर :** महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील एका शेतावर बेकायदेशीरपणे बसवलेल्या विद्युत कुंपणाच्या संपर्कात आल्यानंतर एका 32 वर्षीय गावच्या सरपंचाचा विद्युत शॉक लागून मृत्यू झाला. पोलिसांनी शुक्रवारी ही माहिती दिली. एका अधिकाऱ्याने सांगितले की, जिल्हा मुख्यालयापासून सुमारे 50 किमी अंतरावर असलेल्या भिवापूर तहसीलच्या थुतनबोरी गावात सकाळी ही घटना घडली. थुटनबोरीचे सरपंच विनोद नथुजी गुरपुडे (32) हे जनावरांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतात लावलेल्या तारांच्या कुंपणाच्या संपर्कात आले, त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला, असे अधिकाऱ्याने सांगितले.

# भरधाव टिप्परने मायलेकाला उडविले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
भरधाव टिप्परने दुचाकीने जात असलेल्या मायलेकाला धडक दिली. यात दोघेही वाहनासह खाली पडून जखमी झाले. मात्र आईला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर मेडिकल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कुसूम जयनारायण गोडघाटे (70) आणि आतिश जयनारायण गोडघाटे (42) दोन्ही रा. शिक्षक कॉलनी, भरतनगर, अशी जखमींची नावे आहेत. पोलिसांनी आतिश यांच्या तक्रारीवरून आरोपी टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. गुरूवारी सकाळी 11.50 वाजताच्या सुमारास आतिशला आईला मागे बसवून एमएच-49/बीझेड-5164 क्रमांकाच्या दुचाकीने एचबी टाऊन रोडने जात होते. निवारण लॉंड्रीसमोर टिप्पर क्र. एमएच-31/एफएल-1145 च्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवून आतिश यांच्या दुचाकीला मागून जबर धडक दिली. यात गोडघाटे मायलेक वाहनासह खाली पडून जखमी झाले. मात्र कुसूम यांचे दोन्ही पाय आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले. पोलिसांनी टिप्पर चालकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला.

# मनपा आयुक्त व स्मार्ट सिटी सीईओंनी केले किऑक्सचे निरीक्षण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
नागपूर शहरामध्ये नागपूर स्मार्ट अँड सस्टेनेबल कॉर्पोरेशन लिमिटेड च्या माध्यमातून विविध ठिकाणी किऑक्स लावण्यात आले आहेत. नागरी सुविधांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या किऑक्सची स्थिती आणि कार्यशैलीचे शुक्रवारी (ता.२२) शंकरनगर बस स्थानक येथे मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि नागपूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा चांडक यांनी निरीक्षण केले. नागपूर शहरामध्ये काही ठिकाणी आणखी किऑक्स लावण्यात येणार असून याकरिता योग्य जागा शोधण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले.



नागपूर स्मार्ट सिटीतर्फे शहरातील विविध ६५ ठिकाणी किऑस्क लावण्यात आलेले आहेत. यामध्ये २३ शासकीय इमारती आणि ४२ शहर बस स्थानकावर लावण्यात आलेल्या किऑस्कचा समावेश आहे. या किऑस्कच्या माध्यमातून नागरिक आपले सरकार पोर्टल, ट्रॅफिक चालान, निवडणुकीसाठी मतदाराची माहिती प्राप्त करू शकतो. तसेच मनपाच्या विविध सेवांची सुद्धा माहिती किऑक्सवरून सहज प्राप्त करता येते. पाण्याचे बिल किंवा मालमत्ता कर सुद्धा या माध्यमातून भरता येणे शक्य आहे.

मनपा आयुक्तांनी पाहणी करून या किऑस्कचा वापर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहजतेने करावे, याबद्दल काही उपाय शोधण्याचे निर्देश दिले. तसेच या किऑक्सच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही लावणे, मेट्रो, आपली बस आणि रेल्वेच्या सुविधा देखील यामध्ये जोडण्याचे तसेच पर्यटनाची माहिती सुद्धा या माध्यमातून देण्याचे निर्देश आयुक्त डॉ. चौधरी यांनी स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांना दिले.

याप्रसंगी मनपाचे उपायुक्त श्री. प्रकाश वराडे, स्मार्ट सिटीचे ई गव्हर्नन्स विभागाचे महाव्यस्थापक डॉ. शील घुले, मनपाचे माहिती व तंत्रज्ञान विभागाचे स्वप्नील लोखंडे उपस्थित होते.

## क्रेनखाली येऊन मजुराचा मृत्यू

**नागपूर :** क्रेन चालकाने बेदरकारपणे वाहन चालवून सायकलस्वार मजुराला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी मजुराचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पलटू कुवरसिंग निर्मलकर (43) रा. मिनी मातानगर असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी पलटूचा पुतण्या नरेंद्रच्या तक्रारीवरून आरोपी क्रेन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली.

मोहम्मद फिरोज मोहम्मद नसीर (23)रा. राजीव गांधीनगर, असे अटकेतील चालकाचे नाव आहे. पलटू लकडगंजच्या लघु औद्योगिक क्षेत्रात मजुरी करीत होता. बुधवारी सायंकाळी 6.30 वाजताच्या सुमारास तो सायकलने कामावर जात होता. हरीहर मंदिराजवळ क्रेन क्र. एमएच-49/बीआर-8392 चा चालक फिरोजने निष्काळजीपणे वाहन चालवून पलटूला जबर धडक दिली. पलटू सायकलसह खाली पडून क्रेनच्या चाकात आला.

# ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती क्रांतिकारी घटना माजी निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
देशातील केंद्र व राज्य ही द्विस्तरीय राज्यव्यवस्था १९९२ मधील ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था अशी त्रिस्तरीय झाली. त्यामुळे ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती ही सामाजिक लोकशाही मधील क्रांतिकारक घटना होती, असे प्रतिपादन माजी निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात 'महाराष्ट्रातील निवडणुकीचे राजकारण' या विषयावर शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ रोजी अतिथी व्याख्यान पार पडले. यावेळी सहारिया मार्गदर्शन करीत होते.



प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. व्याख्याते म्हणून माजी निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया, मुंबई विद्यापीठातील डॉ. मृदुल निळे, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली येथील प्रा. डॉ. हरीश वानखेडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना त्रिस्तरीय झालेली रचना ह्यपंचायत राजह्ण नावाने प्रसिद्ध झाली असे सांगितले. या बदलामुळे लोकशाहीचे स्थानिक विकेंद्रीकरण करण्याचे तसेच महिला, दलित, आदिवासी, भटके विमुक्त या वंचित-उपेक्षित घटकांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढवण्याचे महत्त्वाचे काम झाले.

शासन व्यवस्थेतील पहिली सामाजिक क्रांती ही सार्वत्रिक प्रौढ मताधिकार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांतील निवडणूक प्रक्रियेबाबत अद्यापही अपेक्षित प्रमाणात विद्यापीठ आणि विविध संशोधन संस्थांमध्ये संशोधन होताना दिसून येत नाही, असे सहारिया म्हणाले. त्यामुळे सर्व सामान्य लोकांना त्या संदर्भात माहिती उपलब्ध होत नाही, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना राज्य निवडणूक प्रक्रिया, निवडणुकांवर होणारा खर्च, स्थानिक पातळीवर निवडणुकांचे व्यवस्थापन, स्थानिक पातळीवर कशा पद्धतीने केले जाते, यावर संशोधनात्मक अभ्यास करण्यास प्रवृत्त केले.

याप्रसंगी प्रमुख वक्ते मुंबई विद्यापीठातील प्रा. डॉ. मृदुल निळे यांनी " निवडणूक सर्वेक्षणाचे आयोजनः सूत्रबद्धता, अंमलबजावणी आणि विश्लेषण' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संशोधन पद्धती कशा अवलंबल्या पाहिजेत आणि निवडणुकीचा अभ्यास करीत असताना सव्हेर्ची आखणी डेटा संकलन आणि त्यांचे विश्लेषण करण्याकरिता कोणकोणत्या पद्धती वापरायला हव्या. जेणेकरून निवडणूक संदर्भात अचूक आकलन आपल्याला करता येईल, याबाबत सविस्तर माहिती त्यांनी आपल्या व्याख्यानातून दिली.

आयोगाने आणलेल्या पाच सुधारणांचे उदाहरण दिले. पक्षाची नोंदणी रद्द करणे, निवडणूक खचार्चे प्रदर्शन, नोटा, प्रतिज्ञापत्र प्रणाली आणि तंत्रज्ञान, लोकशाही निदेर्शांक - इकॉनॉमिक इंटेलिजेंस युनिटद्वारे स्वातंत्र्य, पारदर्शकता आणि मुक्त व निष्पक्ष निवडणूकांचे मूल्यमापन कसे करता येईल, असे सागितले. त्यातून निवडणुकांवर कसा प्रभाव पडेल, यावर प्रकाश टाकला. विशेष व्याख्यानाचे वक्ते जवाहरलाल नेहरू विद्यापीठ दिल्ली येथील प्रा. डॉ. हरीश वानखेडे यांनी 'महाराष्ट्रातील सत्ता राजकारणातील बदलती गतिशिलता' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना केले, निवडणुकांच्या संचलनात संकल्पना मान्य महत्त्वाच्या निर्णयाक आहे. राजकीय प्रक्रियेचे परीक्षण करण्यासाठी सत्ता हे एक विश्लेषणात्मक तंत्र आहे ज्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सत्ता स्थित्यंतरे व त्यामागील कारणे समजून घेता येईल, यांची विश्लेषणात्मक मांडणी डॉ. वानखेडे यांनी केली.

# डॉ. हेडगेवार रक्त केंद्राने बजावला जागरूक नागरिकतेचा हक्क

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
डॉ. हेडगेवार रक्त केंद्र, हे आरएसएस लोकसमास्य संशोधन आणि लोककल्याण समिती द्वारे चालविण्यात येणाऱ्या प्रकल्पाचा एक भाग आहे जो १९९३ साली अस्तित्वात आला. या काळात समाजाने रक्ताच्या वेळेवर प्रशासनाअभावी लोकांचा मृत्यू होत असल्याचे पाहिले. त्यामुळे ही कमतरता भरून काढेल अशा रक्तपेढीची स्थापना करण्याची कल्पना पुढे आली. थॅलेसेमिया आणि सिकलसेल रुग्णांना त्यांचे जीवन कष्टांशिवाय आनंदाने जगण्यासाठी मदत करणे हे रक्तपेढीच्या स्थापनेमागील मोठे सामाजिक कारण होते.



सुरुवातीला आम्ही फक्त संपूर्ण रक्त प्रदान केले, आता पॅक्ड रेड सेल, प्लेटलेट कॉन्सन्ट्रेट, फ्रेश फ्रोझन प्लाज्मा आणि सिंगल डोनर प्लेटलेट कॉन्सन्ट्रेट प्रदान करण्यासाठी आमच्या सेवांचा विस्तार करत आहोत. एक बीपासून नुकतेच सुरू झालेल्या एका मोठ्या वृक्षात जात, धर्म आणि राजकारणाचा विचार न करता समाजातील सर्व घटकांपर्यंत त्याच्या फांद्या पसरल्या. आमच्यासोबत जवळपास १ लाख ऐच्छिक रक्तदाते जोडलेले आहेत आणि बरेच काही तयार होत आहे. समाजातील अनेक चांगले समारित लोक आमच्या सेवेत मदत करतात आणि गरज पडेल तेव्हा वेळेवर मदत करतात.

आमचा कार्यसंघ आमच्या सहानुभूतीपूर्ण सेवांद्वारे गरजूंना मदत, सल्ला आणि सांत्वनासाठी जीवनाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचण्यासाठी पुढाकार घेतो. २४७७ सेवा प्रदान करून समाजाकडून ठेवलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

# आघाडीचा सुपडासाफ

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाचे वादळ दिसून आले. 2014 मध्ये मोदी लाटेत देखील एवढा मोठा विजय भाजपला मिळाला नव्हता. तेवढा विजय या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवला आहे. भाजप राज्यातील एकमेव सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. इतर कोणत्याही पक्षाला तीन अंकी संख्या गाठता आली नाही. भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने बहुमताचा आकडा पार केला आहे. तथापि, महायुतीच्या या झंझावाताची जेवढी चर्चा होते आहे, त्यापेक्षा महाविकास आघाडीचा झालेला सुपडासाफ हा अधिक चर्चेचा विषय ठरू शकतो.

--------------------

2019 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी भाजपा आणि शिवसेना यांना कौल दिला असताना केवळ मुख्यमंत्री पदावरून त्यांच्यात फाटले. नंतर शरद पवार यांनी उद्धव ठाकरे, काँग्रेस यांना सोबत घेत महाविकास आघाडी स्थापन करीत राज्याची सत्ता हाती घेतली. अडीच वर्ष या आघाडीने सरकार चालविल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सेनेच्या आमदारांनी बंड केले आणि सरकार पडले. पुढे भाजपा आणि एकनाथ शिंदे गट यांनी सत्ता स्थापन केली. सव्वा वर्षापूर्वी अजित पवार अनेक आमदारांसह राष्ट्रवादीतून बाहेर पडले आणि सरकारमध्ये सहभागी झालेत.

या अडीच वर्षाच्या काळात महाविकास आघाडीचे नेते त्यांचा पक्ष बळकट करीत होते की नाही? हा भाग सोडला तरी ते केवळ महायुती सरकारवर तोंडसुख तेवढे घेत राहिले. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतरचे विधीमंडळाचे प्रत्येक अधिवेशन पाहिले तर, गद्दार, खोके, खंजीर असेच शब्द कानी पडत राहिले.

शिवसेनेची दोन शकले झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते, प्रवक्ते केंद्रातील मोदी सरकार आणि महायुतीवर सडकून टीका करण्याशिवाय दुसरे काही करताना दिसत नव्हते. स्वतः उद्धव ठाकरे असोत, संजय राऊत असोत किंवा आदित्य ठाकरे असोत, महायुतीवर टीका, मोदींवर टीका, शहा यांच्यावर तोंडसुख एवढेच करताना दिसले.

मुंबई आमचीच, येथे आमच्याशिवाय पान हालू शकत नाही, हा फाजिल आत्मविश्वास बाळगणाऱ्या ठाकरे कंपनीला आताच्या निकालातही काळेबेरे दिसू लागले आहे. विदर्भ, कोंकण येथेही ठाकरेंच्या शिवसेनेचे पुरते पानिपत झाले आहे. या निवडणुकीच्या प्रचार काळात उद्धव ठाकरे यांच्या जेवढ्या सभा झाल्या, त्यात राज्यातील गंभीर विषयाला अधिक उचलून धरण्याऐवजी पक्ष फोडाफोडी, गद्दारी वगैरे विषयावरच ते अधिक बोलत असताना ते बोलताना दिसले. खासदार संजय राऊत यांना तर त्यांनी मोकाट सोडले होते. याचा विपरीत परिणाम महाविकास आघाडीवर झाल्याचे दिसून येते.







महाविकास आघाडीमधील दुसरा पक्ष काँग्रेस हा नेहमीप्रमाणे हवेत दिसून आला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला जे यश मिळाले त्यामुळे काँग्रेस हुरळून गेली होती. राज्यातील पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये समन्वयाचा अभाव, एकमेकांच्या तंगड्या ओढण्याचे काम, उमेदवारी देताना झालेल्या किंवा हेतुपुरस्सर करण्यात आलेल्या चुका, हे काँग्रेसला नडल्याचे दिसते.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा सततचा बडबोलेपणा, तिकीट वाटपात अनाठायी अट्टहास, उमेदवार लादण्याचा प्रकार त्यांच्याच अंगलट आला आहे. विदर्भ हा काँग्रेसचा गड मानला जातो. लोकसभा निवडणुकीत याच विदर्भाने काँग्रेसला झुकते माप दिले होते. त्याच विदर्भात काँग्रेसचा पुरता सुपडासाफ झाला आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांनी प्रचारसभांचा धडाका लावला असताना काँग्रेसकडे स्टार प्रचारकांची कमतरता दिसून आली. संपूर्ण कमान राज्यातील नेत्यांनी सांभाळली. राहुल गांधी, मल्लिकार्जून खर्गे यांच्या सभांचा फार परिणाम जाणवला नाही. वैदर्भिय काँग्रेस नेत्यांनी बाळगलेला अहंकार हा त्यांच्या पक्षाच्या पतनाला मोठ्या प्रमाणात कारणीभूत असल्याचे स्पष्ट दिसते.

आघाडीतील तिसरा पक्ष शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस. लोकसभा निवडणुकीत भरीव कामगिरी करणारा हा पक्ष पार धुळीस मिळाल्याचे दिसून आले. शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील, अमोल कोल्हे यांच्याशिवाय चौथा नेता यांच्याकडे प्रचारासाठी नव्हता. शरद पवार सभेत काय बोलतात, हे अनेकांना कळत नव्हते, असे याच पक्षाचे काही पदाधिकारी सांगतात. शरद पवार यांचा करिश्मा या निवडणुकीत चाललाच नाही, असेही म्हणता येईल.

महाराष्ट्रात मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण वाचविणे यासह अनेक विषय होते. भाजपाचे योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे आणि मोदी यांनी एक है तो सेफ है... असे नारे आणले. धर्माचा खुलेआम वापर झाला. अशा स्थितीत महाविकास आघाडी प्रत्येक ठिकाणी बॅकफुटवर राहिल्याचे दिसून येत होते.

यापूर्वीच्या अनेक निवडणुकीमध्ये काँग्रेसच काँग्रेसला हरवते, असे म्हटले जायचे. या निवडणुकीतही याचा प्रत्यय आला. आता निकालानंतर काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे नेते निकालावर शंका घेवू लागले आहेत. मात्र, साप गेल्यावर ढोसरीला मारण्यात अर्थ नाही. राज्यात भाजपा, शिंदे शिवसेना आणि अजित पवार यांच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. एकट्या शिंदेंच्या शिवसेनेने जितक्या जागा जिंकल्या तितक्या जागा संपूर्ण महाविकास आघाडीला मिळू शकल्या नाहीत. यापेक्षा दुसरा लाजिरवाणा पराभव काय असू शकतो?

अर्थात, महाविकास आघाडीच्या दारूण पराभवाला महायुती सरकारने आणलेल्या अनेक योजना विशेषतः लाडकी बहीण योजना बऱ्याच अंशी कारणीभूत ठरली आहे. आता पाच वर्ष आघाडीला आत्मचिंतन करण्याशिवाय पर्याय नाही.

●●●●●●●●●

# अदानी लाचखोरी प्रकरणात पुढे काय होणार?

(कालच्या अंकावरून पुढे)

29 मार्च 2022 रोजी रणजीत गुप्ता यांनी दीपक मल्होत्रा यांनाही असा संदेश पाठवला होता, जो त्यांनी कॅबनेस आणि सौरभ अग्रवाल यांना पाठवला होता. सौरभ अग्रवाल यांनी उत्तरात लिहिले की, 'आम्ही व्यवस्थापनाला एफसीपीएबद्दल सांगायला हवे.'

त्यानंतरच या सर्वांनी सरकारी तपासावर प्रभाव टाकण्याचे मान्य केल्याचा आरोप आहे. त्यासाठी त्यांनी माहिती आणि कागदपत्रे लपवून सरकारी यंत्रणांना चुकीची माहिती पुरवण्याची योजना आखली. ऑगस्ट 2022 मध्ये, त्यांनी 'अमेरिकन जारीकर्ता' च्या संचालक मंडळाला स्वतःच्या कंपनीची अंतर्गत तपासणी करण्यास पटवून दिले. वास्तविक, त्यांना तपासाच्या नावाखाली स्वतःला वाचवायचे होते.

आरोपानुसार, 2022 पासून आजपर्यंत, सिरिल कॅबनेस, सौरभ अग्रवाल, दीपक मल्होत्रा ??आणि रूपेश अग्रवाल आणि सह-षड्यंत्रकर्ता-1 यांनी असंख्य पुरावे, कागदपत्रे, पॉवर पॉइंट विश्लेषण आणि इलेक्ट्रॉनिक संप्रेषण नष्ट केले किंवा लपवले.

जून 2022 मध्ये, सौरभ अग्रवाल आणि कॅबनेस यांनी काही इलेक्ट्रॉनिक संदेश हटवले, ज्यामध्ये कॅनेडियन गुंतवणूकदाराला लाच देण्याची माहिती दिल्याची चर्चा होती. ऑगस्ट २०२२ मध्ये, को-कॉन्स्पिरेटर-1 ने दीपक मल्होत्रा आणि रूपेश अग्रवाल यांच्याशी लाचखोरी प्रकरणाशी संबंधित माहिती असलेले ई-मेल, इलेक्ट्रॉनिक संदेश आणि पॉवरपॉइंट विश्लेषण नष्ट करण्याबद्दल बोलले. 30 सप्टेंबर 2022 रोजी, सिरिल कॅबनेस, सौरभ अग्रवाल, दीपक मल्होत्रा आणि रूपेश अग्रवाल आणि सह-षड्यंत्रकर्ता-1 यांनी लाच आणि गौतम अदानी यांच्याशी संबंधित करार लपविण्याचे मान्य केले.

हे पाच लोक मार्च-जुलै 2023 दरम्यान न्यूयॉर्कमध्ये फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन, न्याय विभाग आणि एएउ च्या अधिकाऱ्यांना भेटले. यावेळी त्यांनी जाणीवपूर्वक लाचखोरी योजनेत आपला सहभाग असल्याचे नाकारले.

**यूएस डॉलर वाढवण्यासाठी युक्ती**

कोर्टात दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार, 2020 ते 2024 दरम्यान गौतम अदानी, सागर अदानी आणि विनीत जैन लाच देण्याची योजना आखत होते आणि डॉलरमध्ये निधी गोळा करण्याचाही प्रयत्न करत होते. त्यासाठी त्यांनी इंडियन एनर्जी कंपनी आणि तिच्या सहयोगी कंपन्यांच्या आर्थिक व्यवहारांना मान्यता दिली. यामध्ये डॉलर दोन प्रकारे वाढवले गेले.

अमेरिकन गुंतवणूकदार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून डॉलरमध्ये कर्ज घेण्यात आले.

सिक्युरिटीज कायदा, 1933 अंतर्गत नियम-144अ बाँड जारी करण्यात आले होते, जे अमेरिका आणि इतर ठिकाणी विकले गेले होते.

यूएस दस्तऐवजात, अदानी यांच्यावर गुंतवणूकदार आणि कर्जदारांना व्यवहारातील जोखीम आणि भारतीय कंपनीच्या लाचखोरीच्या नियोजनाबद्दल माहिती न दिल्याचा आरोप आहे.

गौतम अदानी, सागर अदानी आणि विनीत जैन यांचे कंपनीसाठी निधी उभारण्यावर पूर्ण नियंत्रण होते. 10 ऑक्टोबर 2020 च्या सुमारास, भारतीय ऊर्जा कंपनीच्या संचालक मंडळाने एक ठराव संमत केला, ज्यामध्ये 'व्यवस्थापन समिती' पुन्हा निर्माण करण्याबाबत आणि नवीन अधिकार जोडण्याबाबत चर्चा झाली.

यानंतर गौतम अदानी, सागर अदानी आणि विनीत जैन यांचा समावेश असलेली 4 सदस्यीय व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली. या समितीला बँका आणि इतर वित्तीय संस्थांकडून निधी उभारणे, उपकंपन्यांमध्ये गुंतवणूक करणे आणि रोखे जारी करण्याचे अधिकार देण्यात आले.

2020 ते 2023 दरम्यान गौतम अदानी आणि सागर अदानी यांनी अनेकदा अमेरिकेला भेट दिली. जिथे तो गुंतवणूकदार आणि भागीदार बनतील अशा लोकांना भेटले. याव्यतिरिक्त, त्यांनी यूएस सरकारच्या तपासांना खोटी किंवा दिशाभूल करणारी विधाने देण्यासाठी लोकांना तयार केले



किंवा जबरदस्ती केली.

17 मार्च 2023 रोजी एफबीआयच्या विशेष प्रतिनिधींनी शोध वॉरंटच्या आधारे गौतम अदानी यांचा पुतण्या सागर अदानी याची चौकशी केली. यानंतर सागरची इलेक्ट्रॉनिक उपकरणे ताब्यात घेण्यात आली. त्यानंतर एफबीआयने सागरला शोध वॉरंटची प्रत दिली आणि त्याला चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले.

ही चौकशी एफसीपीए, सुरक्षा फसवणूक, वायर फसवणूक यासंबंधी होती. यामध्ये भारतीय अधिकाऱ्याला लाच देणे किंवा व्यावसायिक फायद्याच्या बदल्यात कोणताही व्यवहार केल्याचा उल्लेख होता.

एफबीआयने सागर अदानी यांना चौकशीसाठी दिलेली कागदपत्रे आणि शोध वॉरंटच्या प्रती. एका दिवसानंतर, 18 मार्च रोजी गौतम अदानी यांनी सर्व कागदपत्रे स्वतः ला ई-मेल केली.

आरोपपत्रानुसार, एका मीडिया हाऊसने 15 मार्च 2024 रोजी एक अहवाल प्रकाशित केला होता. गौतम अदानी आणि त्यांच्या कंपनीविरुद्ध लाचखोरी प्रकरणात अमेरिकन सरकारकडून सुरू असलेल्या तपासाबाबत हा अहवाल होता.

अदानी आणि त्यांच्या कंपनीने स्वतःच्या फायद्यासाठी लाच दिल्याचे या अहवालात म्हटले आहे. या अहवालात अदानीकडून त्यांना किंवा त्यांच्या कंपनीकडे तपासाबाबत कोणतीही माहिती नसल्याचे निवेदन देण्यात आले आहे. त्यांना कोणतीही नोटीस देण्यात आलेली नाही. तर एफबीआयने सागर अदानी यांची चौकशी केली होती. सर्च वॉरंट देण्यात आले आणि उपकरणही जप्त करण्यात आले.

17 मार्च 2024 रोजी, 'इंडियन ग्रुप' मधील एका व्यक्तीने वित्तीय संस्थेतील एका व्यक्तीला मेल केला आणि सांगितले की मीडिया रिपोर्टमध्ये जे काही नमूद केले गेले आहे ते निराधार आणि तथ्यात्मक आहे. या गोष्टी वित्तीय संस्थेशी संबंधित डझनभर गुंतवणूकदारांना मेल केल्या होत्या.

19 मार्च 2024 रोजी एका व्यक्तीने 3 वेगवेगळ्या वित्तीय संस्थांना मेल पाठवला. हा मेल यापूर्वी 'इंडियन एनर्जी कंपनी'ने नॅशनल स्टॉक एक्सचेंज (ठएए) आणि बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (इएए) यांना पाठवला होता.

अमेरिकेच्या 'डिपार्टमेंट ऑफ जस्टिस'च्या आरोपांबाबत 'इंडियन एनर्जी कंपनी'ला कोणतीही नोटीस देण्यात आलेली नाही, अशी खोटी माहितीही देण्यात आली. तर, इंडियन एनर्जी कंपनी आणि इंडियन ग्रुप यांना अमेरिकेच्या भ्रष्टाचारविरोधी कायद्याची आणि सुरू असलेल्या तपासाची माहिती होती.

आरोपानुसार, 2021 ते 2023 पर्यंत दरवर्षी भारतीय ऊर्जा कंपनीने आपला वार्षिक अहवाल शेअर केला. यामध्ये कंपनीने लाचखोरी आणि भ्रष्टाचाराबाबत आपल्या 'झिरो टॉलरन्स'चा पुनरुच्चार केला. गौतम अदानी, सागर अदानी आणि विनीत जैन यांच्यासह समूहातील इतर सदस्यांनी या धोरणाचे पुनरावलोकन केले.

जुलै 2024 मध्येही, कंपनीने आपल्या अंतर्गत अहवालात संस्थेच्या भ्रष्टाचारविरोधी धोरणाबाबत 'शून्य सहनशीलता' बद्दल सांगितले. 'सरकारी प्रकल्पांमधील लाचखोरी आणि भ्रष्टाचाराबाबत आम्ही 'झिरो टॉलरन्स' धोरण अवलंबत आहोत, असे निवेदन कंपनीने दिले. लाचखोरी आणि फसवणुकीच्या आरोपांवर आम्ही सरकारी अधिका?यांना सहकार्य करत राहू. आमचे कर्मचारी आणि कर्मचारी कोणत्याही प्रकारची लाच घेण्यास नकार देतात.

●●●●●●●●●

# भक्तांशी एकरूप झालेले प.पू. भक्तराज महाराज!

महाराष्ट्र ही अवतारांची आणि साधू संतांची भूमी. या भूमीत अनेक संत महात्मे होऊन गेले. त्यांनी दिलेल्या शिकवणीकीतून, प्रवचनांतून, लिहिलेल्या भजनांतून आणि ग्रंथातून बोध घेऊन अनेक अनुयायी निर्माण झाले.

या अनुयायांनी समाजाला अध्यात्माची आणि साधनेची गोडी लावली. समाजमनावर नामाचे महत्व बिंबवले आणि मनुष्यजन्माचे सार्थक कसे करायचे हे जनमानसांत ठसवले. ज्यांनी हे महत्व समजून घेतले त्यांनी मनुष्यजन्माचा उद्धार करून घेतला. याच संतांच्या मांदियाळीतील एक संत म्हणजे प.पू. भक्तराज महाराज.

संसारात राहून साधना कशी करावी आणि स्वतःचा उद्धार कसा करून घ्यावा याचे जिवंत उदाहरण म्हणजे प.पू. भक्तराज महाराज. प्रीतीचे सगुण रूप म्हणजे प.पू. भक्तराज महाराज, गुरुसेवेचा परमावधी म्हणजे प.पू. भक्तराज महाराज. अशा या भक्तराज महाराजांचा महानिर्वाण दिन कार्तिक कृष्ण नवमी म्हणजेच २४ नोव्हेंबर २०२४ या दिवशी पुण्यातील जुन्नर तालुक्यातील श्रीक्षेत्र कांदळी(वडगाव) येथे साजरा होत आहे.

बाबांचा (प.पू. भक्तराज महाराज यांचा) जन्म अत्यंत धार्मिक सामान्य ब्राह्मण प्रतिष्ठित कुळात झाला. श्रीराम हे त्यांचे कुलदैवत ! लहानपणापासूनच भगवत्प्रेमाने त्यांना आकर्षित केले. त्यांच्या हृदयात भक्तीज्योत सदैव तेवत राहिली, परिणामस्वरूप धार्मिक कार्यात सातत्याने भाग घेणे आणि भजन, श्रवण, गरिबांना साहाय्य करणे, हा त्यांचा आवडता छंद आणि स्वभाव बनला. शिक्षण पूर्ण होताच परिस्थितीवश त्यांनी नोकरी शोधण्याचे काम आरंभ केले. नोकरी मिळेपर्यंत स्वस्थ न बसता त्यांनी लहान-सहान कामे करून व्यवसाय वाढवला; पण नियतीला हे मान्य नव्हते. कुशाग्र बुद्धी, वाक्पटूता, त्वरित अचूक निर्णय घेणे, या गुणांमुळे हे बालक असामान्य झाले. यामुळे सगळेच त्यांच्याशी आदरभाव ठेवून वागत असत.

त्यांची लहानपणापासूनच धार्मिक आणि आध्यात्मिक साधनेची वृत्ती असल्यामुळे त्यांना ह्यश्री गुरुचरित्रह्लवाचनाचा छंद जडला. विपत्तीकाळातही त्यांची साधना यथागत चालूच होती. त्यामुळे त्यांची गुरुप्राप्तीची ओढ दिवसेंदिवस वाढत गेली. त्याच दरम्यान प.पू. श्रीशामसाईबाबांनी (हे साईबाबांचे शिष्य होते आणि त्यांच्याच आदेशानुसार त्यांच्या मोरटक्का आश्रमात राहून जनसेवा करत होते.) बाबांना साईभक्ती वाढवण्यासाठी मार्गदर्शन करून प्रोत्साहित केले. १५.२.१९५६ या दिवशी श्री अनंतानंद साईश यांनी बाबांना नर्मदामैय्याच्या साक्षीने गुरुमंत्र दिला.

त्रैलोक्याचे योगीराज हे अवतरले भूवरी ह्ल, असे बाबांनी एका भजनात त्यांच्या गुरूंना उद्देशून म्हटले आहे. ते भजन बाबांनाही लागू पडते. बाबा हे गृहस्थाश्रमी असूनही अंतस्थ योगीराजच होते ! साधक आणि भक्त यांचा उद्धार करण्यासाठी बाबा अवतरले. तो दिवस म्हणजे ७ जुलै १९२०. शिष्यावस्थेत असतांना ह्यगुरुह्ल आणि गुरुपदावर असतांना ह्यभक्तह्ल, या २ शब्दांतच जणू बाबांचे सारे जीवन सामावले होते. शिष्य असतांना गुरु वहाणा न घालता बाहेर जायला निघाले की, लगेच त्यांच्या वहाणा काखेत धरून त्यांच्या पाठी अनवाणी चालणे, धावणे, धावताना पायात काटा रुतून पाय रक्तबंबाल झाला तरी त्याकडे दुर्लक्ष करणे, भजनांच्या कार्यक्रमात गुरूंनी उठण्यास सांगितले नाही; म्हणून सलग ८ - १० घंटे भजने म्हणणे, गुरूंसमोर तासन्तास एका पायावर उभे राहून भजने म्हणणे, रात्री गुरूंच्या झोपण्याच्या वेळी त्यांनी थांब म्हणेपर्यंत अखंडपणे त्यांचे पाय चेपत राहणे, यांसारख्या बाबांच्या गुरुसेवेला तोड नाही. बाबांनी अशा गुरुसेवेतून शिष्यत्वाचा मोठा आदर्शच आपल्या सर्वांसमोर ठेवला आहे.

प.पू. बाबा म्हणायचे, भजन हेच माझे जीवन आहे. बाबांच्या भजनांचे वैशिष्ट्य हे की, आज इतक्या वर्षांनंतरही प्रत्येक साधकाला प्रत्येक प्रसंगात त्या भजनांतून त्याच्या साधनेसाठी आवश्यक असलेला अर्थ उलगडतो! यासाठीच बाबांची भजने, हा अनमोल असा प्रासादिक ठेवाच आहे. बाबांनी भजनांच्या माध्यमातून केवळ भक्तीयोगाचीच नव्हे, तर नामसंकीर्तनयोग, कर्मयोग, ज्ञानयोग आदी साधनामार्गांचीही शिकवण दिली. भक्तांना सत्संग आणि आनंद मिळावा अन् त्यांना साधनेसाठी मार्गदर्शन व्हावे, यांसाठी ऊन-पाऊस, वादळ-वारा आदी कशाचीही पर्वा न करता आणि प्रसंगी आजारपण असतांनाही प.पू. बाबा अनेक किलोमीटर प्रवास करून भक्तांकडे जात असत.

प.पू. बाबांच्या या चैतन्यदायी सहवासाच्या स्मृती आजही भक्तांना भावाने रोमांचित केल्याविना राहात नाहीत. बाबांच्या भजनाचे ऑडिओ आणि व्हिडीओ आजही उपलब्ध आहेत. या भजनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे रचियेते, संगीतकार आणि गायक स्वतः बाबा असल्याने ही भजने चैतन्याने ओतप्रोत भरलेली आहेत. एकदा बाबांच्या गुरूंनी सर्वांना सांगितले, कल दिनू के यहा भंडारा है। (बाबांचे पूर्वाश्रमीचे नाव दिनकर होते. तेव्हा अनेक जण त्यांना दिनू असे संबोधत.)

बाबा मनात म्हणाले, ह्यमाज्याकडे पैसे नाहीत आणि घरात भंडारासाठी लागणारे सामानही नाही. अशा वेळी भंडारा कसा करणार? तरी बाबांनी गुरु पाहून घेतील, असा विचार करून भंडारा करायचे ठरवले. गुरूंनी पुष्कळ जणांना भंडाऱ्याचे निमंत्रण दिले. नंतर गुरूंच्या कृपेने भंडाऱ्यासाठीच्या सामानाची सर्व सोय आपोआप झाली आणि भंडाऱ्यात काही अल्पही पडले नाही. गुरूंनी घेतलेल्या परीक्षेत बाबा उत्तीर्ण झाले.

पुढे बाबांनी जवळ विशेष पैसे नसतांनाही असंख्य भंडारे केले आणि भक्तांना शिकवले, गुरूंवर दृढ श्रद्धा ठेवा आणि गुरूंसाठी सर्वस्वाचा त्याग करा. मग पाहा, गुरु कृपा करतातच!

कधी भक्तांनी चुका केल्या, तर बाबा त्यांना मारतही असत. असे असले, तरी भक्तांना त्यांच्या रागावण्यात आणि मारण्यात प्रेमाचा ओलावा आणि भक्तांच्या कल्याणाचीच तळमळ जाणवे. यासाठीच आजही बाबांचे नुसते स्मरण केले, तरी भक्तांचे नेत्र भावाश्रूंनी डबडबल्याविना राहत नाहीत.

------------

जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
९६६४५५९७८०

●●●●●●●●●

# शेतीचे उत्पन्न धरण्यासाठी शेती ही ग्रामीण भागातच असावी का?

आपण अर्थ साक्षरता बद्दल बघत असुन गेल्या दोन आठवड्यापासुन शेती बद्दल ढोबळ माहिती घेतली आहे. आपण आज शेतीच्या उत्पन्नाबद्दलइन्कमटॅक्स कायदा 1961 काय म्हणतो, या बद्दल सोप्या प्रश्नोतररुपी अत्यंत बोलचालीच्या व्यवहारिकभाषेत बघणार आहोत, जे वाचकांना खुप उपयोगी ठरावी.

**प्रश्न** - शेतीच्या उत्पन्नावर टॅक्सलावण्याची सुधारित पद्धत भारतात केंव्हा पासुन लागू झाली?

● 1973 च्या अर्थसंकल्पातून ही पहिली प्रणाली आमलात आणली गेली होती. नंतर दरवर्षी यातसुधारणेची भर पडत गेली. शेवटी करनिर्धारण वर्ष 2011 - 12 च्या कलम 2 (2) आणि कलम 2 (13) तथा अर्थसंकल्प 2011 च्या पहिल्या शेडयुलच्या पार्ट चारमध्ये याचा समावेश झाला आहे.

प्रश्न - शेतीच्या उत्पन्नावर करदात्यासटॅक्स लागण्यासाठी महत्वाच्या किती अटी पूर्ण करव्या लागतात?

या साठी करदात्यास सुरुवातीस महत्वाच्या दोन अटी पूर्ण कराव्या लागतात.

**प्रश्न** - त्या दोन अटी कोणत्या?

● त्या दोन अटी खालील प्रमाणे आहेत.

1) पहिली अट म्हणजे करदात्यास 5000/- (पाचहजार रुपया पेक्षा) जास्तीचे शेती चे उत्पन्न त्या संबंधीत वर्षात असावे. तथा

2) दुसरी अट म्हणजे करदात्यास त्या वर्षात 2,50,000/- (अडीचलाख) पेक्षा जास्त असावे (शेतीचे सोडून) म्हणजेच कर निर्धारण वर्ष 2024 - 25 साठी 2,50,000/- पेक्षा जास्तीचे शेतीव्यतिरिक्त दुसरे उत्पन्न असावे.

**प्रश्न** - इन्कमटॅक्स कायद्यात शेतीचे उत्पन्न

## सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

म्हणजे नेमके काय?

● भारतात शेतीचे उत्पन्न म्हणजे खालील दोन गोष्टींचा सामवेश आहे.

कोणतेही उत्पन्न जे भारतातील शेती पासुन करदात्यास मिळते.

● दुसरी बाब म्हणजे हे उत्पन्न खालील तीन बाबी पैकी कुठल्याहीएक बाबी पासुन प्राप्त झालेले असले तरी ते उत्पन्न शेती चेउत्पन्न म्हणून शेतीच्या कायदेशीर परिभाषेत मोजले जाते.

1) यात पहिली बाब म्हणजे हे उत्पन्न शेती पासुन मिळालेले पाहिजे किंवा

2) ज्यांनी शेती केली आहे त्यांनी नैसर्गिक प्रक्रिया जी मार्केट मध्ये माल नेण्यासाठी आवश्यक आहे, किंवा

3) विक्री करण्यासाठी जे माल उत्पादन केले आहे त्यास काही विशेष प्रक्रिया केलेली नसावी. वर clause 2 मध्ये आवश्यक असलेली प्रक्रिया केली तर त्यास काही आपत्ती नाही.

म्हणजेच यास सोप्या भाषेत असे ही म्हणता येईल की शेतकऱ्याने माल पिकवुन बाजारात नेणे हे शेती च्या परिभाषेत येते परंतु त्यांनी विशेष प्रक्रिया करून (उदाहरणार्थ शेतातला सोयाबीन विकून आलेले उत्पन्न शेतीचे उत्पन्न आहे परंतु शेतात सोयाबीनचे तेल काढून विकले तर ते शेतीचे उत्पन्न नाही) जर माल बाजारात नेला तर ते माल शेती च्या परिभाषेत बसणार नाही. याचाच साधा अर्थ असा की तो माल शुद्ध शेतकऱ्याचा असावा.

हे आपण पुढील लेखापासुन सउदाहरण बघणार आहोत, म्हणजे शेती च्या उत्पन्नाची कायदेशीर परिभाषा समजवण्यात मदत होईल. सुप्रीम कोर्ट यांनी कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध राजा बेनॉय कुमार साहस रॉय मध्ये परिणाम कारक निर्णय दिलेला आहे. त्यात कोणत्या प्रक्रिया शेतीच्या अंतर्गत येतात आणि कोणत्या प्रक्रिया म्हणजे प्रतिक्रिया शेती च्या परिभाषेत येत नाही या बद्दल मार्गदर्शन केलेले आहे.

**प्रश्न** - शेतीचे उत्पन्न मानण्यासाठी शेती किंवा जमीन खेड्यातच असावे आवश्यक आहे का?

● शेतीचे उत्पन्न मिळविण्यासाठी शेती ही ग्रामीण भागतच असली पाहिजे असे काही नाही. शेती साठी खेडे, किंवा शहरी भाग असे काही संबंध नाही. असे मत सुप्रीम कोर्ट यांनी कमिश्नर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध कॅरयु एन्ड कम्पनी लिमीटेड (1970) 120 यात स्प्ट सांगीतले आहे. यात म्हत्वाची अट अशी आहे की शेती ही भारतातच असावी, भारताबाहेर नसावी.

परंतु काही अटी आहेत, जे पुढील आठवड्यात आपण बघणार आहोत की भारतात परदेशी नागरिकाची शेती असेल तर त्यास शेतीचे उत्पन्न मानले जाते का? भारतीय नागरिकाची शेती विदेशात असेल तर त्यास शेतीच्या उत्पन्नाची मान्यता आहे का? त्याशिवाय शेतीच्या बाबीबद्दल चर्चा करणार आहोत जी अत्यंत उपयोगी ठरेल.

----------------

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए.आकाश जी. मुंदडा
जालना.

## अशोकायन

### उतावळा नवरा..?

भावी मुख्यमंत्री म्हणून
निकालापुर्वीच
पोष्टर झळकले
निकाल लागल्यावर
कोण तोंडघसी पडले?

युतीमध्ये आहोत
याची असु द्या जाण
पोरकट विधाने करून
का घालवता बरे शान?

चहा पेक्षा किटली गरम
म्हणवा आहे खरा
सबुरीका फल मिठा होता है
बेछुट विधानांना आवरा..



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# यार्डले लंडनने कल्याणी प्रियदर्शनला नवीन ब्रँड अम्बॅसडर नेमून आपली टॅल्कम पावडरची श्रेणी पुन्हा लॉन्च केली



**मुंबई, २३ नोव्हेंबर :** यार्डले लंडन या २५४ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या सुगंध आणि पर्सनल केअर ब्रँडने त्यांची ओळख असलेली परफ्यूम्ड ब्युटी टॅल्क श्रेणी पुन्हा सहर्ष लॉन्च केली आहे. आकर्षक आणि काळास अनुरूप असलेल्या डिझाईनचे हे कलेक्शन अशा रीतीने तयार करण्यात आले आहे की, ते आजच्या आधुनिक, महत्त्वाकांक्षी स्त्रियांना आकर्षित करेल आणि त्याच वेळी यार्डलेची शालीनतेची आणि गुणवत्तेची परंपराही जपेल.

दक्षिण भारतीय चित्रपटांत आपल्या सौंदर्याबद्दल ओळखली जाणारी कल्याणी प्रियदर्शन यार्डले टॅल्क रेंजचा नवीन चेहरा बनली आहे. तिचे स्वाभाविक सौंदर्य यार्डलेच्या शाश्वत सुसंस्कृततेस पूरक ठरणारे आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीव्हीसी मध्ये यार्डले टॅल्क तिचा आत्मविश्वास वाढवून दिनचर्या कशी उन्नत करते हे दाखवून कल्याणी पुढे जाण्याच्या प्रगतीच्या कल्पनेचे उदाहरण सादर करते. तिची मोहकता, शक्ती आणि आत्मविश्वास यामधून यार्डलेची मूल्ये झळकतात आणि महिलांना आत्म-जागरूकता करून देऊन स्व-अभिव्यक्तीसाठी प्रेरित करतात.

या टीव्हीसी मध्ये सुरुवातीला कल्याणी आपल्या मैत्रिणीशी एका सौंदर्य स्पर्धेविषयी चॅटिंग करताना दिसते. चॅट करत असताना ती यार्डले टॅल्क लावते ज्यामध्ये नैसर्गिक तेज आणि दीर्घ काळ टिकणारा सुगंध प्रदान करणाऱ्या ९७% नैसर्गिक इनग्रेडीएंट्सना हायलाइट करण्यात आले आहे. सौंदर्य स्पर्धेच्या ठिकाणी ती आत्मविश्वासाने पावले टाकते आणि सगळ्यांचे लक्ष वेधून घेते. एक ज्युनिअर मॅनेजर तिला चुकून स्पर्धकच समजते, पण कल्याणी हसत हसत खुलासा करते की, ती फक्त तिकडे प्रेक्षक म्हणून आली आहे. तिचे सौंदर्य आणि आत्मविश्वास पाहून ती प्रभावित झालेली दिसते. या दृश्यातून हेच दाखवले आहे की, कशा रीतीने यार्डले महिलांना पुढचे पाऊल टाकण्यास आणि आत्मविश्वासाने वावरण्यास मदत करते.

नवीन अम्बॅसडर आणि सशक्त संदेश लाभलेली यार्डलेची परफ्यूम्ड ब्युटी टॅल्क आता एका आकर्षक आधुनिक पॅकेजिंग मध्ये आली आहे, ज्यातून या ब्रँडची जागतिक ओळख आणि स्थायी वारसा व्यक्त होतो. ९७% नैसर्गिक इनग्रेडीएंट्सपासून बनलेली ही पावडर दीर्घ काळ टिकणारा फुलांचा सुगंध प्रदान करून त्वचेस तेज देते आणि दैनंदिन दिनाचर्येला लक्झरीची जोड देते. ही पावडर व्हीगन, क्रौर्य-मुक्तआणि पॅराबेन्स व सल्फेट्स मुक्त आहे, त्यामुळे दैनंदिन वापरासाठी सौम्य आहे. यार्डलेचा विशिष्ट सुगंध त्यात आहे. ही पावडर नैसर्गिक सौंदर्य वाढवते आणि स्टाइल आणि आत्मविश्वास देते व यूझरला पुढचे पाऊल टाकण्यास, जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यास प्रोत्साहन देते.

या नवीन यार्डले लंडन ब्युटी टॅल्क रेंजमध्ये इंग्लिश लव्हेंडर, इंग्लिश रोझ, मॉर्निंग ड्यू, रॉयल रेड रोझिस आणि इम्पिरीयल जॅस्मिन सहित ८ प्रकारचे सुगंध आहेत. वेगवेगळ्या गरजांनुसार हे वेगवेगळे सुगंध निवडता येतील. ही पावडर सहजपणे घाम शोषून घेते आणि दिवसभर त्वचा चमकदार आणि सुगंधाने दरवळत ठेवते.

हीरेंज पुन्हा लॉन्च करण्याबाबत टिप्पणी करताना यार्डले इंडिया आणि थायलंडचे सीनियर उपाध्यक्ष आणि बिझनेस प्रमुख श्री. मनीष व्यास म्हणाले, नवीन पॅकेजिंग आणि सुधारित परफॉर्मन्ससह यार्डलेचे जागतिक स्तरावर पुन्हा लॉन्चिंग होत आहे. भारतात, आम्ही टॅल्कम पावडर, साबण आणि हँडवॉश द्वारे सुरुवात केली आहे आणि पाठोपाठ डीओ आणि परफ्यूम देखील रीलॉन्च करणार आहोत. आमच्या २५४ वर्षांच्या दीर्घ परंपरेचा सन्मान जपत आजच्या स्त्रीला आत्मविश्वासाने पुढे पाऊल टाकण्यास प्रवृत्त करणारी जागतिक दर्जाची उत्पादने देण्याबाबतची आमची वचनबद्धता कायम आहे. ९७% नैसर्गिक इनग्रेडीएंट्स, प्रीमियम पॅकेजिंग आणि व्यापक श्रेणी यांच्या बळावर आम्हाला खात्री वाटते की, उपभोक्ते नवीन यार्डले ऑफरिंगचे प्रेमाने स्वागत करतील.

यार्डले लंडन त्यांच्या नवीन ब्युटी टॅल्क श्रेणीची शालीनता अनुभवण्यासाठी तुम्हाला आमंत्रित करत आहे. निसर्ग-प्रेरितघटक आणि टिकून राहणारा फुलांचा सुगंध यामधून या रेंजची पुनर्कल्पना करण्यात आली आहे. यार्डलेच्या कालातीत लक्झरीने आपले दैनंदिन ब्युटी रुटीन उन्नत करा. ही उत्पादने आता मोठ्या दुकानांमध्ये तसेच यार्डले लंडनच्या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाइन उपलब्ध आहेत.

## सोनी सबवरील वागले की दुनियामध्ये राजेश आणि सखी वागलेचा एक ड्रग कार्टेल उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न



**मुंबई, २३ नोव्हेंबर :** सोनी सबवरील वागले की दुनिया : नई पीढी नए किस्से ही मालिका वागले या मध्यमवर्गीय कुटुंबाचा दैनंदिन संघर्ष आणि त्यांचे यशापयश दाखवते. आगामी भागांमध्ये लहान मुलांना प्रलोभन दाखवून ड्रग तस्करीच्या जाळ्यात कसे ओढले जाते या समस्येला स्पर्श केला आहे.

राजेश (सुमित राघवन) च्या ऑफिसमध्ये मादक पदार्थांनी भरलेल्या चॉकलेट्सचे पॅकेट येते आणि येथून कथेला एक धक्कादायक वळण मिळते.पोलीस या मादक चॉकलेट्सचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न करतात, तर राजेश आणि सखी (चिन्मयी साळवी) देखील त्या रहस्यमय पार्सलच्या मागचे सत्य उघडकीस आणण्याची धडपड करतात. एक दिवस सखीला अचानक भूतकाळातील एक परिचित चेहरा दिसतो-करण! करण (झैन नाबिल) हा पूर्वी एक जर्मन एक्स्चेंज विद्यार्थी होता आणि एक्स्चेंज प्रोग्राम दरम्यान तो वागले कुटुंबात आला होता. पुढे हे धक्कादायक सखीच्या पुढे येते की करणनेच ते रहस्यमय पार्सल पोहोचवलेले असते. तो नंतर हे कबूल करतो की तो एका ड्रग कार्टेलमध्ये अडकला आहे. त्याला धमक्या देऊन, ब्लॅकमेल करून त्याच्याकडून पार्सलची डिलिव्हरी करण्याचे काम करून घेतले जात आहे.

आता वागले कुटुंबियांपुढे दोन मिशन आहेत. एक म्हणजे, ते कार्टेल आणि ड्रगची डिलिव्हरी थांबवणे आणि दुसरे म्हणजे करणला या कठीण परिस्थितीतून बाहेर काढणे. या आव्हानात्मक मिशनमध्ये राजेश आणि सखी यशस्वी होतील का?

राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, या कथानकातून वर्तमान काळातील एका भयंकर समस्येवर प्रकाश टाकण्यात आला आहे. हा मुद्दा आहे ड्रग तस्करीचा. निरागस लोकांना यात ओढले जाते आणि हा धंदा खूपच हातपाय पसरू लागला आहे. हे एक चांगले कथानक आहे आणि आम्हाला आशा आहे की या कथेमुळे लोकांमध्ये जागरूकता येऊन ड्रग विरोधी लढा सशक्त होईल. या मालिकेत वागले कुटुंबात असतानाही करण नेहमीच अडचणीत सापडताना दाखवला आहे. कसे कोण जाणे पण नेहमीच तो आपल्यासोबत संकट घेऊन येतो. पूर्वी सखी त्याला खूप आवडू लागते, ज्या कारणाने वागले कुटुंब चिंतित झाले होते आणि आता मादक पदार्थयुक्त चॉकलेट्सच्या डिलिव्हरीत तो अडकला आहे.

## अ‍ॅग्रोव्हिजन २०२४ मध्ये ओळख करून घ्या स्वराज ट्रॅक्टर्सच्या नवनवीन उत्पादनांशी



**नागपूर, २३ नोव्हेंबर:** भारतातील एक प्रमुख आणि वेगाने वाढणारा ब्रँड आणि महिंद्रा समूहाचा एक भाग, स्वराज ट्रॅक्टर्स, PDKV ग्राउंड, ढाबा, नागपूर येथे २२ ते २५ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या ॲग्रोव्हिजन प्रदर्शनाच्या १५ व्या आवृत्तीत आपले उत्कृष्ट ट्रॅक्टर आणि अवजारे प्रदर्शित करण्यासाठी सज्ज आहे. शेतकरी आणि नागरिक स्टॉल क्रमांक OD07 वर स्वराजची उत्पादने पाहू शकतात.

या प्रदर्शनात स्वराज 744 FE (4WD), 742 XT, लाइटवेट कॉम्पॅक्ट स्वराज टार्गेट ६३०, स्वराज Zlx + गायरोव्हेटर आणि स्वराज मिनिस्टार ड्युरावेटर + यासह स्वराजची नावीन्यपूर्ण आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत उत्पादने सादर केली जातील.

आधुनिक शेतीच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या ट्रॅक्टरची रचना ही स्वराजची बांधिलकी दर्शवते. प्रदर्शनातील पाहुण्यांना या ट्रॅक्टरचे जवळून परीक्षण करण्याची तसेच स्वराजच्या टीमकडून महत्त्वाची माहिती मिळवण्याची अनोखी संधी मिळेल.

## सोनीसबवरील श्रीमद् रामायण मालिकेत लव आणि कुश यांनी अजिंक्य हनुमानाला युद्धात हरवले

**मुंबई, २३ नोव्हेंबर :** सोनी सबवरील श्रीमद् रामायण या भव्य मालिकेत श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांची दिव्य कथा सांगितली आहे. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, लव (शौर्य मंडोरिया) आणि कुश (अथर्व शर्मा) यांनी अश्वमेधाचा घोडा रोखला. जेव्हा त्या अश्वाला मुक्त करण्यासाठी शत्रुघ्न (सामर्थ्य गुप्ता) आला, तेव्हा लव-कुशच्याजोडगोळीने त्याला युद्धात परास्त केले.

पुढील भागांमध्ये प्रेक्षक बघतील की हनुमान (निर्भय वाधवा) शत्रुघ्नच्या पराजयाची बातमी ऐकून आश्रमात जाऊन त्या दोघा भावांना भेटायचे ठरवतो. तिकडे त्याला सीता मातेचे दर्शन होते आणि हे उमगते की लव आणि कुश हे तिचे पुत्र आहेत. सीतेला भेटून हनुमान आनंदित होतो, पण दुष्ट सहस्रमुख रावण (प्रणीत भट्ट) अश्वमेधाचा घोडा चोरण्यासाठी एक कुटिल योजना आखतो. त्यामुळे मोठा गैरसमज उभा होतो. आणि त्यानंतर लव-कुशआणि हनुमान यांच्यात युद्ध होते! हनुमानाच्या पराभवाच्या बातमीने लक्ष्मणाला धक्का बसतो. सामर्थ्यशाली हनुमानाचा पराभव करण्याचा हा मोठा पराक्रम गाजवणारी ही मुले कोण आहेत हे शोधून काढण्यासाठी तो उतावळा होतो.

श्रीमद् रामायण मध्ये हनुमानाची भूमिका साकारत असलेला निर्भय वाधवा म्हणतो, लव-कुश हे राम आणि सीतेचे पुत्र आहेत हे सत्य उघड करणारा क्षण हनुमानासाठी खूप भावुक करणारा आहे. अजिंक्य असूनही हनुमान लव-कुशसमोर युद्धात हरतो. त्यामुळे या दोन छोट्या योद्ध्यांच्या सामर्थ्याबाबत राम आणि लक्ष्मणाच्या मनात कुतूहल निर्माण होते. ही दोन मुले श्रीरामाच्या कुटुंबातील असल्याचे कळल्यानंतर हनुमानाचे अंतःकरण आनंद आणि अभिमानाने भरून जाते. या दृश्यात नियंतीची ताकद आणि कौटुंबिक नात्याचे चिवट बंध सुंदर प्रकारे व्यक्त झाले आहेत. आपल्या आराध्य दैवताच्या पुत्रांकडून हनुमान विनम्रपणे हार स्वीकारतो, हा सुंदर क्षण पडद्यावर साकारायला मिळणे हे माझे भाग्य आहे.

## सा रे ग म प च्या मंचावर महाऋषीला लाल गुलाब भेट देताना जयाप्रदा यांनी काढली स्वर्गीय ऋषी कपूर यांची आठवण!



**मुंबई, २३ नोव्हेंबर :** भारताचा सिंगिंग रिॲलिटी शो झी टीव्हीवरील सा रे ग म प हा आपल्या कला, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या अचूक मिलाफासह प्रेक्षकांचे मनोरंजन करत असून जसजसे ह्या स्पर्धेतील वातावरण तापत आहे, तसतसा अख्खा देश आपल्या स्क्रीन्स आणखी खिळून बसत आहे, आपल्या आवडत्या स्पर्धकांसाठी चीअर करत आहे आणि मेंटॉर्स सचिनजिगर, सचेत परंपरा आणि गुरू रंधावा यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या भावी गायकांच्या कलेला धार येताना पाहत आहे. त्यांचे कसलेल्या परफॉर्मर्समध्ये होणारे रूपांतर पाहणे हा खरंच एक वेगळा अनुभव आहे. अर्थात, हे तरूण कलाकार सातत्याने मेंटॉर्स आणि प्रेक्षकांना आपल्या निव्वळ सांगितिक हुशारीने थक्क करत आहेत.

आगामी भागामध्ये सा रे ग म प मध्ये जुन्या आठवणी आणि संगीतमय सर्वोत्तमतेचा सोहळा पाहायला मिळेल. ह्या भागामध्ये ख्यातनाम अभिनेत्री जयाप्रदा विशेष अतिथीच्या रूपात दिसून येतील आणि चित्रीकरणाच्या वेळेस आपल्या अनेक आठवणी आणि जुन्या गोष्टींनी सर्वांचे मनोरंजन करतील. तुझ संग प्रीत आणि पतझड सावन बसंत बहार ह्या गीतांसह स्पर्धक महाऋषी सनत पंड्या सर्वांचे मन जिंकेल. त्याच्या परफॉर्मन्सने प्रभावित होऊन जयाजी यांनी सांगितले की कसे त्यांना महाऋषीमुळे ऋषी कपूर आणि त्यांच्यासोबत जोडलेल्या अनेक आठवणींची आठवण होत आहे. अनेक आयकॉनिक चित्रपटांमध्ये ऋषीजी त्यांचे सहकलाकार राहिले होते. पण एवढेच नाही, जयाजींनी महाऋषीला एक लाल गुलाब भेट म्हणून दिला आणि आपण त्याच्या फॅन असल्याचेही नमूद केले.

जया प्रदा म्हणाल्या, हा परफॉर्मन्स अतिशय सुंदर होता महाऋषी. तुझा आत्मविश्वास पाहून मी थक्क झाले. मी तुझी खरंच फॅन आहे. तू मला आज ऋषीजींची आठवण करून दिलीस. मला त्यांची खूप आठवण येते आणि आज तुझ्या माध्यमातून ह्या मंचावर ते असल्यासारखे मला वाटले. त्या पुढे म्हणाल्या, मी असं ऐकलं आहे की ऋषीजींप्रमाणे तुझ्याही अनेक मुली चाहत्या आहेत. ऋषीजी एक उत्तम डान्सर होते आणि त्यांच्या ऊर्जेसोबत जुळवून घेणे हे नेहमीच एक आव्हान होते. पण आज तुला पाहताना मंचावर पाहताना त्या सगळ्या गोड आठवणी जाग्या झाल्या. त्यामुळे मी तुझे आभार मानते.

जयाजींनी ऋषीजींसोबतच्या काही हृदयस्पर्शी आठवणीही सांगितल्या, पण त्यांनी पुढे जे काही केले ते पाहून सगळे थक्क झाले. जयाजींनी स्पर्धक पार्वतीला त्यांचा सरगम चित्रपटातून लूक घ्यायला लावला. पार्वतीने पर्बत के उस पार ह्या गाण्यावर परफॉर्म करून ह्या सदाबहार अभिनेत्रीला आदरांजली प्रदान केली आणि जयाजींची प्रशंसा मिळवली. मात्र, जसे त्यांना वाटले की पार्वती तो लूक घेऊ शकेल, तसे त्यांनी तिला त्याचा गेटअपही घ्यायची विनंती केली आणि सा रे ग म प स्पर्धक पार्वतीने ते अगदी नीट पार पाडले.

जया प्रदा म्हणाल्या, हा लूक सरगममधील माझा पहिला शॉट होता. ह्या चित्रपटाने ह्या उद्योगामध्ये माझ्या चार दशकांच्या दीर्घ करिअरची सुरूवात होती.

जया प्रदा यांच्या प्रशंसेमुळे महाऋषी धन्य झाला आणि पार्वतीच्या लूकमुळे जयाची आठवणींमध्ये हरवून गेल्या, त्याचसोबत आगामी भागांमध्ये अविस्मरणीय परफॉर्मन्सेस पाहायला विसरू नका.

## तेनाली रामासाठी अभिनेता कृष्ण भारद्वाजने केले टक्कल

**मुंबई, २३ नोव्हेंबर :** एखादी महान व्यक्तिरेखा पडद्यावर जिवंत करणे ही काही सोपी गोष्ट नाही. ते करण्यासाठी पॅशन, निष्ठा आणि कधी कधी धाडसी बलिदान करावे लागते. अभिनेता कृष्ण भारद्वाज तेनाली रामा ही महान व्यक्तिरेखा साकारत आहे, त्यासाठी त्याने पुन्हा एकदा आपल्या निष्ठेचा प्रत्यय दिला आहे आणि व्यक्तिरेखा अस्सल दिसण्यासाठी आपल्या केसांचे पूर्ण टक्कल केले आहे.

ही मालिका पुनरागमन करत आहे आणि प्रेक्षक तेनाली रामाचे चातुर्य, त्याची सुजाणता आणि मोहकता पुन्हा अनुभवण्यास उत्सुक आहेत. शूटिंग करताना कृष्णने केलेल्या कायापालटामुळे ते पात्र तर अस्सल वाटू लागलेच पण त्याच्या या कृतीतून या भूमिकेविषयीची कृष्णची एकात्मता दिसून आली.

पुन्हा एकदा तेनाली रामाची भूमिका करण्यास सज्ज असलेल्या कृष्ण भारद्वाजने सांगितले, मी स्वतः ब्राह्मण कुटुंबात जन्मलो आहे आणि घरात काही दुःखद प्रसंग घडल्याखेरीज टक्कल करण्यास अनुमती नसते. मला आठवते आहे, पहिल्या सीझनच्या वेळेस जेव्हा मी टक्कल केले, तेव्हा मी घरच्यांना न सांगता तसे केले होते. अगदी शूटिंग सुरू होण्याच्या अगोदर मी त्यांना सांगितले होते. त्यावर माझी आई म्हणाली होती, हे अशुभ आहे! पण अर्थात माझ्या कामासाठी याची गरज आहे हे तिला माहीत होते, त्यामुळे तिने माझ्या निर्णयाला पाठिंबा दिला.

## लोकप्रिय टेलिव्हिजन अभिनेत्री श्रद्धा आर्या कुंडली भाग्यला देत आहे हृदयस्पर्शी निरोप

**मुंबई, २३ नोव्हेंबर :** एक पर्व जणू संपत आले आहे कारण गेली ७.५ वर्षे कुंडली भाग्य चे हृदय आणि आत्मा असलेली श्रद्धा आर्या अधिकृतपणे ह्या मालिकेचा निरोप घेत आहे. प्रीता म्हणून ओळखली जाणारी श्रद्धा आर्या आपल्यामागे जगभरातील लाखो चाहत्यांच्या मनाला स्पर्श करणारा वारसा सोडून जात आहे. आपल्या आयुष्यात एक नवीन धडा सुरू करत श्रद्धाने हल्लीच आपल्या गर्भारपणाची गोड बातमी सर्वांसोबत वाटली होती आणि त्यामुळे तिचा नवीन पर्वातील प्रवेश आणखी खास आणि मनस्पर्शी ठरणार आहे.

श्रद्धा आर्या म्हणाली, कुंडली भाग्यला निरोप देणे हे एक पर्व संपल्यासारखे आहे हा धडा गेली ७.५ वर्षे माझ्या आयुष्यात सुरू होता. आयुष्यातील काही गोष्टी जणू डिफॉल्ट सेटिंगसारख्या बनून जातात आणि माझ्यासाठी ही मालिका अगदी तीच होती. कुंडली भाग्य हे माझे केवळ काम नव्हते तर हा माझ्या आयुष्याचा एक कधीही विभक्त न होणारा भाग बनली. प्रीता मी आहे, मी प्रीता आहे आमचा प्रवास एकमेकांमध्ये असा काही गुंतलेला आहे ज्याचा विचारही कधी केला नव्हता. ह्या मालिकेने मला अनेक आठवणी, एक कुटुंब आणि अनन्यसाधारण प्रेम दिले आहे. मी ह्या मालिकेत आईची भूमिकाही साकारली आहे आणि आता खऱ्या आयुष्यात मातृत्वामध्ये पदार्पण करताना मी जाणवतंय की प्रीताच्या प्रवासाने मला जीवनातील ह्या पर्वासाठी तयार केले. हे जणू आयुष्य कलेचे प्रतिबिंब आहे आणि त्याने मला ते पुन्हा जगण्याची संधी दिली. ज्या काही भावना मी साकारल्या आहे, ऑनस्क्रीन जे काही जी काही आव्हाने पेलली आहेत, त्यामुळे माझ्या स्त्रीत्वामध्ये योगदान मिळाले आहे. ग्लॅमरस पोशाखांपासून भावनिक चढउतारांपर्यंत हा प्रवास कुठल्याही जादूपेक्षा कमी नव्हता जणू काही खऱ्या आयुष्यातील परीकथा. मी एकता कपूर, माझे सहकलाकार आणि माझ्या सर्व तंत्रज्ञांचे आभार मानते की त्यांनी मला हा सुंदर अनुभव प्रदान केला. त्यांनी अशी जागा निर्माण केली जिथे मी शिकू शकले, वृद्धिंगत होऊ शकले आणि माझा उत्कर्ष होऊ शकला. मी नेहमीच प्रीता राहिन, ती माझा आत्मा, माझी ओळख आणि माझे हृदय आहे. कुंडली भाग्य तू मला केवळ लोकप्रियतेपेक्षा खूप काही दिलं आहेस. तू मला परिवार दिला आहेस, असंख्य आठवणी दिल्या आहेस आणि एक गोष्ट दिली आहे जी आयुष्यभर माझ्या हृदयाच्या निकट राहिल. आयुष्य पुढे मला जिथे कुठे घेऊन जावो, तू कायम माझा हिस्सा राहशील.

श्रद्धाचा प्रीता म्हणून प्रवास प्रेक्षकांच्या हृदयात राहिल, ज्यांना तिच्या व्यक्तिरेखेसोबतचे प्रत्येक वळण, आणि यश आवडले. कुंडली भाग्य सोबत तिचे असणे हे केवळ तिच्या कामापेक्षा कितीतरी अधिक होते, हा विकास, यश आणि सखोल भावनिक नात्यांचा असाधारण प्रवास होता.

चाहते तिच्या ह्या आयकॉनिक व्यक्तिरेखेला निरोप देताना ती तिच्या खासगी आणि प्रोफेशनल आयुष्यात उलगडणाऱ्या नवीन धड्यांसाठी ते उत्सुक आहेत.

## टाटा ॲसेट मॅनेजमेंटचा नवा टाटा इंडिया इनोवेशन फंड ; सर्व क्षेत्रांमध्ये नावीन्यपूर्णतेतून होणाऱ्या वृद्धीचे लाभ मिळवण्याचे उद्दिष्ट

**मुंबई, २३ नोव्हेंबर :** टाटा ॲसेट मॅनेजमेंटने टाटा इंडिया इनोवेशन फंड लॉन्च केला आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नवीन धोरणे आणि संकल्पना अंमलात आणून लाभ मिळवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवली वृद्धीच्या संधी गुंतवणूकदारांना प्रदान करणे हे या फंडाचे उद्दिष्ट आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये यशस्वी आणि वृद्धीला पूरक अशा दोन्ही प्रकारच्या नावीन्यपूर्णतेमध्ये प्रयत्नशील कंपन्या आहेत, ज्या आपापल्या क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी वचनबद्ध आहेत. क्रांतिकारी नावीन्य परिवर्तनकारी प्रगतीला प्रोत्साहन देते, संपूर्णपणे नव्या बाजारपेठा तयार करते, वृद्धीला पूरक नावीन्य वर्तमान उत्पादने, सेवा, प्रक्रियांमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा घडवून आणते.

परिवर्तनकारी नावीन्य घडवून आणण्यात आघाडीवर असलेल्या, संशोधन आणि विकास, मशीन लर्निंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डिजिटल परिवर्तन यासारख्या तंत्रज्ञानाचा लाभ घेणाऱ्या कंपन्यांना टार्गेट करण्याचे टाटा इंडिया इनोवेशन फंडचे धोरण असेल.

भारतातील आर्थिक सेवा उद्योगक्षेत्राने देशात नवे डिजिटल युग आणण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरचा उपयोग केला आहे, त्यामुळे देशभरात आर्थिक समावेशाचा विस्तार झाला आहे. ग्लोबल क्लायमेट ॲक्शन स्टँडर्ड्सनुसार, भारतातील इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही), बॅटरी तंत्रज्ञान आणि नूतनीकरणीय ऊर्जा क्षेत्रांमध्ये गुंतवणूक व विकासाची गती वाढत आहे. त्यासोबतच फार्मास्युटिकल आणि हेल्थकेयर क्षेत्रांमध्ये संशोधन आणि विकास गुंतवणूक, संशोधन आणि उत्पादन यांचे एक जागतिक केंद्र म्हणून भारताची ओळख निर्माण होत आहे.


त्याखेरीज भारत सरकारच्या 'वोकल फॉर लोकल' धोरणाने आणि विकासाला अनुकूल उपाययोजनांनी ग्लोबल इनोवेशन इंडेक्समधील देशाच्या रँकिंगमध्ये लक्षणीय सुधारणा झाल्या आहेत. २०१५ मध्ये ८१ व्या स्थानावर होता आणि २०२४ मध्ये ३९ व्या स्थानावर पोहोचला आहे. या अनुकूल वातावरणामुळे नावीन्याला प्राधान्य देणाऱ्या कंपन्यांना लाभ मिळण्याची शक्यता आहे (स्रोत: वर्ल्ड इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी ऑर्गनायजेशन, आयपी इंडिया, टाइम्स हायर एज्युकेशन)

फंडच्या लॉन्च प्रसंगी टाटा ॲसेट मॅनेजमेंटचे चीफ बिझनेस ऑफिसर श्री आनंद वरदराजन यांनी सांगितले, गुंतवणुकीमध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात: एक म्हणजे अशी कंपनी ओळखणे जी पुढील १० पेक्षा जास्त वर्षे चालेल आणि दुसरे म्हणजे पुढील दशकामध्ये पैसे कमवण्याची त्या कंपनीची क्षमता. यापैकी फक्त एक गोष्ट असणे पुरेसे नसते. कंपन्यांच्या यशामध्ये इनोवेशनची भूमिका खूप महत्त्वाची असते. ही एक अशी गोष्ट आहे जी कंपनीचे अस्तित्व आणि विकास यामध्ये मदत करते. वाढीला पूरक आणि क्रांतिकारी इनोवेशनमुळे हे शक्य होते. इनोवेशनमुळे प्रतिस्पर्धात्मक लाभ आणि पुढे राहण्याची क्षमता मिळते. भारत डिजिटल, उत्पादन आणि सेवा इनोवेशनमध्ये सर्वात पुढे आहे, त्यामुळे अनेक संधी खुल्या झाल्या आहेत. यशस्वी होण्यासाठी आणि वृद्धिंगत होण्यासाठी प्रयत्नशील कंपन्यांमध्ये संधी प्राप्त करणे या फंडाचे उद्दिष्ट आहे.

टाटा ॲसेट मॅनेजमेंटचे प्रमुख गुंतवणूक अधिकारी श्री राहुल सिंह यांनी सांगितले, भारतात आर्थिक, आरोग्य तंत्रज्ञान, ऑटोमोटिव्ह सोल्युशन्स, ग्राहक तंत्रज्ञान आणि त्याहून जास्त डिजिटलीकरणाच्या नेतृत्वामध्ये विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडून येत आहे. ग्लोबल इनोवेशन रँकिंगमध्ये सातत्यपूर्ण वाढीसोबत, आम्ही डिजिटल कॉमर्स, ग्रीन मोबिलिटी, ईव्ही बॅटरी इन्फ्रास्ट्रक्चर, स्पेस टेक आणि प्रगत आरोग्य सेवा यासारख्या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण पावले उचलत आहोत. टाटा इंडिया इनोवेशन फंड या परिवर्तनाचे लाभ मिळवण्यासाठी तयार करण्यात आला आहे. हा फंड गुंतवणूकदारांना नावीन्याच्या लाटेचे नेतृत्व करणाऱ्या विकासामध्ये सहभागी होण्याची संधी देतो.

टाटा इंडिया इनोवेशन फंड बॉटम-अपइनोवेशनवर आधारित स्टॉक निवड दृष्टिकोन स्वीकारेल, जो मूल्यांकन सुविधा आणि विकास क्षमता प्रदान करेल. हा फंड मार्केट कॅप आणि सेक्टर्समध्ये गुंतवणुकीच्या संधी शोधेल. दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी तयार करण्यात आलेल्या या फंडाचा उद्देश भारतातील नावीन्याच्या लाटेमुळे निर्माण होत असलेल्या संधींचा लाभ घेणे हा आहे.

## शब्दकोडे क्रमांक १९८१



**आडवे शब्द :-**
१) प्रचंड सेनासमूह
५) साटेलोटे
८) गगन
११) दिवस
१२) खिडकी
१४) उपयोग
१५) हक्क सांगणारा, वैरी
१७) एक नृत्यप्रकार
१८) पर्वत
१९) परंपरावादी
२०) पार्वती
२३) मुदतीविषयीचा करार, वचन
२४) गंध
२५) तडीपार
२६) गणपती
२८) पृथ्वी
३०) घाव, प्रहार
३१) प्रश्न
३३) गोमाता
३४) मिठाई तयार करणारा
३६) नटबोल्ट घट्ट करण्याचे साधन
३७) अकबराच्या दरबारातील नऊ
४०) आभास, भ्रम
४१) पटकन
४२) ढग, दाट
४३) स्तुतीस्तोत्र, स्तुती
४५) अक्षरापुढची उभी रेघ
४६) शिखराचे टोक
४७) आकाशयान
४९) खास उल्लेखनीय हकिगत
५२) दृष्टिभेट
५४) वड, समाजातील पत
५५) शरीर
५६) होकारच्या विरुद्ध
५७) क्षुल्लक, नीच, तेजोहीन
५९) घरातील मोठ्या स्त्रीचे एक संबोधन
६०) विद्या
६१) मारल्याची उमटलेली खूण
६२) घर
६३) रस्ता
६४) किंचित कडू चव
६६) भडीमार, वर्षाव
६७) बासरी
६८) भित्रा
६९) तात्काळ
७०) व्यापारातील फायदा
७१) शपथ

**उभे शब्द:-**
१) रुग्णालय
२) इंजेक्शन मधील द्रव
३) पोते
४) कागद, कापडाचा ओला गोळा
५) पंधरवडा, बाजू
६) तपासणी करणारा
७) उत्कर्षाचा काळ
८) कुंभाराची भट्टी
९) एक कर्णभूषण, तुकडा
१०) लाज
१३) उत्तराधिकारी
१६) गतिमान
१७) रात्रीचा पाऊस
२०) पूजा आराधना
२१) संगीतातील एक राग
२२) मौज
२६) प्रस्थान करणे
२७) शहर
२९) धैर्य, हिंमत
३०) खराब
३२) बारीक सारीक
३५) लायब्ररी
३६) पर्ण
३८) चालू काळ
३९) त्रासलेला
४०) अवधान, चित्त
४२) दरी
४४) वस्त्र, कापड
४५) गेरू
४८) दृष्टी
४९) मऊ
५०) सुतासारखी बारीक व लांब असलेला खिरीचा पदार्थ
५१) सहा
५३) उगवत्या सूर्याचा देश
५५) तळे
५६) लोणी
५८) रसाळ
५९) मर्कट
६०) नरमच्या विरुद्ध
६२) सोन्याचा व्यापारी
६४) गाल
६५) कडक
६६) केशवृद्धीची सुगंधी वनस्पती

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# समीर मेघेंचे नेतृत्व मतदारांनी केले मान्य
## ७५ हजारापेक्षा अधिक मतांनी विजय

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

महायुतीचा दणदणीत विजय झाला असुन हिंगणा विधानसभेत महायुतीचे भाजपाचे उमेदवार समीर मेघे यांचा ७५ हजारापेक्षा अधिक मताने विजय झाला आहे. त्यांचा हा विजय त्यांनी हिंगणा विधानसभा क्षेत्रात केलेल्या विकास कामाचा विजय आहे. एक तडफदार नेतृत्व मतदारांनी मान्य केले.

महायुतीचा विजय अभूतपूर्व आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने हे यश मिळवून शिंदे यांचीच खरीखुरी शिवसेना असल्याचे दाखवून दिले आहे. लाडक्या बहिणीने, शेतकऱ्यांच्या हिताचे घेतलेले निर्णय आणि सर्व समाजाच्या सहकार्यामुळे हा ऐतिहासिक विजय मिळाला आहे.

**दिवाकर पाटणे**
**शिवसेना सहसंपर्कप्रमुख, हिंगणा**



महायुतीने अडीच वर्षामध्ये तरूण, शेतकरी, महिला व सर्व घटकाला घेवून समोर गेली व सर्वच स्तरावर चौफेर विकास केला. विशेष म्हणजे लाडकी बहीन योजना, मुलींना शिक्षण माफ, महिलांना बस मध्ये अर्धी टिकीट, शेतकरी कर्जमाफी, विज बिल पूर्ण पणे माफ असे सर्वच चांगले निर्णय आणि कार्यकत्याने बुथ स्तरावर जावून मतदाराना समजावून सांगीतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची साथ, अमित शहा यांची चान्यक्य निती, देवेंद्र फडणवीस यांची रणनीती, चंद्रशेखर बावणकुळे यांची पक्ष बांधनी व विकास पुरुष समीर मेघे यांचे जनसंपर्क व गावो गावी केलेली विकास कामे या जोरावर महायुती चा विजय झालेला आहे.



**सुजित नितनवरे,**
**माजी जिल्हा परिषद सदस्य**

महाविकास आघाडीने विकासकामे रोखण्याचा प्रयत्न केला होता. पण आता विकासकामे थांबवणाऱ्यांना सत्तेपासून लांब ठेवण्याचं काम करा असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला होता. तो मंत्र मतदारांनी आत्मसात केल्यामुळे समीर मेघे यांचा विजय झाला आहे.

**गजानन रामेकर, सरपंच दवलामेटी**



महायुतीने ओपनली मत विकत घेतले आणि मतदार त्याला बळी पडले आहे. मला वाटते आता लोकशाही उरली नाही अशाच पद्धतींनी निवडणुका होणार असेल तर कधी हि परिवर्तन होणार नाही. काही तरी मोठा झोल आहे.

**रुपेश झाडे, उप तालुकाप्रमुख**
**शिवसेना (उबाठा)**



# काटोल विधानसभा क्षेत्रात चरणसिंग ठाकूर विजयी



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २३ :

काटोल विधानसभा मतदारसंघातील शनिवारी पार पडलेल्या मतमोजणीत महायुतीचे भाजपा उमेदवार चरणसिंग ठाकूर यांना विजयाची घोषणा उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक अधिकारी पियुष चिंवडे यांनी केली.

भाजपाचे चरणसिंग ठाकूर यांना 1,03614 मते मिळाली. तर शरद पवार गटाचे सलीले देशमुख यांना 64,298 व एडवोकेट याग्यवलक्य श्रीकांत जिचकार यांना 13,706 मते मिळाली तर शेतकरी कामगार पक्षाचे राहुल देशमुख यांना 6084 मतदान झाले.

काटोल विधानसभा मतदारसंघात पंधराव्या विधानसभेची निवडणुकीत जातीचे राजकारण चालले नाहीत, तर चरणसिंग ठाकूर यांच्या विकास कामाला आणि देवा भाऊ उर्फ देवेंद्र फडणवीस यांचा लाडक्या बहिणींनी भरभरून आशीर्वाद देत, काटोलचे विकास पुरुष चरण सिंग ठाकूर यांना मताधिक्याने विजयी केले.

2019 मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अनिल देशमुख यांना 96,842 मते मिळाली होती तर भाजपाचे चरणसिंग ठाकूर यांना 79,785 मते मिळाली होती. काटोल विधानसभेची निवडणूक कायम चर्चेत असते. राष्ट्रवादीचे अनिल देशमुख ज्या ज्या वेळी जिंकले सरकारमध्ये मंत्री झाले. परंतु काटोल विधानसभा मध्ये विकास होऊ शकला नाही. एकही उद्योग स्थापन करू शकले नाहीत. म्हणून 2024 च्या निवडणुकीत विकास कामांना प्राधान्य देणारे, काटोल विकास पुरुष म्हणून ज्यांची ख्याती आहे असे चरणसिंग ठाकूर यांना भाजपाची उमेदवारी देऊन, काटोल विधानसभा क्षेत्राचा विकास आता मोकळा झाल्याचे जनतेमध्ये एकच सूर होता.

चरण सिंग ठाकूर यांच्या विजयाची घोषणा होताच, त्यांच्या निवास स्थानावरून ढोल ताशा फटाक्याच्या आतिश बाजीत भव्य विजय जुलूस काढण्यात आला. ठिकठिकाणी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

दिनेश ठाकरे, ऊकेशसिंग चौहान, समीर उमप, नरेश अरसडे, किशोर रेवतकर, वैशाली ठाकूर, लक्ष्मी जोशी, अयुबखान पठाण, भूषण ठाकूर, राजेंद्र सरोदे, सुभाष जयस्वाल, नरेंद्रसिंग चौहान, किशोर गाढवे, राजू चरडे, इस्माईल भाई बारूदवाले, सुरेश खसारे, श्याम बारई, उदयसिंग परमाल, इतर काटोल नरखेड विधानसभा क्षेत्रातील हजारो नागरिक सहभागी झाले होते.

### काटोल मध्ये उद्योग व सर्वांगीण विकासाकरिता कटिबद्ध : चरण सिंग ठाकूर

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकास कामाचे अनुकरण करून मी काटोल विधानसभा क्षेत्रामध्ये, उद्योग व सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहेत. जनतेनी व लाडक्या बहिणींनी मला भरपूर मते देऊन, मताधिक्याने विजयी केले, माज्या विकास कामाला निवडले. सर्वांचे ऋण मी काटोल विधानसभा च्या सर्वांगीण विकास आणि उद्योग आणून फेडण्याचा यशस्वी प्रयत्न करील, असे चरण सिंग ठाकूर यांनी व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.

## रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव नागपुरात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव २४ नोव्हेंबरला नागपुरात येत आहेत.२५ नोव्हेंबर रोजी ते नागपूर रेल्वे स्थानकावर रेल्वे प्रवाशांशी संबंधित नवीन ॲपचे उद्घाटन करणार आहे. तसेच या प्रवाशांना त्यांचा प्रवास अधिक सोयीस्कर आणि सुरक्षित करता येणार आहे. यानंतर अजनी येथे आयोजित कार्यक्रमातही रेल्वेमंत्री सहभागी होणार आहेत. यापूर्वी रेल्वेमंत्र्यांचा ऑक्टोबरमधील नागपूर दौरा रद्द झाला होता, त्यानंतर आचारसंहिता लागू झाल्यामुळे ते नागपुरात येऊ शकले नाहीत, त्यामुळे ते रेल्वेच्या कर्मचारी संघटनेच्या वार्षिक अधिवेशनासाठी येत आहे.

# कळमेश्वरात भाजपचा जबरदस्त विजयोउत्सव

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. २३ :

सावनेर कळमेश्वर मतदार संघात गेली 35 वर्षा नंतर डॉ. आशीष देशमुख यांनी सुमारे 40 मतांनी माजी आमदार सुनील केदार यांच्या एकछत्री राजकारणाला सुरुंग लावत विजय प्राप्त केल्याबद्दल येथील स्थानीय बाजार चौकात असंख्य भाजप कार्यकर्त्यांनी ढोल ताशा डीजे चया निनादात फटाक्यांची आतिषबाजी करीत जबरदस्त विजोयउत्सव साजरा केला. तसेच कळमेश्वर ब्राह्मनी शहरात प्रचंड रॅली चें आयोजन करण्यात आले होते.

या रॅली मध्ये डॉ. आशीष देशमुख, डॉ. राजीव पोतदार, अँड. प्रकाश टेकाडे, रमेश मानकर, मिनाताई ताईवाडे, दिलीप धोटे, धनराज देवके, प्रकाश वरुळकर, संदीप उपाध्याय, इमेश्वर यावलकर, यांचे नेतृवात कळमेश्वर सावनेर परिसरातील मोठ्या संख्येने पदधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# फेटरीत समीर मेघे यांच्या विजयाचा जल्लोष

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

फेटरी येथे हिंगणा विधानसभा क्षेत्रातील महायुतीमधील भाजपाचे उमेदवार समीर मेघे यांचा विजयोत्सव शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख दिवाकर पाटने यांच्या नेतृत्वात फटाके फोडून, मिठाई वाटून साजरा करण्यात आला.

यावेळी सुरेश लंगडे, आशिष गणोरकर,सुरेश तोटे ,प्रदीप शुक्ला, अमोल कुरळकर, रत्नाकर लंगडे, विलास श्रीखंडे, प्रकाश लंगडे, मनोज अखंड, हितेश पटेल, संजय बेलेकर, पद्माकर कुरळकर, निलेश कुसरे खुशाल चवरे, रहिष पांडे, नरेंद्र शिंदे, सचिन मेघे उपस्थित होते.



# वाडीत समीर मेघे यांच्या विजयाचा जल्लोष

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २३ :

हिंगणा विधानसभा क्षेत्रातील महायुतीमधील भाजपाचे उमेदवार समीर मेघे यांनी महाविकास आघाडीमधील राष्ट्रवादीचे ( श. प.) रमेशचंद्र बंग यांचा ७५ हजारापेक्षा अधिक मतांनी पराभव केला. भाजपातर्फे वाडीत समीर मेघे यांची शनिवार २३ नोव्हेंबर रोजी जल्लोष रॅली काढण्यात आली.

सर्वप्रथम आमदार समीर मेघे यांनी स्थानीक डॉ.आंबेडकर स्मारक परिसरातील तथागत गौतम बुद्ध , डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिवाजी महाराज स्मारक परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हारार्पण केले. ही रॅली परिसरातून काढत जनसंपर्क कार्यालयात गेली.



यावेळी गुलाल उधळत फटाके फोडण्यात आले. व मिठाईचे वाटप केले.

यावेळी सतीश जिंदल, पुरुषोत्तम रागीट,नरेश चरडे, आनंदबाबू कदम, कैलाश मंथापूरवार, देवराव कडू, गजानन रामेकर, सुजित नितनवरे, राजुताई भोले, सरीता यादव, ज्योती भोरकर, कल्पना सगदेव, केशव बांदरे, दिनेश कोचे, राकेश मिश्रा, मानसिंग ठाकूर, पुरुषोत्तम गोरे, रामप्रसाद पटले, राजेश जिरापूरे, अभय कुणावार, गोविंदराव रोडे, कमल कनोजे, जितेंद्र रहांगडाले, योगेश शेंडे, ईशांत राऊत, अभय कुणावार, रोहीत तिवारी, अक्षय तिडके, अखिलेश सिंग, विक्रम तिजारे, दिलीप चौधरी, दामोधर जोध, संजय अनासाने, सुधीरसिंग राणा, बंडू तिडके, प्रदीप वंजारी, विजय मेंढे, मनोज रागीट, शत्रुघ्न परिहार, जयंत वैद्य, आंनद यादव,कैलाश शर्मा, बबलु ढाकरिया, राजेंद्र तिवारी, लक्ष्मीनारायण केसरवाणी, अनिल भाटीया, राहूल तायडे, लक्ष्मी बैस, मौसमी गुप्ता, नंदा कदम, टिंकु सिंह, मनोरमा येवले, दिपमाला कोचे, सुमन कोचे, कांचन माने, मंगला पडोळे, चंदु कावरे, आकाश पवार यांच्यासह हजारो नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# १९४ आदिवासी गोवारी शहिद जमात बांधवाना वाहिली श्रद्धांजली




■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २३ :

२३ नोव्हेंबर १९९४ ला नागपुर येथे शहिद झालेल्या ११४ आदिवासी गोंडगोवारी जमात बांधवांना आदिवासी गोवारी समाज संघटन कन्हान आणि नागरिकांन द्वारे गोवारी शहिद स्मारक तारसा चौक कन्हान येथे श्रद्धांजली वाहण्यात आली.

गोवारी जमातीला १९५६ च्या सुधारित बिला प्रमाणे गोंड-गोवारीच्या नावाने सर्व शासकिय सेवांचा लाभ मिळावा, यासाठी १९९४ ला आपल्या न्याय हक्क अधिकारासाठी व १९८५ च्या जी. आर. रद्द करण्याचा मागणीसाठी २३ नोव्हेंबर १९९४ ला तत्कालीन महाराष्ट्र राज्याच्या नागपूर हिवाळी अधिवेशना वर काढलेल्या मोर्च्यात अमानुषपणे पोलीसांनी केलेल्या लाठी हल्यात ११४ आदिवासी गोवारी जमात बांधव शहीद झाले.

शनिवार दि.(२३) नोव्हेंबर २०२४ ला तीस वर्ष झाल्याने आदिवासी गोवारी समाज संघटन कन्हान द्वारे गोवारी शहिद स्मारक तारसा चौक कन्हान येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भगवान भोंडे, प्रमुख अतिथि नारद दारोडे, नागपुर जिल्हा ग्रामीण महासचिव आनंद सहारे, तालुका अध्यक्ष नेवालाल सहारे, शहर अध्यक्ष आणि माजी नगरसेवक अनिल ठाकरे सह आदि मान्यवरांचा हस्ते शहिद ताराचंद भोंडे, शहिद करुणा नेवारे यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी २३ नोव्हेंबर १९९४ ला नागपुरात झालेल्या घटने बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात उपस्थित नागरिकांनी गोवारी समाज शहिद स्मारका वर पुष्प अर्पित करुन शहिद झालेल्या ११४ आदिवासी गोंडगोवारी जमात बांधवांना श्रद्धांजली वाहुन अभिवादन केले.

याप्रसंगी गणेश राऊत, मारुती गाते, अरविंद नेवारे, किसन नेवारे, विजेंद्र वाघाडे, नरेश कोहळे, विनोद कोहळे, भाऊलाल बोपचे, नामदेव राऊत, अंशु राऊत, नरेश राऊत, पुंडलीक राऊत, दशरथ कोहळे, अजय नेवारे, आदित्य नारनवरे, योगीता कोहळे, लक्ष्मी सहारे, रेखा राऊत, वंदना शेंद्रे, नंदा मानकर, सिता सहारे, अलिशा सहारे, गीताबाई सोनवाने, कमलाबाई राऊत, बारणबाई नेवारे, सुशीला सोनवाने सह आदि समाज बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# डॉ. आशिष देशमुख यांचा दणदणीत विजय

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. २३ :

महाराष्ट्राची हॉट सीट म्हणून ओळखल्या जाणारा सावनेर विधानसभा मतदारसंघातील हात जीत कडे सर्व महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या सावनेर विधानसभेतुन भारतीय जनता पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ. आशिष देशमुख यांनी माजी मंत्री सुनील केदार यांच्या पत्नी व कॉंग्रेस महाविकास आघाडीचा उमेदवार अनुजा सुनील केदार यांचा 26 हजार 401 मतांनी दारुण पराभव करीत अखेर सावनेर विधानसभा मतदारसंघ सुनील केदार यांच्याकडून हिसकावून घेत त्यांचा तीस वर्षांचा राजकीय बालेकिल्ल्याला खींडार लावले.

भाजपचे उमेदवार आशिष देशमुख आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी निवडणूकीच्या सुरुवातीपासूनच आक्रमक प्रचार शैली अवलंबत निवडणूक प्रचारात आघाडी कायम ठेवली, जी शेवटपर्यंत कायम राहिली, प्रत्येक निवडणुकीप्रमाणेच या निवडणूकीतही काही चमत्कार होईल अशी आशा सुनील केदार यांच्या समर्थकांना होती. मात्र सदर निवडणूकीत तसे काही घडले नाही.

या दणदणीत पराभवामुळे कॉंग्रेसच्या गोटात एकीकडे निराशेचे वातावरण आहे, तर दुसरीकडे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

सावनेर विधानसभेच्या मतमोजणीला सकाळी ७-०० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात सुरुवात झाली जिथे प्रथम पोस्टल मतपत्रिकांची मोजणी करण्यात आली.



ज्यामध्ये भाजपचे आशिष देशमुख यांना आघाडी मिळाली, त्यानंतर ईव्हीएमच्या मतमोजणीला सुरुवात झाली, जिथे आशिष देशमुख यांनी पहिल्या फेरीपासूनच आघाडी घेतली जी शेवटच्या फेरीपर्यंत कायम राहिली. सावनेर विधानसभेच्या सर्व सर्कलमध्ये त्यांनी आपली आघाडी शेवटपर्यंत टिकवत ठेवली.

या विजयासह आशिष देशमुखने 1995 मध्ये वडील रणजितबाबू देशमुख यांच्या पराभवाचा आणि 2009 मध्ये स्वताच्या पराभवाचा सुनील केदार यांच्या पत्नी अनुजाताई केदार यांचा पराभव करून वाचपा काढल्याचे राजकीय वतुर्ळात बोलले जात आहे.

नभुतो न भविष्यतती रैली काढण्यात आली. सकाळी नवं पासूनच डॉ देशमुख यांनी मतांची आघाडी घेतली आहे गांव खेड्यात समजताच खेडे गांवातुन झेंडे बॅनर सह हजारो संख्येने भाजप शिंदे गट व अजितदादा पवार यांचे कार्यकर्ते सावनेर पाम कोर्ट येथील बिजेपी कार्यालयात गोळा होवून दुपारी तीन वाजता ढोल तास्याचा गजरात गुलालाचे उधळण व फटाक्यांची आतिषबाजी करीत सप्नीक दोन ही मुलांसह रॅली काढण्यात आली.

ही रॅली बसस्थानक, गांधी चौक, गडकरी चौक, होती चौक होवून गांधी चौक येथे मतदारांचे आभार मानुन रॅलीची सांगता करण्यात आली.

रॅलीमध्ये डॉ. राजीव पोतदार, मनोहर कुंभारे, रामराव मोवाडे, अँड अरविंद लोधी, अँड शैलेश जैन, राजु भुजाडे राजु घुगल, इंजी. राहुल बागडे, सोनु नवधिंगे, नितीन कमाले याचा प्रामुख्याने समावेश होता.

## किट्स तर्फे नवरगाव येथे बांबू सावली रचनेचे लोकार्पण



■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. २३ :

दि.१९ नोव्हेंबरला कविकुलगुरु इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स(किट्स)अभियांत्रिकी महाविद्यालय रामटेकच्या अंतर्गत वास्तुकला विभागातर्फे नवरगाव ग्रामपंचायत येथे बांबू सावली रचनेचा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची अध्यक्षता प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांनी केली. याप्रसंगी किट्स चे डीन (विद्या विभाग)डॉ विलास महात्मे, विभाग प्रमुख कल्पना ठाकरे, नवरगाव ग्रामपंचायत सरपंच ज्योती ठाकरे, ब्रम्हकुमारीच्या ललिता दीदी, उपसरपंच व सदस्य, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संखेत उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अविनाश श्रीखंडे यांनी विद्यार्थ्यांना भविष्याबद्दल मार्गदर्शन केले व म्हणाले की बांबू पासुन वास्तुकला विभागातर्फे उत्कृष्ट तयार केलेले शेड विविध कार्यक्रमा करिता ग्रामपंचायतला वापरता येईल. विभाग प्रमुख कल्पना ठाकरे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. बांबू शेडची प्रेरणा ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय या एनजीओच्या कार्यपद्धतीनुसार केली आहे. ब्रह्माकुमारी रामटेकच्या संचालिका ललिता दीदी म्हणाल्या की बांबू सावली रचनेचा विविध सामाजिक परिवर्तनासाठी उपयोग करता येईल. हा कार्यक्रम नासा, इंडिया (नॅशनल असोसिएशन ऑफ स्टुडन्ट ऑफ आर्किटेक्चर) अंतर्गत राबविण्यात आला. ह्या संपूर्ण प्रक्रियेत आर्किटेक्ट अंजली नरड व आर्किटेक्ट अभिलाषा डोंगरे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# अस्मिता

## रुचकर फरसाण भाजी

**रसगंधा**

बरेचदा फरसाण शिल्लक राहतं. ते वाया जाण्याची शक्यता असते. असं असेल तर त्यापासून एक चटपटीत डिश बनवणं शहाणपणाचं ठरतं. चला तर, रेसिपी जाणून घेऊ या.

**सामग्री:** दोन वाट्या फरसाण, चिरलेले दोन टोमॅटो, चिरलेले दोन कांदे, तिखट, तेल, जिरे, चवीप्रमाणे मीठ आणि साखर, चिरलेली कोथिंबीर इत्यादी.

**कृती:** प्रथम फरसाण हाताने चुरुन घ्या. दुसरीकडे कढई तापायला ठेवा आणि चांगली तापल्यानंतर तेल टाकून त्यात जिरे तडतडून घ्या. आता त्यात बारीक चिरलेला कांदा गुलाबी रंगावर परतून घ्या. कांदा चांगला परतल्यानंतर चिरलेला टोमॅटो घालून पुन्हा थोडा वेळ परतून घ्या. यावेळी तिखट, मीठ आणि साखरही घाला. हा मसाला तेल सोडू लागला की त्यात फरसाण घाला आणि मिश्रण एकसारखं करुन घ्या. भाजी फार कोरडी वाटत असेल तर पाण्याचा शिपका मारण्यास हरकत नाही. आता कढईवर झाकण ठेवा आणि चांगली वाफ येऊ द्या. तयार भाजी डिशमध्ये काढा आणि कोथिंबीर व लिंबाच्या फोडीने सजवा. गरमागरम फुलके अथवा पोळीबरोबर सर्व्ह करा.



## चौकट मोडताना...

**मानिनी**

**गॅरेज चालवणं, वाहनांची दुरुस्ती करणं, भाग बदलणं ही सगळी कामं पुरुषांची समजली जातात. ऑटोमोबाइलच्या क्षेत्रात महिलांचा वावर तसा दुर्मीळच. पण पुण्याच्या दीपाली धर्माधिकारी गेल्या ३० वर्षांपासून गॅरेज सांभाळत आहेत. एके काळी एकटीने सगळी जबाबदारी सांभाळणाऱ्या दीपाली यांच्या गॅरेजमध्ये तीन कर्मचारी कामाला आहेत. यासोबतच त्या अंतर्गत सजावटीचा व्यवसायही करतात.**

एके काळी फक्त पुरुषांची मक्तेदारी समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांमध्ये महिलांनी कधीच शिरकाव केला आहे. ट्रक चालवण्यापासून हवाई दलातल्या लढाऊ विमानांचं सारथ्य करण्यापर्यंत महिला प्रत्येक बाबतीत आघाडीवर आहेत. दुचाकी वाहनापासून विमानापर्यंत प्रत्येक वाहन अगदी लीलला चालवणाऱ्या महिला ऑटोमोबाइल म्हणजे वाहनांची देखरेख, दुरूस्तीच्या वाटेला फारशा जात नाहीत. पण दीपाली धर्माधिकारी यांनी याच व्यवसायात शिरकाव केला. पुण्यातल्या नवी पेठ परिसरात त्यांचं गॅरेज आहे. गेल्या ३० वर्षांपासून त्या वाहनांच्या दुरूस्तीचं काम करत आहेत. दुचाकींच्या दुरुस्तीसाठी या गॅरेजमध्ये येणाऱ्या ग्राहकांना दीपाली यांच्या क्षमतांवर पूर्ण विश्वास आहे. म्हणूनच अनेक वर्षांपासून लोक त्यांच्याकडे येतात.

दीपाली यांचा प्रवास वयाच्या आठव्या वर्षापासून सुरू झाला. लहान असल्यापासूनच त्यांना बाईक्सचं प्रचंड वेड होतं. त्यांच्या वडिलांचा गॅरेजचा व्यवसाय असल्यामुळे वाहनं त्यांच्या डोळ्यांसमोर असायची. सुरूवातीला या गॅरेजमध्ये रिक्षांची दुरूस्ती केली जायची. लहानपणी बाईक चालवणं शक्य नसल्याने त्या गॅरेजमध्ये बाबांना मदत करायच्या. बाईकवरून भारतभ्रमण करण्याची इच्छा असल्याचं एकदा त्यांनी वडिलांना सांगितलं होतं. अशी भटकंती करायची असेल तर बाईकच्या दुरूस्तीचं, देखरेखीचं तंत्र अवगत असायला हवं, असं वडिलांनी त्यांना सांगितलं. मग काय, दीपाली यांनी हे काम शिकायला सुरूवात केली. दहावीत जाईपर्यंत त्यांनी दुरूस्तीची छोटीमोठीच नाही तर ऑटो रिक्षाच्या सर्व्हिसिंगची महत्त्वाची आणि कौशल्याची कामंही शिकून घेतली होती.



दुर्दैवाने एका अपघातात त्यांच्या वडिलांची चार बोटं गेली. यामुळे गॅरेजची सगळी जबाबदारी तरुण दीपालीच्या खांद्यांवर आली. वडिल ही घरातली एकमेव कमावती व्यक्ती असल्याने गॅरेजमध्ये कामाला माणसं ठेवणंही शक्य नव्हतं. चौघांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी दीपाली यांना लहान वयात गॅरेजमध्ये राबावं लागलं. चौदा वर्षं पूर्ण झाली असल्याने त्या बालमजूर नव्हत्या. अभ्यास सांभाळून त्या हे काम करायच्या. पण एवढ्या लहान मुलीकडून काम करून घेणं पटत नसल्याने त्यांच्याकडच्या ग्राहकांची संख्या रोडावली. तसंच त्यांच्या क्षमतांवरही लोकांचा विश्वास नव्हता. मात्र दीपाली यांनी सर्व परिस्थिती धीराने सांभाळली. ऑटो रिक्षा दुरूस्तीतून फारसं काही गवसत नसल्याचं पाहून त्या दुचाकींच्या दुरूस्तीकडे वळल्या. बारावीनंतर त्यांनी गॅरेजच्या कामात पूर्ण लक्ष द्यायला सुरूवात केली. यामुळे त्यांना काही काळ शिक्षण थांबवावं लागलं. एके काळी कर्मचारी ठेवणंही शक्य नसलेल्या या गॅरेजमध्ये ती कर्मचारी काम करतात. दीपाली गॅरेजच्या कामाची देखरेख करतात. त्यांनी पदवीचं शिक्षण पूर्ण केलं असून इंटिरिअर डिझायनिंगचा व्यवसायही सुरू केला आहे. आता त्या या व्यवसायाला जास्त वेळ देतात. गॅरेजचा व्यवसाय यशस्वीपणे सांभाळणाऱ्या या स्वयंसिद्धेचं कार्य अनेकजणींसाठी प्रेरणादायी ठरू शकेल.

### मेक अप टिप्स

#### ट्रेंड मॅट मेक अपचा...



बरेचदा आपल्याला कोणता मेक अप करायचा असा प्रश्न पडतो. फॅशनजगतात सध्या मॅट मेक अपचा ट्रेंड आहे. मॅटमुळे तुम्हाला 'नो मेक अप' लूक मिळतो. म्हणजे हा मेक अप पूर्णपणे नैसर्गिक वाटतो. चेहऱ्यावर खूप काही थापल्यासारखं वाटत असल्याने मुली मॅट मेक अपला प्राधान्य देतात. मॅट प्रकारात मेक अपची सगळी उत्पादनं उपलब्ध आहेत. तेलकट त्वचा असलेल्यांनी मॅट मेक अप करायला हवा. या मेक अपमुळे चेहरा कोरडा होत नाही. उलट, त्वचा चमकदार दिसते. दर्जेदार मेक अप उत्पादनं विकत घेतली तर त्वचेला त्रास होणार नाही.

### स्मार्ट शॉपिंग

#### ब्लाउज शिवताय?

सध्या साडीपेक्षा ब्लाउज जास्त भाव खाऊन जातो. म्हणूनच ब्लाउजसाठी कापडाची खरेदी करायची असो किंवा तो शिवायला टाकायचा असो, काही गोष्टींची काळजी घ्यायला हवी. ब्लाउज शिवायला देताना शरीराच्या ठेवणीकडे लक्ष द्या. मान ऊंच असलेल्या महिला बोट नेक शिवून घेऊ शकतात. सडपातळ महिला हॉल्टर नेकचा विचार करू शकतात. जाड महिलांना स्वीटहार्ट नेक शोभून दिसेल. ब्लाउजचं डिझाइनही आपल्या व्यक्तिमत्त्वाला तसंच प्रसंगाला साजेसं हवं. त्यामुळे बॉलिवूड अभिनेत्रीची स्टाईल जशीच्या तशी कॉपी करू नका.



## साठवणूक मसाल्यांच्या पदार्थांची

**किचन मंत्रा**



भारतीय खाद्यपदार्थांमध्ये मसाल्यांचा वापर अनिवार्य आहे. भारतीय पदार्थांमध्ये वेगवेगळे मसाल्याचे जिन्नस वापरात येतात. कधी त्यांचं एकत्रित मिश्रण तर कधी वेगवेगळ्या स्वरुपात त्यांचा वापर होतो. या पदार्थांमुळेच पदार्थांना वेगळी चव, सुगंध आणि ताजेपणा मिळतो. प्रत्येक घरामध्ये मसाल्याचे पदार्थ खरेदी केले जातात. मात्र त्याची साठवणूकही योग्य प्रकारे व्हायला हवी. या पदार्थांचा सुगंध, ताजेपणा आणि त्यातील औषधी तत्त्व टिकवून ठेवायचे असतील तर याकडे लक्ष द्यायलाच हवं. बीज अथवा सालीच्या स्वरुपातील मसाल्याचे पदार्थ दोन वर्षांपर्यंत टिकतात. फुलांच्या स्वरुपातील मसाले एक वर्षापर्यंत टिकवून ठेवता येतात. खोडाच्या स्वरुपातील मसाल्याचे घटक दोन ते तीन वर्षांपर्यंत सुस्थितीत ठेवता येतात. मात्र त्यानंतर त्यांना आपोआपच कीड लागते. ते मुळचा सुगंध आणि स्वरुप हरवून बसतात.

* मसाले नेहमी कोरड्या ठिकाणी ठेवा. ओलावा लागला तर हे पदार्थ खराब होतात.
* मसाल्याच्या पदार्थांवर थेट सूर्यप्रकाश पडता कामा नये. असं झाल्यास त्यातील तेल प्रकाशाच्या संपर्कात येतं आणि आणि स्वाद बदलतो.
* मसाल्याचे पदार्थ गडद रंगाच्या जारमध्ये ठेवावेत. यामुळे ते सूर्यप्रकाशापासून सुरक्षित राहतील.
* बऱ्याच घरांमध्ये मसाले सुरक्षित ठेवण्यासाठी डीप फ्रीजचा वापर होतो. मात्र ही चुकीची पद्धत आहे. फ्रीजमध्ये ठेवल्यानं मसाल्याचा सुगंध कमी होतो. एअर लॉक कंटेनरमध्ये काही काळापर्यंत मसाले सुस्थितीत राहू शकतात. मात्र त्यानंतर ते सुगंधरहित होतात.
* नेहमी खडा मसाला साठवून ठेवावा. गरज पडेल तसा तो वाटून घ्यावा.
* कधीही एका वेळी जास्त प्रमाणात मसाले खरेदी करू नयेत. गरज पडेल तसे खरेदी करावेत. यामुळे नासाडी न होता मसाल्याच्या पदार्थांचा अपेक्षित स्वाद, सुगंध आणि चव अनुभवता येते.

## स्वत: निर्णय घे

**समुपदेशन**



मी तीस वर्षांची महिला आहे. दोन वर्षांपूर्वी माझं लग्न झालं. मी आणि पती दोघेही कमावत असल्यामुळे महिन्याकाठी आमच्या घरात बरीच मोठी रक्कम येते. पण त्या मानाने आमच्याकडे पुरेशी गंगाजळी साठलेली नाही याचं दु:ख आहे. माझ्या पतीने आर्थिक व्यवहाराची सगळी सूत्रं स्वत:च्या हातात ठेवली आहेत. तो स्वत:ला शेअर बाजाराचा जाणकार समजतो आणि अतिआत्मविश्वासाने शेअर्समध्ये भरपूर पैसे गुंतवतो. पण त्याच्या या नादापायी आम्ही आजपर्यंत चार वेळा जबर नुकसान सहन केलं आहे. मुख्य म्हणजे या अनुभवानंतरही त्याला शहाणपण आलेलं नाही. तो स्वत:बरोबर माझी कमाईदेखील पणाला लावत आहे. या कारणावरुन आमच्यात खूप भांडणं होतात. काय करु? त्याला कसं समजावू?

– लोकांना विविध प्रकारची व्यसनं असतात. शेअर बाजारात अविचाराने पैसे गुंतवत राहणं या व्यसनाचाही समावेश अशा व्यसनांमध्येच होतो. शेअर बाजारातल्या व्यवहारांचं सखोल ज्ञान न घेता ऐकिव माहितीच्या आधारे इथे पैसे गुंतवणारे आणि नुकसान झेलणारे अनेकजण आहेत. तुझा पतीही त्यातलाच दिसतोय. त्यामुळे सर्वप्रथम तू त्याच्या या बेहिशेबी वागण्याला आवार घाल. ही गुंतवणूक एखाद्या जाणकाराच्या सल्ल्याने करण्याविषयी आग्रह धर. तो ऐकत नसेल तर तुझा पगार त्याच्या हाती देणं तात्काळ थांबव. तू स्वत: आर्थिक व्यवहारांप्रती साक्षर हो आणि गुंतवणुकीचे निर्णय स्वत: घे. एखाद्या जवळच्या मित्राने अथवा नातेवाइकाने समज दिल्यास त्याला चूक समजेल का, याचाही विचार कर. कदाचित त्यामुळे तो भानावर येईल आणि तुमच्यातली भांडणं कमी होतील.

### हेल्दी लाईफ

#### न्याहारी टाळू नका!



मधुमेहाच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. हा विकार जडण्याची बरीच कारणं असली तरी सकाळची न्याहरी टाळल्यामुळे मधुमेहाला निमंत्रण मिळू शकतं. दररोजच्या धावपळीत न्याहरीला बगल दिली जाते. मात्र यामुळे आरोग्य धोक्यात येऊ शकतं. न्याहरी न केल्याने मधुमेह होण्याचा धोका ३३ टक्क्यांनी वाढतो असं एका संशोधनातून समोर आलं आहे. त्यामुळे कितीही गडबड असली तरी खाऊन बाहेर पडा.

## आयी रंगो की बहार!

**फॅशन पॅशन**

आता हिवाळा ऐन भरात आहे. या दिवसात रंगीत कपड्यांची बहार अनुभवायला मिळते. तेव्हा आपल्याही वॉर्डरॉबमध्ये आकर्षक रंगांच्या कपड्यांचा समावेश करायला हवा. यंदा कोणत्या रंगाचे पेहराव कॅरी करता येतील, जाणून घेऊ या...



ऑलिव्ह ग्रीन हा थंडीतला मस्ट हॅव्ह कलर आहे. या रंगाचा कोणताही पेहराव खुलून दिसेल.

* काश्मिरी रोज हा रंग फारच आकर्षक दिसतो. सध्याच्या गुलाबी थंडीत या रंगाचे कपडे भलतेच उठून दिसतील. तुमच्या वॉर्डरॉबमध्ये काश्मिरी रोज या रंगाचा पेहराव असायला हवा.
* वाईन रेड हा रंग राजेशाही थाटाचा! सध्याच्या ऋतूत हा रंग महिलांना आकर्षित करतोय. या कलरचा वेस्टर्न ड्रेस जास्त छान दिसेल.
* ग्रे रंगाची फॅशनही बहरात आहे, निळा आणि ग्रे असं कॉम्बिनेशन हिट ठरतंय. कॉलेजगोईंग मुलींपासून वर्किंग वूमनपर्यंत प्रत्येक जण हे कॉम्बिनेशन अगदी सहज कॅरी करू शकतं.
* अनेकींना वाईल्ड ऑरेंज रंग पहिल्या नजरेतच आवडता. केशरी रंग एक वेगळाच प्रभाव पाडतो. हा रंग कोणत्याही रंगासोबत अगदी सहज चालून जातो.
* विंटर कलर्समध्ये ऑर्किड हा सर्वात लोकप्रिय आणि हटके रंग आहे. हा रंग तुम्हाला वेगळेपणाची अनुभूती मिळवून देईल.
* कडाक्याच्या थंडीत सूर्याच्या एका किरणामुळेही अगदी छान ऊबदार वाटतं. याच सूर्याच्या किरणांची अनुभूती देणारा ओक बफ हा रंगही तुम्हाला आकर्षित करेल. हा रंग फारच रिच दिसतो. त्यामुळे या हिवाळ्यात नवनव्या रंगांचे पेहराव घालून हटके लूक मिळवा.

## भन्नाट बो स्टाईल

फॅशनविश्वात काहीच जुनं होत नसतं. काही काळापुरती एखादी फॅशन आडबाजूला होत असली तरी काही काळानंतर तीच फॅशन नव्या रुपात परतत असते. वारंवार नव्या रुपात येणाऱ्या बोच्या फॅशनबाबतही हेच वास्तव अनुभवायला मिळतं. कपड्यांपासून हॅंडबॅग्ज, क्लच, फूटवेअर, हेअरक्लिप्स, बॅंड्स, इअररिंग्ज, नेकलेस, पेंडंट, अंगठी या ॲक्सेसरीजपर्यंत फॅशनच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात 'बो' दिमाखात मिरवताना दिसतो. ही स्टाईल प्लेफुल ॲटिट्युडबरोबर स्त्रीची मार्दवता जपते आणि तिला आकर्षक असा बोल्ड लूकही मिळतो. बो स्टाईल अंगिकारुन तुम्ही क्युट आणि बोल्ड या दोन्ही अदा आजमावू शकता.

ड्रेस डिझाईनमध्ये असणारा बो मस्तच दिसतो; पण नसेलच तर शिफॉन कापडाला किंवा ब्रॉड रिबीनला नॉट करून तो पिनअप करू शकता किंवा कमरेभोवतीही गुंडाळू शकता. स्टोलला नॉट करून गळ्याभोवती बांधलेला 'बो'सुद्धा खूप छान दिसतो. साडीच्या ब्लाऊजला मागे बो लावल्यास साडीला फॅन्सी लूक मिळतो. आता आणखी काही प्रकार पाहू–

**बो टाय :** कार्पोरेट क्षेत्रात, इव्हिनिंग किंवा ॲनिवर्सरी पार्टीमध्ये 'बो टाय' तुमच्या व्यक्तिमत्त्वाची उंची वाढवण्यास नक्कीच मदत करेल.

**बो टाय कॉलर :** लो वेस्ट जीन्सबरोबर फॉर्मल शर्टची 'बो टाय कॉलर' तुमच्या मेन्सवेअर गेटअपला कुल ट्विस्ट देते.

**मिनी ड्रेसेस :** थ्री फोर्थ किंवा फुल स्लीव्हज टॉप आणि शॉर्ट्सवर बो पेअर क्युट पण बोल्ड असा कॉन्ट्रास लूक देतो.

**क्लासिक हेअर बो :** दोन हेअरस्टाईलच्या कॉम्बिनेशनमध्ये पोल्का डॉटचा गुलाबी हेअर बो तुमच्या गेटअपमध्ये गोडवा आणतो.



**रिंग्ज आणि थिंग्ज :** सोनेरी रंगाच्या ॲक्सेसरीज बोला अधिक उठाव देतात. मात्र यामध्येही ब्लॅक आणि व्हाईट, रेड अशा कॉमन कलरच्या 'बो'चीच निवड करावी.

**स्पार्कली सॅंडल्स :** कॉकटेल ड्रेसबरोबर शिफॉन आणि राईनस्टोन सॅंडल्सवर पेअर बो चं कॉम्बिनेशन फॅन्सी बोल्ड लूक देतं.

## व्हीए म्हणून काम करताना...

**स्कील डेव्हलपमेंट**

पूर्णवेळ नोकरी शक्य नसेल तर तुमचं करीअर संपलं असा अर्थ होत नाही. घरी बसून करता येतील असे अनेक व्यावसायिक पर्याय आज उपलब्ध झाले आहेत. त्यापैकी एक म्हणजे व्हर्च्युअल असिस्टंट (व्हीए). हा पर्याय नेमका काय आहे, कामाची पद्धत कशी आहे, या क्षेत्रातल्या संधी कशा साधायच्या याविषयी...

प्रत्येक व्यावसायिकाला कामाच्या बाबतीत मदतीची, मार्गदर्शनाची गरज असते. असा मार्गदर्शक कर्मचारी म्हणून ठेवता येणं शक्य नसतं किंवा वैयक्तिक मार्गदर्शकाची गरज नसते. अशा वेळी लोक फ्रीलान्सर्सची मदत घेतात. हे फ्रीलान्सर्स व्हर्च्युअल असिस्टंट म्हणून काम करतात. व्हर्च्युअल असिस्टंट व्यावसायिकाला त्याच्या गरजेप्रमाणे मार्गदर्शन करतो. या क्षेत्राशी संबंधित कौशल्यं आत्मसात केली तर तुम्हीही घरी राहून व्हर्च्युअल असिस्टंटची जबाबदारी पार पाडू शकता. हे काम बऱ्याच अंशी प्रशासकीय किंवा सचिवांच्या कामासारखं असू शकतं.

व्हीए म्हणून काम करायचं असेल तर आंतरराष्ट्रीय स्तरावर खूप चांगलं उत्पन्न मिळू शकतं. एका तासाच्या सेवेसाठी दहा ते तीस डॉलरपर्यंत मानधन दिलं जातं. म्हणजे तुम्ही तासाला ६५० ते दोन हजार रुपये कमवू शकता. या टप्प्यापर्यंत पोहोचण्यासाठी काही काळ वाट पहावी लागेल तसंच स्वत:चा पोर्टफोलिओ तयार करावा लागेल. या पदावर काम करण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार सीव्ही तयार करा. याबाबत तुम्हाला इंटरनेटवरून माहिती मिळू शकेल.

या क्षेत्रात अगदीच नव्या असाल तर फ्रीलान्सर किंवा अपवर्कसारख्या वेबसाईट्सवर तुमचं प्रोफाइल तयार करा. त्यानंतर कामाचा शोध घ्या. पहिल्याच प्रयत्नात उत्पन्न मिळेल असं नाही पण काही काळ गेल्यानंतर तुमचं प्रोफाइल तयार होईल. बऱ्याच फेसबुक ग्रुप्सवर व्हर्च्युअल असिस्टंटची गरज असल्याच्या जाहिराती दिलेल्या असतात. तातडीने काम हवं असेल तर या ग्रुप्सना भेट द्या. यासोबतच वर्कसेरा नावाची वेबसाईट महिला फ्रीलान्सर्सना संधी दे[illegible]ये विविध व्यवसायांसाठी



## केस चमकदार होण्यासाठी...

**सौंदर्यसाधना**

केस गळणं, पांढरे होणं, कोंडा, चाई या समस्यांनी महिलावर्गाला हैराण करून सोडलं आहे. कितीही काळजी घेतली तरी प्रदूषण, रसायनयुक्त उत्पादनांचा वापर या कारणांमुळे केस खराब होतात, निस्तेज दिसतात. केसांची चमक टिकवून ठेवण्यासाठी आपण एक सहज सोपा उपाय करू शकतो. आपण चेहऱ्याला वाफ देतो. पण केसांना वाफ देण्याचा विचार कधी केला आहे का? या प्रक्रियेचे अनेक लाभ आहेत. चला तर, मग केसांना वाफ देण्याची प्रक्रिया समजून घेऊ या.

स्कॅल्पवरची छिद्रं बळकट नसतील तर केस गळणं, कोंडा होणं अशा समस्या निर्माण होतात. हे टाळण्यासाठी केसांना तेल लावण्याआधी वाफ द्या. वाफेमुळे छिद्रं व्यवस्थित उघडतील आणि केसांना लावलेलं तेल मुळांपर्यंत पोहोचेल. तेलांमधले पोषक घटक लाभल्याने केस बळकट होतील तसंच त्यांची वाढही वेगाने होईल. वाफ दिल्यामुळे स्कॅल्पवरची त्वचा स्वच्छ होते. केस धुतल्यानंतर शॅंपूमुळे त्वचेवरची धूळ, घाण निघून जाते. मात्र यातली घातक रसायनं केसगळतीला कारणीभूत ठरतात. म्हणूनच वरचेवर वाफ दिल्याने त्वचा स्वच्छ होईल आणि जास्त शॅंपू लावावा लागणार नाही. मात्र शॅंपूनंतर केसांना कंडिशनर लावा. यामुळे उघडलेली छिद्रं बंद होतील आणि त्यात धूळ जाणार नाही.



वाफ दिल्यामुळे केस चमकदार आणि मुलायम होतात. कोरड्या, निस्तेज केसांची कोणतीही स्टाईल करता येत नाही. पण वाफ दिल्यानंतर केसांमध्ये आर्द्रता टिकून रहात असल्याने तुम्ही केसांची हवी ती स्टाईल करू शकता.

केसांना वाफ देण्यासाठी पार्लरमध्ये स्टीमरचा वापर केला जातो. तुम्ही घरच्या घरीही वाफ देऊ शकता. यासाठी पाणी गरम करून घ्या. त्यात स्वच्छ टर्किश टॉवेल दोन मिनिटं बुडवून ठेवा. तो बाहेर काढा. टॉवेलमधलं पाणी त्याच भांड्यात निथळू द्या. पाणी निथळल्यानंतर टॉवेल डोक्यावर बांधून घ्या. यामुळे केसांना वाफ मिळेल. ही प्रक्रिया आठवड्यातून एकदा करा. नियमित वाफ दिल्याने तुमचे केस

## ६२ पैकी ५० जागा जिंकल्या, महाविकास आघाडीला लोळवले

# विदर्भात महायुतीचाच वरचष्मा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

काँग्रेसचा गड मानल्या जाणाऱ्या विदर्भात मतदारांनी काँग्रेसला सपशेल नकारल्याचे दिसून आले. विदर्भातील ६२ पैकी ४९ जागा जिंकत महायुतीने महाविकास आघाडीला धुळ चारली आहे. त्यातही एकट्या भाजपाने ३९ जागांवर विजय मिळवला आहे.

विदर्भातील नागपूर आणि अमरावती विभाग मिळून विधानसभेच्या ६२ जागा आहेत. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने चांगली कामगिरी केली होती. याचीच पुनरावृत्ती विधानसभेच्या निवडणुकीत होईल, असा दावा महाविकास आघाडी विशेषतः काँग्रेसकडून केला जात होता. तथापि, मतदारांनी आघाडी आणि काँग्रेसला नाकारल्याचे दिसून आले आहे.

निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी अंमलात आणलेली लाडकी बहीण योजना महायुतीसाठी अत्याधिक फायदेशीर ठरली असून, प्रधानमंत्री अमित नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, नितीन गडकरी यांच्या प्रचार सभांचा धडाका आणि देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह भाजपाच्या नेत्यांनी अगदी ग्रास रूटपर्यंत केलेले काम यामुळे मतदारांनी भाजपाच्या पारड्यात भरभरून मतं टाकली.

वर्धा जिल्ह्यात भाजपाने इतर पक्षांना खातेही उघडू दिले नाही. येथील सर्व चारही जागा भाजपाने जिंकल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने विदर्भात कमी जागा लढवल्या होत्या. त्यातील ४ जागा जिंकून त्यांनी आपले वर्चस्व वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरीकडे, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ६ जागांवर विजय मिळवला आहे.

सत्ताधारी महायुतीच्या विरोधात रिंगणात उभे ठाकलेल्या महाविकास आघाडीला अपेक्षेनुरूप कामगिरी करता आली नाही. संपूर्ण विदर्भात काँग्रेसला केवळ ८ जागा जिंकता आल्या. पाठोपाठ उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने विदर्भात ४ जागा जिंकल्या. मात्र, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची विदर्भात पुरती धुळधाण झाली.

वंचित बहुजन आघाडी या निवडणुकीत तरी खाते उघडेल, असे चित्र दिसत होते. बुधवार २० नोव्हेंबर रोजी मतदान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आपण सत्ताधारी पक्षासह जाऊ, सत्तेत सहभागी होऊ, असे ठासून सांगितले होते. मात्र, वंचित यावेळीही विजयापासून वंचितच राहिली. त्यांना किंचीतही यश मिळाले नाही.

राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा विदर्भात प्रभाव नाही. त्यांनी येथे मोजक्या जागा लढवल्या होत्या. मात्र, मनसेला यावेळीही खाते उघडता आले नाही, असे निकालातून दिसून येते.

काँग्रेसच्या अनेक टॉप नेत्यांपैकी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विजय वडेट्टीवार, यशोमती ठाकूर हे विदर्भातील आहेत. यातील अनेकांना पराभवाचा सामना करावा लागला.

अमरावती जिल्ह्यात यावेळी मोठा उलटफेर दिसून आला. स्वतःच्या विजयाची १०० टक्के खात्री बाळगून असलेले आणि त्यांच्याशिवाय कुणाचेही सरकार बनू शकत नाही, असा दावा करणारे माजी राज्यमंत्री तथा प्रहार जनशक्ती पक्षाचे बच्चू कडू यांचा दारूण पराभव झाला आहे.

लोकसभा निवडणुकीत नवनित राणा यांच्या पराभवाला जबाबदार मानले जाणारे बच्चू कडू यांनी यावेळी रवी राणा यांच्या पराभवासाठी संपूर्ण ताकद पणाला लावली होती. परंतु, रवी राणा यांनी बाजी मारली. विदर्भातील ६२ पैकी अनेक मतदारसंघाचे निकाल अनपेक्षित असल्याचे दिसते.

### विदर्भात पक्षीय जागा?

भाजपा - ३९
शिवसेना शिंदे - ४
राष्ट्रवादी अजित पवार - ६
काँग्रेस - ८
शिवसेना उबाठा - ४
राष्ट्रवादी शरद पवार - ०
मनसे - ०
इतर -१ (युवा स्वाभिमान)
महायुती - ५० (युवा स्वाभिमान सह)
मविआ - १२

### विदर्भातील निकाल एका नजरेत

**चंद्रपूर**
भाजप - ५
काँग्रेस - १

**गडचिरोली**
भाजप - १
काँग्रेस - १
अजित पवार - १

**अमरावती**
भाजप - ५
युवा स्वाभिमान - १
अजित पवार - १
ठाकरे गट - १

**वर्धा**
भाजप - ४
काँग्रेस - ०

**गोंदिया**
भाजप - ३
अजित पवार - १

**भंडारा**
भाजप - १
काँग्रेस - १
अजित पवार - १

**अकोला**
भाजप - ३
काँग्रेस - १
उबाठा - १

**वाशिम**
भाजप - २
काँग्रेस - १

**बुलढाणा**
भाजप - ४
अजित पवार - १
शिंदे - १
उद्धव ठाकरे - १

**यवतमाळ**
भाजप - ३
काँग्रेस - १
अजित पवार - १
शिंदे - १
उबाठा - १

**नागपूर**
भाजप - ८
काँग्रेस - ३
शिंदे गट - १

## वर्धा जिल्ह्यात चौफेर भगवा, चारही जागा जिंकल्या



■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २३ :

विधानसभेत १०० टक्के यश मिळवून देण्याचा जिल्हा भाजपचा निर्धार अखेर यशस्वी झाला आहे. देवळीत इतिहास घडला. पाच वेळा सलग विजयी होणारे काँग्रेसचे रणजित कांबळे यांना प्रथमच पराभव चाखावा लागला. भाजपचे राजेश बकाने यांनी दमदार बढत घेत त्यांना धूळ चारली आहे.

कांबळे यांची डबल हॅटट्रिक हुकविणाऱ्या बकाने यांनी कमळ फुलवून देवळीत इतिहास रचला. या मतदारसंघात प्रथमच भाजपने पाय रोवले आहे. आर्वीत तर भाजप नव्हे, कमळ नव्हे तर ओन्ली सुमित हा परवालीचा शब्द ठरला होता. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात दादाराव केचे यांनी विरोधात काम केल्याची राळ उडाली, पण त्याने फरक पडला नसल्याचे आज निकालातून स्पष्ट झाले. आर्वीत काँग्रेसच्या मयुरा काळे यांच्यावर वानखेडे यांनी २५ हजारपेक्षा अधिक मतांनी मजल मारली.

हिंगणघाट येथे भाजपचे समीर कुणावार यांनी २७ हजारपेक्षा अधिक मते अतुल वांदिले विरोधात मिळवून हॅटट्रिक साधली. या मतदारसंघात आमदारकीची हॅटट्रिक मारणारे ते पहिले विजयी वीर ठरले आहे. त्यांच्या विरोधात असलेले शरद पवार राष्ट्रवादीचे अतुल वांदिले यांना लढत देताना दमछाक झाल्याचे मत मोजणीतून दिसून येते. वर्ध्यात भाजपची सुरवातीस धाकधूक उडाली होती.

काँग्रेस उमेदवार शेखर शेंडे यांनी पहिल्या दहा फेरीत आघाडी ठेवली होती. मात्र शहरी पट्टा सुरू झाला आणि भोयर यांनी मग मागे वळून पाहिलेच नाही. गत दोन विधानसभा निवडणुकीत जे मताधिक्य मिळाले होते तेवढेच आता मिळवून त्यांनी हॅटट्रिक साधली आहे.

जिल्हाध्यक्ष सुनील गफाट म्हणतात की चारही जागा जिंकण्याचे स्वप्न भाजपने पूर्ण केले आहे. शहर व ग्रामीण अश्या दोन्ही भागांत मतदार आमच्या पाठिशी राहिले. देवळीत आम्ही इतिहास रचला आहे. फडणवीस यांचा विश्वास आम्ही सार्थ ठरविला आहे. सुमित वानखेडे व राजेश बकाने हे प्रथमच आमदार झाले आहेत. तर भोयर व कुणावार यांनी तिसऱ्यांदा विजय प्राप्त केला.

भाजपचे तेली समाज उमेदवार समीकरण यशस्वी तर आघाडीचे दोन याच समाजातील उमेदवार देण्याचे डाव फसले आहे. आर्वी व वर्धा येथील विजय हा पक्षासोबत उमेदवाराचे व्यक्तिगत व्यक्तिमत्व याचा समजल्या जात आहे.

## दोन आमदारांची हॅट्रिक तर एकाचा चौकार

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २३ :

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये अकोला जिल्ह्यातील भाजपाच्या विद्यमान दोन आमदारांनी आपल्या विजयाची हॅट्रिक केली असून तिसऱ्या आमदाराने आपला चौकार मारला आहे. हे तिन्ही आमदार खूप मोठ्या फरकाने विजयी झाले आहेत.

अकोला जिल्ह्यातील अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार रणधीर सावरकर अकोट विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश भारसाकळे यांनी आपली हॅट्रिक केली असून मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार हरीश पिंपळे यांनी विजयाचा चौकार मारला आहे. या तिघांनीही विक्रमी मतांनी जनतेने निवडून दिले आहे.

अकोला जिल्ह्यातील विधानसभेच्या ५ जागांपैकी महाविकास आघाडीमधील काँग्रेसने १ आणि उद्धव ठाकरे शिवसेनेने १ जागेवर विजय मिळविला. वंचित याहीवेळी वंचित राहिल्याचे दिसून आले.

## माजी मंत्री राजेंद्र शिंगणेंचा धक्कादायक पराभव

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २३ :



प्रचारापासून मतदान आणि मतमोजणीपर्यंत काट्याची दुरंगी लढत ठरलेल्या बुलढाणा विधानसभा मतदारसंघात अखेर शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड (महायुती) यांनी बाजी मारली आहे. त्यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या जयश्री शेळके यांचा ६६१ मतांनी पराभव करीत विजयश्री खेचून आणली.

दुसरीकडे, सिंदखेड राजा मतदारसंघातून शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार तथा माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा नामुष्कीजनक पराभव झाला आहे.

शनिवार २३ नोव्हेंबर रोजी प्रारंभी पोस्टल मतांची मोजणी करण्यात आली. पोस्टलमध्ये शेळकेंनी बाजी मारली असली तरी आमदार गायकवाड यांनी पहिल्या फेरीत आघाडी घेतली. २५ व्या फेरी पर्यंत लढतीचा रोमांच कायम राहिला. यात संजय गायकवाड यांनी बाजी मारली आणि ते सलग दुसऱ्यांदा आमदार झाले.

**राजेंद्र शिंगणे यांचा पराभव**

सिंदखेडराजा मतदारसंघातील मतदारांनी नव्या दमाच्या मनोज कायंदे (राष्ट्रवादी अजितदादा गट) यांना विजयी केले आहे. सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाची लढत आणि मतमोजणी देखील अत्यंत चुरशीची झाली. प्रारंभीच्या टप्प्यात तिसऱ्या क्रमांकावर राहिलेले मनोज कायंदे यांनी एकदम उसळी मारली. डॉ. राजेंद्र शिंगणे यांना मात्र नामुष्कीजनक पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

## आघाडीला १०४ जागांचे नुकसान काँग्रेसला ४३ जागांचा फटका



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

विधानसभा निवडणुकीत मोठ्या विजयासह बहुमताचा दावा करणाऱ्या महाविकास आघाडीला मोठा फटका बसला आहे. या निवडणुकीत आघाडीचा सुपडासाफ झाल्याचे चित्र असून, अनेक दिग्गजांना पराभवाला सामोरे जावे लागले.

या निवडणुकीचे अंतिम निकाल उशिरापर्यंत जाहीर झाले नव्हते. मात्र, काँग्रेसची मोठया प्रमाणात घसरगुंडी झाली असून, त्यांच्या वाट्याला केवळ १६ जागा आल्या. उद्धव ठाकरेंची शिवसेना केवळ 17 जागांवर मर्यादित असल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र लोकसभा निवडणुकीचे विधानसभानिहाय रूपांतर केले, तर काँग्रेसने 63 जागा जिंकल्या होत्या, ती आता केवळ 16 जागांपर्यंत मर्यादित असल्याचे दिसते. त्याचवेळी, त्यानुसार भाजपच्या जागा 79 वरून 132 जागा वाढत आहेत.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाही या निवडणुकीत मोठा फटका बसला असून, त्यांना २१ जागांचे नुकसान झाल्याचे दिसून येते. महाविकास आघाडी सर्व स्तरावर अपयशी ठरली आहे.

## मतदान महाराष्ट्राने केले की ईव्हीएमने?

### आदित्य ठाकरे यांचा सवाल



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून, महायुतीकडून विजयाचा जल्लोष साजरा केला जात आहे. या दरम्यान ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांची प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. निवडणुकीत अपेक्षित असे निकाल आले नाही. महाराष्ट्रातील जनतेने मतदान केले की ईव्हीएमने मतदान केले, हा मोठा प्रश्न आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

आदित्य ठाकरे म्हणाले की, आम्हाला लोकसभा निवडणुकीत याच महाराष्ट्राने आशीर्वाद दिले. संपूर्ण महाराष्ट्रात जनता महाविकास आघाडीसोबत असल्याची लाट दिसत होती. पण जे निकाल सर्वांना अपेक्षित होते, ते आले नाही. यंदाच्या निवडणुकीत ईव्हीएमने किती प्रचार केला हे पहावे लागेल. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने मतदान केले की ईव्हीएमने मतदान केले, हा मोठा प्रश्न आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, निष्ठावंत म्हणून जिथे काम केले तिथे विजय झाला आहे. पण महाराष्ट्रातील आलेला निकाल पाहता, आपल्याला अपेक्षित असे निकाल आलेले नाहीत.

## 'राज'पुत्राला नाकारले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :



माहीम विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, या मतदारसंघात अमित ठाकरे यांचा पराभव झाला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे महेश सावंत यांचा विजय झाला आहे. चर्चेत राहिलेले शिंदे गटाचे सदा सरवणकर पराभूत झाले.

अमित ठाकरे म्हणाले, माहिम, दादर आणि प्रभादेवीतील जनतेचा कौल मला मान्य आहे. गेली अनेक वर्षे या प्रभागातील अगदीच बेसिक गरजांसाठी लोकांचा संघर्ष बघितला. याच संघर्षातून उभ्या राहिलेल्या विचारांनी, प्रभागाच्या विकासासाठी आणि बदलासाठी आपण एक नवा अध्याय लिहावा, केवळ या हेतूने मी या निवडणुकीत उतरलो होतो.






अलिकडेच पंतप्रधानांच्या सल्लागार समितीने दाखवल्याप्रमाणे दरडोई उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा क्रमांक दहाच्या खाली घसरला आहे. दुसरीकडे, सकल उत्पन्नातील आपला वाटा १५ टक्क्यांवरुन घसरुन १३ टक्के झाला आहे. म्हणजेच उत्पादनाचा वाटा घसरला आहेच, खेरीज आपले दरडोई उत्पन्नही वाढताना दिसत नाही. त्यामुळेच महाराष्ट्राचा समतोल विकास करण्याचे मोठे आव्हान नवीन सरकारपुढे असणार आहे.

# वाचता पाढा आव्हानांचा...

वेध

**डॉ. भालचंद्र कांगो**

राजकीय अभ्यासक

राजकीय पटलावरील निवडणूकरुपी महानाट्य संपल्यानंतर सत्तेच्या पटलावर नव्या सरकारचा उदय होत असताना जनतेच्या कोणत्या अपेक्षांची पूर्तता होईल आणि कोणकोणत्या सामाजिक समस्यांच्या निराकरणांना प्राधान्यक्रम दिला जाईल, हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यामुळेच यापुढचा काळ नव्या सरकारच्या कार्यशैलीचे, ध्येयधोरणांचा पाठपुरावा करणाऱ्या प्रयत्नांचे अवलोकन करणारा असणार आहे. सध्या राज्यापुढे अनेक गंभीर संकटे उभी आहेत. त्यामुळे नवीन सरकारला कर्ज काढून कामे करावी लागणार, हे तर निर्विवाद सत्य आहे. आधीच्या सरकारांनी दहा लाख कोटींचे कर्ज करुन ठेवले असून ते फेडताना केवळ व्याजापोटी वर्षाला ७० हजार कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. खेरीज मुद्दल फेडण्यासाठी २५ ते ३० हजार कोटी दिले तर सरकारकडे शिल्लक काय राहणार, हा प्रश्न आहेच. तेव्हा नवीन सरकारपुढील हा पेच मोठा असणार, हे उघड आहे.

एकंदरच सध्या केंद्र सरकारचीही कर्जे काढून कामे करायची, नीती पहायला मिळते. दुसरीकडे अपेक्षेप्रमाणे खासगी गुंतवणूक होताना दिसत नाही. त्यामुळे जीडीपी वा अर्थव्यवस्थेमध्ये दिसणारी वाढ सरकारी गुंतवणुकीमुळेच आहे. प्राथमिकदृष्ट्या ही गुंतवणूक श्रीमंतांवर कर लावून व्हायला हवी. मात्र तसे न होता गरिबांवर टॅक्स वाढवून, जीएसटी वाढवूनच ही गुंतवणूक होताना दिसते. दुसऱ्या पातळीवर ती कर्ज काढून होताना दिसत आहे आणि या दोन्ही गोष्टी धोकादायक आहेत. म्हणूनच नवे सरकार ही स्थिती कशी हाताळणार हे येत्या काळात बघावे लागेल.

अर्थात ही केवळ आपल्याकडील समस्या नसून अमेरिकेसारखा देशही याच प्रश्नाने चिंतीत आहे. त्यांच्याकडे रिपब्लिकन पक्ष कर कमी करा, असे म्हणतो तर डेमोक्रेटिक पक्ष कर वाढवण्याचे मत मांडतो. आपल्याकडे इतके प्रत्यक्ष कोणी बोलत नाही, कारण जात, धर्माच्या राजकारणावर जास्त चर्चा चालते. परंतु, कर्जाचे वाढते डोंगर ही सध्याची खरी चिंताजनक बाब आहे. यावर इलाज म्हणून मध्यंतरी केरळ सरकारने एक पाऊल उचलले होते. त्या राज्यातील प्रत्येक पाचमधील एकजण आखाती देशात काम करुन चांगले उत्पन्न कमावतो आणि त्यातून आपल्या राज्यामध्ये गुंतवणूक करु इच्छितो. हे लक्षात घेऊन या राज्याने भारत सरकारकडे बाँड काढून आम्हाला १५०० कोटींपर्यंत परकीय चलन वाढवण्याची परवानगी देण्याची मागणी केली. ती स्विकारली गेली नाही हा मुद्दा वेगळा, कारण राज्य सरकार परदेशात जाऊन अशा प्रकारे पैसे उभे करु लागल्यास केंद्र सरकारचे महत्त्व कमी होण्याचा मोठा धोका आहे. पण प्राप्त परिस्थितीमुळे आणि अशा अनेक कारणांमुळे संघराज्यांपुढील संकट वाढत जाणार आहे. महाराष्ट्रातील नवनिर्वाचित सरकार ही परिस्थिती कशी हाताळते, ते लवकरच समोर येईल.

महाराष्ट्र आर्थिकदृष्ट्या अत्यंत मजबूत राज्य होते. किंबहुना, तो आदर्श होता. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या प्रगतीशील महाराष्ट्राने अनेक गोष्टी साध्य केल्या. मात्र अलिकडे आपण सामाजिकदृष्ट्या अधोगतीला चाललो आहोत. जातीधर्माच्या लढाया प्रचंड वाढल्या आहेत. अलिकडेच पंतप्रधानांच्या सल्लागार समितीने दाखवल्याप्रमाणे दरडोई उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा क्रमांक दहाच्या खाली घसरला आहे. दुसरीकडे सकल उत्पन्नातील आपला वाटा १५ टक्क्यांवरुन घसरुन १३ टक्क्यांवर आला आहे. म्हणजेच उत्पादनाच वाटा घसरला आहेच, खेरीज आपले दरडोई उत्पन्नही वाढताना दिसत नाही. मुंबईचे महत्त्व जाणीवपूर्वक कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळेच महाराष्ट्राचा समतोल विकास साधण्याचे मोठे आव्हान नवीन सरकारपुढे असणार आहे.

विदर्भ आणि मराठवाडा प्रांत आज मागासलेले आहेत. एके काळी औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असणाऱ्या महाराष्ट्राची या पातळीवरील प्रगतीही समाधानकारक नाही. त्यामुळेच 'औद्योगिकदृष्ट्या संपन्न राज्य' ही प्रतीमा कशी जपायची वा परत मिळवायची, हेदेखील नवीन सरकारला बघावे लागेल. त्यातही त्यासंबंधीच्या उपाययोजना करताना राज्यावरील कर्ज न वाढू देण्याचे भानही त्यांना ठेवावे लागणार आहे.

संकटात असणाऱ्या जनतेला आधार देण्यासाठी सरकार विविध उपाययोजना राबवते. विविध गटांना पैसे देण्याचे धोरण राबवते. अलिकडच्या काळात अशा अनेक योजना पहायला मिळाल्या. पण ही संकटाची चाहूल होती. राजकीय नेते पुढील पाच वर्षे आम्ही शेतकऱ्यांना वीजबिल भरायला लावणार नाही, असे सांगतात. पण ही गोंडस घोषणा प्रत्यक्षात कशी राबवली जाईल, हे कळण्यास मार्ग नाही, कारण महाराष्ट्रात वीज सर्वात महाग आहे. संपूर्ण देशात हे दर अधिक आहेत. इंडस्ट्रीबरोबर सर्वसामान्य माणसांनाही त्याचा फटका बसत आहे. सर्वसामान्यांच्या धंद्याला बसत आहे. म्हणूनच यातून मार्ग कसा काढायचा हे नवीन सरकारला ठरवावे लागेल. अर्थात याचेही मार्ग आहेत. सोलर पंप, सोलर एनर्जी वापरुन मार्ग निघू शकतात. पण हा संपूर्ण रचना बदलण्याचा प्रश्न आहे. त्यासाठी पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी प्रचंड गुंतवणूक लागेल. ती कशी करणार, या प्रश्नाचे उत्तर नवीन सरकारला द्यावे लागेल. नवीन आर्थिक धोरणामध्ये खासगी गुंतवणुकीवर भर होता. यातून शासकीय गुंतवणूक कमी होण्याची अपेक्षा होती. पण ती काही पूर्ण होताना दिसत नाही, उलट, शासकीय गुंतवणूक वाढत असून खासगी गुंतवणूक कमी होत आहे. शेवटी नफाच होत नसेल तर खासगी गुंतवणूकदार कसे पुढे येतील, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यामुळेच नवीन सरकारला हा तिढा सोडवावा लागेल.




आत्तापर्यंत राष्ट्रीय सकल उत्पन्नात वाढ म्हणजे विकास, असे समीकरण होते. पण आता याविषयीदेखील विचार करण्याची गरज भासू लागली आहे. याचे कारण म्हणजे ह्युमन डेव्हलमेंट इंडेक्सकडेही आता लक्ष द्यावे लागेल. किती मुले शिक्षण घेत आहेत, किती मुले कुपोषित आहेत, पाच वर्षांच्या आतील किती मुले मृत्युमुखी पडत आहेत आदी प्रश्न गंभीर असून घसरत्या निर्देशांकामुळे हे वास्तव चिंताजनक असल्याचे सूचित होत आहे. देशामध्ये महाराष्ट्राचा 'हंगर इंडेक्स' वाईट असून यात आपण १०५ वरुन १११ क्रमांकावर गेलो आहोत. थोडक्यात, मानवी विकास निर्देशांकामध्ये होणारी घसरण रोखण्याचे आव्हानही नवीन सरकारपुढे असणार आहे. असे असताना जीडीपी वाढण्याचे दावे केले जात असतील तर परिस्थिती भयानक असल्याचे आपण समजून घ्यायला हवे, कारण जीडीपीमध्ये वाढ म्हणजे विकास नव्हे.

महाराष्ट्रातून शिक्षणासाठी, नोकरी करण्यासाठी बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही बरीच मोठी आहे. याबाबत केरळनंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. मुंबई, पुण्यासारख्या शहरांमधील अनेक मुले तर शिक्षण वा नोकरीसाठी परदेशात जाण्यासच प्राधान्य देताना दिसतात. इतकेच नव्हे, तर मुंबईमध्ये अशाही काही शाळा निघाल्या आहेत, ज्या परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवून देण्याच्या उद्देशानेच काम करतात. नवीन सरकारला या सगळ्या परिस्थितीचा अभ्यास करावा लागेल. विद्यार्थ्यांनी जगभर हिंडून स्वत:ची प्रगती करुन घेण्यात गैर काहीच नाही. मात्र त्यांना मूलभूत शिक्षणसुविधा देण्याची, दर्जेदार शिक्षण देण्याची सोय सरकारकडून केली जावी, ही अपेक्षाही चुकीची नाही. नवीन सरकारने आपली ही जबाबदारी ओळखणे गरजेचे आहे. जागतिक बाजारपेठ एक होत आहे. त्यात उतरण्यासाठी आपल्या मुलांना सक्षम करणे हे राज्य सरकारचे काम आहे. ते विसरुन चालणार नाही. सध्या आपल्याकडे शिक्षणक्षेत्रात अत्यल्प गुंतवणूक होत आहे. असे असताना हे ध्येय कसे पूर्ण होते, हे बघावे लागेल.

महाराष्ट्र शेतीच्या बाबतीत परावलंबी असून ही बाबही धोकादायक आहे. हे परावलंबीत्व कमी करायचे असेल तर उसाचे प्राधान्य कमी करुन माणसांच्या गरजा भागवणाऱ्या अन्य शेती उत्पादनांना पुरेसे पाणी पुरवण्याची सोय करावी लागेल. मात्र तसे होताना दिसत नाही. राजकारणात कारखानदारीच्या प्रभावामुळे वेगळीच परिस्थिती बघायला मिळते. ती बदलण्याचे आव्हान नवीन सरकारपुढे असणार आहे.

✦✦✦

अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने सलग दुसऱ्यांदा व्याजदरांना कात्री लावली आहे. अमेरिकेतील चलनवाढीची परिस्थिती आता आटोक्यात येऊ लागली असल्यामुळेच हे पाऊल उचलण्यात आले आहे. ट्रम्पशाहीमध्ये भारतातून आयात केल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंवर कर वाढवले जाण्याची शक्यता आहे. परंतु चीन ट्रम्प यांच्या रडारवर आहे. अमेरिकेने चीनवरील करदायित्व वाढवणे भारतासाठी नव्या संधी उपलब्ध करेल.

# भारत-अमेरिका व्यापारसंबंध कूस पालटणार?

परामर्ष

**हेमंत देसाई**

ज्येष्ठ पत्रकार

यंदा ऑक्टोबरमध्ये देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी सुमारे एक लाख कोटी रुपये मूल्याचे समभाग खरेदी केले. याच काळात परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी ८५ हजार कोटी रुपये मूल्याच्या समभागांची विक्री केली. अलीकडील म्युच्युअल फंडांच्या माध्यमातून सुरू असलेली समभाग खरेदी ही भांडवल बाजारातील मूलगामी बदल दर्शवणारी आहे. हा कल घसरत्या बाजाराला सावरून कंपन्यांच्या समभागांचे मूल्यांकन योग्य पातळीवर राखण्याचे कार्य करील. तर परदेशी गुंतवणूकदारांकडून समभाग विक्रीमुळे बाजारात चढ-उतार असूनही आवश्यक स्थैर्य मिळू शकेल, असे शेअर बाजार विश्लेषकांचे मत आहे. देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून असलेला निधी प्रवाह हा मुख्यतः विमा आणि सेवानिवृत्ती निधींसह म्युच्युअल फंडातील 'एसआयपी' योगदानाचा परिणाम आहे. चालू नोव्हेंबर महिन्यात एसआयपीचा ओघ कमी होऊ शकतो. परंतु सेवानिवृत्ती निधीचा प्रवाह मजबूत राहण्याची आणि वाढत राहण्याची शक्यता आहे. सध्या सुरू असलेला सणासुदीचा हंगाम, उत्तम पाऊसपाणी आणि ग्रामीण मागणीतील वाढ हे घटक नजीकच्या काळात बाजारासाठी प्रेरक ठरू शकतील. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपप्रणीत एनडीएला यश मिळाल्यास भांडवली बाजारात मोठी तेजी येईल, असा अंदाज आहे. दुसरीकडे, अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने व्याजकपात केल्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांचा ओघ परत भारताकडे वळणार, हे नक्की आहे.

अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने सलग दुसऱ्यांदा व्याजदरांना कात्री लावली आहे. अमेरिकेतील चलनवाढीची परिस्थिती आता आटोक्यात लावू येऊ लागली असल्यामुळेच हे पाऊल उचलण्यात आले आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांची निवड झाली असून ते भारतातून आयात केल्या जाणाऱ्या अनेक वस्तूंवर कर लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु चीनही त्यांच्या रडारवर आहे. आपल्या मागच्या टर्ममध्येही ट्रम्प यांनी चीनशी व्यापारयुद्ध (ट्रेड वॉर) सुरू केले होते. त्याची पुनरावृत्ती झाल्यास, भारतासाठी संधी उपलब्ध होतील. डिसेंबरमध्येही व्याजदरांना कात्री लावण्याबाबत फेडरल रिझर्व्ह विचार करू शकते, असे त्याचे प्रमुख जेरोम पॉवेल यांनी म्हटले आहे. अमेरिकेमध्ये नव्या अध्यक्षाने पदग्रहण केले तरी तो फेडरल रिझर्व्हच्या प्रमुखांना काढू शकत नाही. आपण राजीनामा देणार नसल्याचे पॉवेल यांनी अगोदरच स्पष्ट केले आहे. मात्र व्याजाचे दर घटतात, तेव्हा व्यापारी आणि उद्योजकांचा कर्जउभारणीवरील खर्च कमी होतो. त्यामुळे उत्पादनखर्चात कपात होते आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकण्याची ताकद निर्माण होते. म्हणूनच अमेरिकेला व्याजदरघटीचा फायदा होणार आहे. तेथील बेरोजगारीही घटणार आहे. त्याच वेळी स्थलांतरितांवर नियंत्रणे तसेच काही वस्तूंवरील करवाढ यामुळे अमेरिकेतील चलनवाढ पुन्हा वाढू शकते, अशी भीती अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत.



ट्रम्प यांची संरक्षक धोरणेही जागतिकीकरणविरोधी असून भारतासाठी ती घातकदेखील ठरू शकतात. याचे कारण, आज जागतिक पुरवठा साखळीत (ग्लोबल व्हॅल्यू चेन) भारत हा एक महत्त्वाचा हिस्सा आहे. परंतु भारतातून येणाऱ्या आयात मालावर जादा कर लादण्यात आल्यास किंवा मालाच्या आयातीवर संख्यात्मक निर्बंध आल्यास भारताला फटका बसू शकतो. उच्च कर आणि व्यापारयुद्धामुळे अमेरिकेत उद्या चलनफुगवट्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यातच अमेरिकेची तूट वाढली तर आणि तेथील अर्थ संस्थांच्या स्वायत्ततेवर आक्रमण झाल्यास अमेरिकेत होणाऱ्या गुंतवणुकीला फटका बसू शकेल. अमेरिकेत आर्थिक अस्थिरता निर्माण झाल्यास, भारतीय रिझर्व्ह बँकेलादेखील व्याजदराबद्दल वेगळा विचार करावा लागेल. डिसेंबर २०२४ नंतर व्याजदर कपात होऊ शकते, असे सूतोवाच रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी केले आहे. परंतु त्यांनाही ट्रम्प यांची धोरणे लक्षात घेऊनच आपली धोरणे आखावी लागतील. किमान पुढील वर्षात भारतात व्याजदरात घसरण झाल्यासभ ारताच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, हे लक्षात घेतले पाहिजे. सप्टेंबर २०२४ मध्ये संपलेल्या तिमाहीमध्ये भारतातील बड्या कंपन्यांच्या विक्रीत घट दिसून असून त्यांच्या ऑपरेटिंग नफ्यात केवळ सहा टक्क्यांची वृद्धी झाली आहे. बजाज ऑटो, अल्ट्राटेक सिमेंट, गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट, पिडिलाइट, पॉलीकॅब या कंपन्यांनी गुंतवणूकदारांचा अपेक्षाभंग केला आहे.

अमेरिकेने हळूहळू चीनऐवजी अन्य देशांकडे आपला मोर्चा वाढवण्यास सुरुवात केली आहे. ट्रम्प यांच्या कारकीर्दीत चीनमधून होणाऱ्या आयातीवर कुऱ्हाड कोसळणार आहे. भारताने याचा फायदा घेतला पाहिजे. गेल्या सात वर्षांमध्ये जागतिक इलेक्ट्रॉनिक्स बाजारपेठेतील चीनचा वाटा कमी कमी होत चालला आहे. केंद्र सरकारने दिलेल्या प्रोत्साहनामुळे अमेरिकेतील इलेक्ट्रॉनिक्स आयातीतील भारताचा वाटा दसपटीने वाढून आता दोन टक्क्यांवर जाऊन पोहोचला आहे. परंतु अन्य क्षेत्रांमध्ये भारताला असे यश मिळवता आलेले नाही. उलट, व्हिएतनाम, मलेशिया, थायलंड, तैवान या देशांनी निर्यातीमध्ये घोडदौड केली आहे. बांगलादेशातील सत्तांतरानंतर तेथील वस्त्रोद्योगाला फटका बसू शकतो. त्याचाही जास्तीत जास्त लाभ उठवून भारताने जागतिक वस्त्र बाजारपेठ काबीज केली पाहिजे. ट्रम्प यांच्या अध्यक्षपदावरील निवडीने भारताला चीनकडून धोका कमी होण्याचा वेग वाढेल. ट्रम्प यांच्या धोरणाची जी भीती घातली जाते, तिचा भारतावरील आर्थिक प्रभावही मर्यादित राहील. कारण भारताची अर्थव्यवस्था मुख्यत्वे देशांतर्गत मागणीवर चालते. त्यामुळे अमेरिकेच्या कमकुवत वाढीमुळे होणारे संभाव्य नुकसान रोखले जाईल आणि नकारात्मक वाढीचा प्रभाव मर्यादित असेल.

याउलट, चीनच्या वाढीवर परिणाम झाल्यामुळे आणि जीवाश्म इंधनाकडे अधिक वळवल्यामुळे वस्तूंच्या किमती कमी होतील. कच्च्या तेलाच्या किमती कमी होणे भारतासाठी फायदेशीर ठरेल. भारताचा मोठा परकीय चलन साठा आणि वित्तीय शिस्त कोणत्याही अस्थिरतेला तोंड देऊ शकते, असे 'नोमुरा'च्या अहवालात म्हटले आहे. ट्रम्प सत्तेत आल्याने भारतावर काय परिणाम संभवतो, याचा लेखाजोखा या अहवालात मांडण्यात आला आहे. भारताचा राखीव परकीय चलन साठा मोठा आहे. स्थिर वाढ-मध्यम चलनवाढीचे मिश्रण आहे. वित्तीय शिस्त आणि सुधारणांकडे भारताचे सातत्याने लक्ष असते. अमेरिकन धोरणांमुळे उद्‌भवणारी कोणतीही अस्थिरता हाताळण्यासाठी योग्य आहे. भारतीय निर्यात क्षेत्राला महत्त्वपूर्ण फायदे मिळू शकतात. चीनी उत्पादनांवर उच्च शुल्क असल्याने भारताला फायदा होऊ शकतो. यामुळे ऑटो पार्टस, सौर ऊर्जा साधने, मार्केटमध्ये रासायनिक उत्पादन यासारख्या क्षेत्रांमध्ये भारतीय उत्पादकांची स्पर्धात्मकता वाढू शकते.

ट्रम्प यांच्या जीवाश्म इंधन धोरणांमुळे आणि चीनच्या मंद आर्थिक वाढीमुळे ऊर्जा खर्चात घट होऊ शकते. हे एचपीसीए, बीपीसीएल, आयओसीसारख्या भारतीय तेल कंपन्या आणि आयजीएल आणि एमजीएलसारख्या गॅस वितरण कंपन्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. उत्पादन आणि संरक्षण क्षेत्रात तेजी येऊ शकते. अमेरिकन उत्पादन आणि लष्करी क्षमता बळकट करण्यासाठी त्यांचे लक्ष भारत डायनॅमिक्स आणि एचएएल सारख्या भारतीय संरक्षण कंपन्यांसाठी चांगले ठरु शकते. ट्रम्प हे जगातील अनेक देशांमध्ये पसरलेला तणाव संपवू शकतात. अशा परिस्थितीमध्ये पुरवठा साखळीत सुधारणा होईल. त्यामुळे भारतीय व्यवसायाला मदत होईल. अमेरिकेच्या औद्योगिक विकासावर ट्रम्प यांचा भर आहे. अशा स्थितीत दोन्ही देशांमध्ये कार्यरत कंपन्यांना फायदा होऊ शकतो. यामध्ये एबीब, सीमेन्स, कमिन्स, हनीवेल, जीईटी अँड डी आणि हिताची एनर्जी यांचा समावेश आहे. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली व्यावसायिक वातावरण सुधारू शकते. यामुळे कॉर्पोरेट टॅक्समध्ये कपात होण्याची शक्यता आहे. चीनला काउंटरवेट म्हणून भारताचे सामरिक महत्त्व ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली मजबूत होत राहील, दोन्ही देशांमधील भागीदारी संरक्षण, सुरक्षा आणि आर्थिक क्षेत्रात मजबूत राहील. अहवालानुसार भारत आणि अमेरिकेचे सखोल आर्थिक आणि धोरणात्मक हितसंबंध आहेत. अमेरिका भारताला चीनसाठी प्रतिस्पर्धी मानत असल्याने, भारताची मोठी देशांतर्गत मागणी-आधारित अर्थव्यवस्था अमेरिकेच्या कमकुवत आर्थिक वाढीच्या संभाव्य नकारात्मक प्रभावांपासून सुरक्षित राहते.

✦✦✦

# मंदीचे सावट असले तरी...

**आताप्रमाणेच २००८ मध्येही जगावर मंदीचे सावट होते. त्यानंतर कोव्हिडकाळात जगाने अशाच स्थितीचा अनुभव घेतला. मात्र या दोन्ही वेळी जागतिक परिस्थिती मंदीसदृश्य असताना भारताला फारशी झळ पोहोचली नाही. मात्र सध्या भारतात बऱ्याचशा उत्पादनांची मागणी घटलेली दिसते. त्यातही सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या वाहनउद्योगावर परिणाम दिसतो आहे. ही बाब गांभीर्याने बघण्याजोगी आहे.**



दखल
डॉ. अनंत सरदेशमुख
ज्येष्ठ अभ्यासक

जागतिक आणि देशपातळीवर घडणाऱ्या अनेक घडामोडींचा परिणाम अर्थव्यवस्थेवर स्पष्ट दिसून येत असतो. या अर्थाने विचार करता अमेरिकेने अध्यक्ष म्हणून ट्रम्प यांना निवडून दिल्याने बरीच समिकरणे बदलण्याची शक्यता आहे. त्यांच्या धोरणांनुसार अमेरिकेची पुढील वाटचाल अमेरिकन लोकांच्या एकंदर अपेक्षांच्या बाजूने असेल. त्यातूनच इतरांमुळे आपल्या संधी कमी होत असल्याची अमेरिकन लोकांची भीती कमी करण्याचा प्रयत्न होईल. स्थानिकांच्या संधी वाढवण्यासाठी ट्रम्प नक्कीच प्रयत्न करतील. मागील कार्यकाळाप्रमाणेच आताही ते यासंबंधी काही धोरणे आणतील. दुसरीकडे सध्या जगात काही युद्धे सुरू आहेत. इस्त्रायल-हमास, रशिया-युक्रेन युद्ध अद्यापही थांबलेले नाही. या पार्श्वभूमीवर अध्यक्षपदी विराजमान झाल्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध थांबवण्याचे आवाहन केले होते, कारण जागतिक अर्थव्यवस्थेवर याचा मोठा परिणाम होतो आहे. मंदीचे सावट वाढत आहे. त्यामुळेच आजच्या जगापुढे हेदेखील एक मोठे संकट आहे.

अमेरिका तसेच युरोपियन देशांना मंदीची अधिक भीती असून आत्तापर्यंतच्या अंदाजाप्रमाणे जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढ कमी राहण्याची शक्यता आहे. ज्यो बायडन यांच्या काळापेक्षा ट्रम्प यांच्या सुरूवातीच्या काळात अमेरिकेतील परिस्थितीही फारशी उत्साहवर्धक दिसत नाही. विकासाचा वेगही मंदावला आहे. तो वाढवण्यासाठी ट्रम्प निश्चितच प्रयत्न करतील वा ते त्यांना करावेच लागतील. जागतिक मंदीमागील मुख्य कारण जगभरातील अशा प्रकारचे अस्थिर वातावरण असल्यामुळे ते निवडण्यासाठी आगामी काळात प्रत्येक देशालाच प्रयत्न करावे लागतील. यासाठी जगभरातील प्रथम क्रमांकाची अर्थव्यवस्था असणाऱ्या अमेरिकेकडून पुढाकार घेतला जाणे अपेक्षित आहे. ते सफल झाल्यास मंदीचे सावट दूर होण्यास मदत होईल. शेवटी अमेरिकेची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी जगातील अन्य देशांच्या अर्थव्यवस्था सुधारण्यानेही मोठी मदत होणार आहे.

जगात सध्या सुरू असणारी युद्धे बराच काळापासून सुरू आहेत. कुठे तरी युद्धात गुंतलेल्या राष्ट्रांवर त्याचा ताण जाणवू लागला असून ती थांबवण्याची गरज भासू लागली आहे. त्यामुळेच आगामी काळात संबंधित देशांकडूनही तशी इच्छा व्यक्त केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मंदीचे गांभीर्य कमी होण्यास ही बाबही पूरक ठरणारी असेल.

एकंदर आत्तापर्यंतच्या अनुभवावरुन मंदीच्या दृष्टीने भारताचाही विचार करायला हवा. २००८ मध्येही जगावर मंदीचे सावट होते. त्यानंतर कोव्हिडकाळात जगाने अशाच स्थितीचा अनुभव घेतला. मात्र या दोन्ही वेळी जागतिक परिस्थिती मंदीसदृश्य असताना भारताला फारशी झळ पोहोचली नाही. मात्र सध्या भारतातील स्थिती पाहिली तर बऱ्याचशा उत्पादनांची मागणी घटलेली दिसते. त्यातही सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या वाहन उद्योगावर परिणाम दिसतो आहे. खेरीज अन्य अनेक मालाची विक्रीही हव्या त्या प्रमाणात होताना दिसत नाही. खरे पाहता अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा आणि विकासाचा वेग वाढता राहण्यासाठी विक्री वाढत राहणे गरजेचे असते. मात्र सध्या हे चित्र दिसत नाही, हेदेखील आपण समजून घ्यायला हवे. चलनवाढ हादेखील भारतासाठी चिंतेचा विषय आहे. अर्थात असे असले तरी यंदा भारताने चांगला मान्सून अनुभवला. त्यामुळे अन्नधान्याचे उत्पादनही चांगले आले. आता पिके शेतकऱ्यांच्या हाती येऊन सुगीचे वातावरण अनुभवायला मिळेल. यातून हाती चांगला पैसा आल्याने आनंदाचे आणि खरेदीला पूरक वातावरणही बघायला मिळेल. म्हणूनच आगामी काळात भारताची अर्थव्यवस्था सुधारण्याची मोठी शक्यता आहे.

भारतातील उद्योगांची स्थिती इंग्रजी के अक्षरासारखी आहे, असेही म्हणता येईल कारण या अक्षराप्रमाणेच भारतातील काही उद्योग वाढताना दिसतात तर काहींमध्ये अपेक्षित वाढ दिसत नाही. यात अनेक लघु-मध्यम उद्योगांचा समावेश आहे. देशातील प्रमुख समजली जाणारी वाहन उद्योगासारखी क्षेत्रे कमी खपाने ग्रस्त आहेत तर काही उद्योगांमध्ये चांगली वाढ बघायला मिळत आहे. उदाहरणार्थ हाय टेक क्षेत्रात बरीच प्रगती बघायला मिळत आहे. त्याचबरोबर वित्तीय तंत्रज्ञानात समाधान, प्रगती दिसते आहे. आयटी क्षेत्र, कृत्रिम बुद्धिमत्ता यातही चांगली प्रगती दिसत आहे. भारतातील स्टार्ट अपही समाधानकारक पद्धतीने वाढत आहे. अर्थातच एकीकडे जागतिक मंदीचे सावट असताना वा प्रत्येक देशावर ही टांगती तलवार असताना भारताच्या अर्थव्यवस्थेला निर्धोक ठेवण्यास ही स्थिती कारणीभूत ठरणार आहे. मात्र उत्पादनात खुंटलेल्या प्रगतीचा भारताला गांभीर्याने विचार करावा लागेल. विकासाची गती चांगली राहण्यासाठी ती अत्यंत गरजेची आहे. अर्थातच मोदींच्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कारकिर्दीत याकडे लक्ष दिले जात आहे. त्यांनी यापूर्वीच भारताला मॅन्युफॅक्चरिंग हब बनवण्याचा विचार बोलून दाखवला आहे. त्याचबरोबर त्यांचे देशाला सेमी कंडक्टर हब बनवण्याचेही धोरण असून त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या दृष्टीने त्यांची धोरणे समोर येणार असून प्रभावी अंमलबजावणीकडे प्रशासनाचे लक्ष असणार आहे. हे पूर्ण क्षमतेने आणि वेगाने झाल्यास भारताला प्रगतीच्या मोठ्या संधी मिळतील, यात शंका नाही.

सध्या भारतातील रोजगारनिर्मिती मंदावली आहे. सरकारने ती वाढवून या क्षेत्रामध्ये नवीन तंत्रज्ञानाची गरज पूर्ण करायला हवी. अर्थात त्या दृष्टीने भारताने काही देशांशी करार केले आहेत. खेरीज विजेवर चालणाऱ्या बॅटरींसाठी लागणाऱ्या खनिजांचा शोध घेण्यासाठी, दुर्मीळ खनिजे शोधण्यासाठीही काही योजना प्रस्तावित आहेत, कारण देशात त्याचा मोठा साठा असण्याची शक्यता आहे. त्यामुळेच येत्या काळात इतर राष्ट्रांच्या मदतीने सरकार काही प्रयत्न करण्याची शक्यता आहे. उत्खननाच्या या कामांमध्ये अपेक्षित लाभ दिसला तर आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे महत्त्व वाढल्याखेरीज राहणार नाही. या खनिजांना जागतिक बाजारपेठेत चांगली मागणी आणि उत्तम किंमत असल्यामुळे परकीय चलन, निर्यात वाढण्यासाठी ही बाब महत्त्वाची ठरेल. प्रचंड खरेदी क्षमतेमुळे, मोठ्या बाजारपेठेमुळे जगातील प्रत्येक देश भारताकडे आशेने आणि सकारात्मक दृष्टीकोनातून बघतो. भारतात नवीन तंत्रज्ञानाला मागणी आहे. इथली उद्योजकता चांगली आहे. म्हणूनच अमेरिकेसह अन्य देशांचे लक्ष भारताकडे आहे. हे लक्षात घेता आगामी काळात अमेरिकेचे भारताबरोबरील संबंध चांगलेच राहणार आहेत. अर्थातच ते चांगले राखण्यासाठी अमेरिका व्हिसासारखे नियम भारतीयांना साह्यभूत ठरतील याची दक्षता घेईल. कारण त्यांना भारताला दुखवून चालणार नाही. या दृष्टीने त्यांच्या बदलत्या धोरणांचा अभ्यास विचार आता करावा लागेल.

भारतीय अर्थव्यवस्था वाढत असून ती अत्यंत चांगल्या वळणावर आहे. त्या दृष्टीने सरकारी धोरणे राबवली जाणार आहेत. मात्र उद्योगाचा सकारात्मक सहभाग महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो हे विसरुन चालणार नाही. कोणतेही सरकार सत्तेत असले तरी उद्योगविश्व देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी प्रयत्न करतच असते. आताच्या काळात या क्षेत्राने प्रयत्नांचा वेग वाढवण्याची गरज आहे. सध्या काही भारतीय उद्योग बाहेरच्या देशांमध्ये चांगले बस्तान बसवत आहेत. भारताला अशा व्यवसायांचा चांगला फायदा होऊ शकतो. मात्र अशा उद्योगांची संख्या वाढणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आपली निर्यात सक्षम आणि आकर्षक होणे गरजेचे आहे. याचे कमी झालेले प्रमाण वाढवणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने नवीन तंत्रज्ञानाची मदत घेऊन काम केले आणि सेवा-उत्पादनाचे क्षेत्र बलवान झाले तर मंदीची टांगती तलवार भारताच्या डोक्यावर राहणार नाही, असे वाटते.

✦✦✦

**झाशीतील वैद्यकीय महाविद्यालयाच्या नवजात शिशु अतिदक्षता विभागाला लागलेल्या आगीत दहा बालकांचा बळी गेला. सरकारी यंत्रणेच्या बेपर्वाई आणि असंवेदनशीलतेने कळ्या उमलण्याअगोदरच खुडल्या. काही महिन्यांपूर्वीच या रुग्णालयाचे 'फायर ऑडिट' झाले होते. अतिदक्षता विभागातील अग्निशमन उपकरणे कालबाह्य झाल्याचे या 'फायर ऑडिट'मध्ये लक्षात आले नव्हते का, असा प्रश्न यामुळे पडतो.**

# बेपर्वाईची आग



उत्तर प्रदेशमधील लखनऊतील रुग्णालयाला आग लागून सहाजणांचा बळी गेल्याच्या घटनेचा विसर पडत नाही, तोच झाशीतील वैद्यकीय महाविद्यालयाच्या नवजात शिशु अतिदक्षता विभागाला लागलेल्या आगीत दहा बालकांचा बळी गेला. त्यातील अनेक मातांनी तर जन्मल्यानंतर आपल्या बाळाला पाहिलेही नव्हते. त्याला मांडीवर घेऊन स्तनपानही केले नव्हते. अनेकांच्या घरात तर बऱ्याच दिवसांनंतर पाळणा हलला. अशा माता आणि पित्यांच्या स्वप्नांचा एका क्षणात कोळसा झाला. झाशीचे राणी लक्ष्मीबाई वैद्यकीय महाविद्यालय देशातील सर्वात जुन्या वैद्यकीय महाविद्यालयापैकी एक समजले जाते. उत्तर प्रदेशमध्ये झाशी विभागात गोरगरीब लोकांच्या उपचारासाठी ते महत्त्वाचे ठिकाण आहे; परंतु सरकारी यंत्रणेच्या बेपर्वाई आणि असंवेदनशीलतेने कळ्या उमलण्याअगोदरच खुडल्या. अहमदाबाद, गडचिरोली, मुंबईसह देशात अनेक ठिकाणी रुग्णालयांना आगी लागून त्यात बळी गेल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने काही आदेश दिले होते. या आदेशाचे पालन फक्त कागदोपत्री झाल्याचे झाशीच्या घटनेवरून दिसते. त्याचे कारण उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांच्या उत्तरातून पुढे आले आहे. काही महिन्यांपूर्वीच या रुग्णालयाचे 'फायर ऑडिट' झाले होते, असे त्यांनी सांगितले. राणी लक्ष्मीबाई वैद्यकीय महाविद्यालयातील अतिदक्षता विभागातील अग्निशमन उपकरणे कालबाह्य झाल्याचे या 'फायर ऑडिट'मध्ये लक्षात आले नव्हते का, असा प्रश्न यामुळे पडतो. त्याबाबतच्या अहवालात नेमके काय म्हटले आहे आणि या त्रुटीवर बोट ठेवूनही वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही का अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आता चौकशी अहवालातून मिळतात का, हे पहावे लागेल.

वेळीच धागा घातला नाही, तर कापड फाटत जाते असे म्हणतात. या वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनाने अशा अनेक फाटलेल्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले. एकीकडे दहा नवजात अर्भकांचा मृत्यू होत असताना दुसरीकडे राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची असंवेदनशील आणि अर्भकांच्या माता-पित्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याची वृत्ती दिसून आली. एवढी मोठी दुर्घटना घडल्यानंतर उपमुख्यमंत्री पाठक रुग्णालयात भेटीला येत असताना त्यांच्या स्वागतासाठी चुना टाकण्यात यंत्रणा गढली होती. कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य नसले की काय होते, त्याचा हा नमुना. झाशीच्या राणी लक्ष्मीबाई वैद्यकीय महाविद्यालयाच्या नवजात शिशू कक्षाच्या अतिदक्षता विभागात लागलेल्या आगीचे कारण अद्यापही स्पष्ट होऊ शकलेले नाही. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचे रुग्णालय प्रशासन सांगत असले, तरी ऑक्सिजन सिलिंडरचा पाईप बसवण्यासाठी परिचारिकेने काडी पेटवली आणि त्यातून भडका उडाला असे काही प्रत्यक्षदर्शी सांगतात. त्यावर अधिकारी काही बोलायला तयार नाहीत. नवजात अर्भकांच्या माता-पित्यांनी तसेच नातेवाइकांनी या कक्षात डॉक्टर आणि परिचारिका उपस्थित असताना आगीनंतर एकही डॉक्टर किंवा परिचारिकेला काही कसे झाले नाही, अर्भकेच कशी जळाली, असे प्रश्न उपस्थित केले. याचा अर्थ आग लागल्यानंतर त्यांनी तिथून पळ काढला. त्याच वेळी आपले अर्भक जळाल्याचे दुःख विसरून त्याने अन्य पाच अर्भकांना तातडीने दुसरीकडे हलवत प्राण वाचवले.

अतिदक्षता विभागात उपकरणे जास्त असल्याने शॉर्ट सर्किट झाल्याचे सांगण्यात येते. ठिणगी ऑक्सिजन केंद्रापर्यंत पोहोचली. त्यानंतरच आग नियंत्रणाबाहेर गेली. कावीळ आणि न्यूमोनियाने त्रस्त नवजात बालकांना जन्मानंतर लगेचच अतिदक्षता विभागात ठेवले जाते. तिथे नवजात मुलाचे तापमान समायोजित करण्यासाठी वॉर्मर्सदेखील ठेवण्यात आले होते. या कक्षाची क्षमता १८ रुग्णांची असताना ५४ बालकांना ठेवण्यात आले होते. वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या या रुग्णालयाच्या शेजारी आणखी विस्तारित इमारत बांधण्यात आली आहे. तिथे नवजात कक्षाची क्षमता जास्त आहे. या इमारतीमध्ये सर्व सुविधा तयार करण्यात आल्या आहेत, असे प्राचार्यांनीच सांगितले. मग प्रश्न असा उरतो की नव्या इमारतीमध्ये नवजात कक्ष सुरू करण्याचा किंवा येथे दाटीवाटीने रुग्ण ठेवण्यापेक्षा तिकडे हलवण्याचा निर्णय का घेतला गेला नाही. रुग्णालय प्रशासन, प्राचार्य आणि राज्याचा आरोग्य विभाग दहा नवजात बालकांचा बळी जाण्याची वाट पाहत होता का? अतिदक्षता विभागात क्षमतेपेक्षा तिप्पट नवजात बालकांना दाखल करण्यात आले. त्यामुळे जीवरक्षक उपकरणे सतत चालू ठेवावी लागली. मॉनिटरींग मशीनही सतत चालू राहते. तीन-चार तासांनंतर भार कमी करण्यासाठी यातील काही उपकरणे बंद करावी लागतात. रुग्णालय प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दुर्घटनेच्या रात्री ही उपकरणे वेळेवर बंद होऊ शकली नाहीत. यामुळे उपकरणे कमालीची गरम झाली. त्यातच शॉर्टसर्किट होऊन ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरवर परिणाम झाला आणि ऑक्सिजनची गळती सुरू होऊन आग वेगाने पसरली असेही सांगितले जाते.

काही मिनिटांमध्येच आग दोन्ही खोल्यांमध्ये पसरली. या दोन ब्लॉकमध्ये नवजात बालकांना ठेवण्यात आले होते. आग लागल्याचे समजताच पहिल्या ब्लॉकमध्ये दाखल असलेल्या अर्भकांना तातडीने बाहेर काढण्यात आले; मात्र शेवटच्या ब्लॉकमध्ये दाखल असलेल्या अर्भकांना बाहेर काढता आले नाही. ऑक्सिजन पाईप वितळण्यासाठी कॉन्सन्ट्रेटर बंद न करता गरम करण्यात आला. त्यामुळे ऑक्सिजनची गळती होऊन वॉर्डात आग पसरली, असेही सांगितले जात असले तरी आता ते कोणीच मान्य करणार नाही. यात मानवी चुकीपेक्षा तांत्रिक चुकीवर खापर फोडले जाण्याची शक्यताच जास्त आहे. या वैद्यकीय महाविद्यालयाच्या अतिदक्षता विभागात फायर अलार्म का लावला नाही, आग शमवण्यासाठी लागणारी उपकरणे का वापरली गेली नाहीत, असे प्रश्नही उपस्थित होतात. अग्निशामक यंत्रे कालबाह्य झाली होती का, नवजात केअर युनिटच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत होते का या प्रश्नांची उत्तरे चौकशीतून पुढे आली पाहिजेत. नवजात अर्भकांच्या केअर सेंटरसाठी मार्गदर्शक तत्त्वे खूप कठोर आहेत; परंतु येथे कोणालाही त्याची काळजी नव्हती. आगीच्या वेळी तिथे असलेली अग्निशमन यंत्रे कालबाह्य झाली होती. काहींची मुदत वर्षभरापूर्वी तर काही सिलिंडरची मुदत तीन ते चार वर्षांपूर्वी संपली होती. एकही सिलिंडर काम करत नव्हते. वॉर्डात आग लागली, तेव्हा तेथे असलेले पाण्याचे स्प्रिंकलरही काम करत नव्हते, त्यामुळे ही दुर्घटना घडली. अशा परिस्थितीत नेमके कशाचे 'फायर ऑडिट' झाले, हा प्रश्न उपस्थित होतो.

आग कशी लागली आणि एवढी कशी वाढली हा मोठा प्रश्न आहे; मात्र याहूनही मोठा निष्काळजीपणा समोर येत असून, त्यामुळे नुकसान कमी होण्याऐवजी त्याला भीषण स्वरूप आले आहे. दुर्घटनेच्या दिवशी या घटनेनंतर एकच गोंधळ उडाला. कुटुंबीय आणि उपस्थितांनी वॉर्डची खिडकी तोडून मुलांना बाहेर काढले. येथे प्रवेश करण्यासाठी आणि बाहेर पडण्यासाठी एकच गेट होते. क्रिटिकल केअर युनिट आत होते. धुराचे लोट असल्याने अडकलेल्या मुलांचा बचाव करता आला नाही. या ठिकाणी अडकलेल्या मुलांचा मृत्यू झाला. बाहेर होते ते वाचले. घटनास्थळी उपस्थित कुटुंबीयांनी रुग्णालय प्रशासन आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर गंभीर आरोपही केले आहेत. या घटनेत एकही वैद्यकीय कर्मचारी जखमी झाला नसल्याचा आरोप त्यांनी केला. आग लागल्यावर पळून जाण्याऐवजी त्यांनी तातडीने मदत केली असती, तर घटनेची तिव्रता इतकी वाढली नसती. आता या घटनेची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने घटनेची दखल घेतली असून राज्य सरकारला जाब विचारला आहे. आयोगाने मुख्य सचिव आणि डीजीपी यांना नोटीस बजावली असून सात आठवड्यांमध्ये अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले असून हे मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. आयोगाने या प्रकरणातील फिर्याद, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई, जखमींना दिले जाणारे वैद्यकीय उपचार आणि पीडितांच्या कुटुंबीयांना देण्यात येणारी भरपाई याबाबत माहिती देण्यास सांगितले आहे. याशिवाय अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी काय पावले उचलली आहेत, अशीही विचारणा केली आहे.

✦✦✦

# वरची सभागृहे खरेच वरिष्ठ राहिलीत का?

डॉ. अमोल अन्नदाते

भारतीय लोकशाहीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभा ही थेट लोकांमधून निवडून जाऊन राज्यव्यवस्था चालवण्याची आणि बदलण्याची संधी असते.

यासोबत पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ हे विभागवार निर्माण करून शिक्षित मतदारांना त्यांचा प्रतिनिधी निवडण्याची संधी देण्यात आली आहे. लोकांमधून निवडून जाण्याव्यतिरिक्त लोकशाही प्रक्रियेच्या मजबुतीसाठी राज्यसभा आणि विधान परिषद अशी वेगळी व्यवस्थाही निर्माण करण्यात आली.

सध्या ६ राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात आहे. या सभागृहांना वरिष्ठ म्हणजे लोकसभा आणि विधानसभेपेक्षा वरची सभागृहे मानले गेले आहे. पण, गेल्या काही वर्षांत या सभागृहांसाठी सदस्य निवडण्याचे निकष आणि नेमणुकीचे प्रमाण बघता ही खरेच वरिष्ठ राहिली आहेत का, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे.

बौद्धिक, वैचारिक, सामाजिक क्षेत्रांबरोबरतच कला, क्रीडा, विज्ञान, वैद्यकीय, अर्थशास्त्र अशा विविध क्षेत्रांतील पारंगत लोकांच्या सहभागामुळे संसदीय लोकशाही आणि शासन अधिक प्रभावी होईल, या विचारातून ही व्यवस्था निर्माण झाली. ज्या लोकांना निवडणूक लढवणे शक्य नाही, आपापल्या क्षेत्रातील कौशल्य आणि व्यस्ततेमुळे ज्यांना लोकांमधून निवडून जाण्यात राजकीय अडथळे येऊ शकतात, त्यांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा एक मार्ग म्हणून वरिष्ठ सभागृहांकडे बघितले जायचे. किंबहुना तेथील लोक अधिक ज्ञानी, विचारी म्हणून ते वरचे सभागृह मानले जाऊ लागले.

या सोबतच राजकीय संघटनेत आणि पक्षबांधणीमध्ये अनेक वर्षे घालवलेल्यांनाही या सभागृहात काही प्रमाणात संधी मिळणे ही गोष्टही समजण्यासारखी आहे. पण, हे सभागृह पूर्ण राजकीय किंवा कुठल्या न कुठल्या राजकीय पक्षाशी निगडीत आणि त्याचे सदस्य असलेल्या, राजकारणात सक्रिय असलेल्यांनीच भरलेले असावे, असा कधीही त्यामागचा हेतू नव्हता.

गेल्या साधारण वीस वर्षांत मात्र या सभागृहांचे स्वरूप बदलत गेले. विधान परिषदेच्या काही जागांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांतून निवडून गेलेले लोकप्रतिनिधी आणि काही जागांसाठी विधानसभेचे प्रतिनिधी मतदान करतात.

या निवडणुका प्रत्येक पक्षाच्या संख्याबळाप्रमाणे जेवढ्या जागा आहेत, तितकेच उमेदवार अशी बिनविरोध झाली नाही तर त्या विधानसभेच्या निवडणुकीपेक्षा अधिक खर्चिक होतात. राजकीय संदर्भात घोडेबाजार या शब्दप्रयोगाचा वापर सुरू झाला, तो याच निवडणुकांमुळे. मग अशी स्थिती असेल, तर या सभागृहात विचारी, अराजकीय व्यक्ती जाणार कशी? त्यातच राज्यसभा आणि विधान परिषदेच्या अशा जागा म्हणजे पक्षासाठी मागच्या व पुढच्या दाराने निधीचा स्त्रोत असू शकतो, हा शोध पक्षांना लागला. त्यामुळे अनेक पुंजीपतींची वर्णी या सभागृहांमध्ये लागू लागली.



पुढे ही सभागृहे पक्षांसाठी राजकीय खरेदी-विक्रीचा बाजार ठरू लागला. काही अराजकीय किंवा राजकारणाच्या वतुर्ळातील पण विचारवंत, अभ्यासू लोकांना या सभागृहांमध्ये संधी मिळालीही; मात्र अशी उदाहरणे विरळच होत गेली.

राज्यसभेत राष्ट्रपती नियुक्त आणि विधान परिषदेत राज्यपाल नियुक्त सदस्यांचाही समावेश असतो. ही नियुक्ती असल्याने ती राजकारणापासून अलिप्त असणे अपेक्षित असते. पण, यासाठीची नावे मंत्रिमंडळ बैठकीत सत्ताधारी पक्षच ठरवतात आणि या नावांची यादी केवळ स्वाक्षरीसाठी राज्यपालांकडे जाते.

राज्य सरकार एका पक्षाचे आणि राज्यपाल दुसऱ्या राजकीय पार्श्वभूमीचे असल्यास अशा नियुक्त्यांचे काय होते, हेही महाराष्ट्राने अनुभवले आहे.

एकेकाळी या दोन्ही सभागृहांमध्ये महत्त्वाच्या विषयांवर अगदी मध्यरात्रीपर्यंत चर्चा चालत. पंतप्रधान, मुख्यमंत्री तसेच सत्ताधारी आणि विरोधी नेते त्यावेळी आवर्जून उपस्थित राहत. या सभागृहांमध्ये मांडलेल्या अनेक प्रश्नांनी देशाच्या आणि राज्याच्या धोरणांना दिशा दिली गेली.

वि. स. पागे यांनी १९७२ च्या दुष्काळात सुचवलेली रोजगार हमी योजना, राज्यात अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणासाठी खासगी संस्था सुरू करण्याचा निर्णय असे अनेक ऐतिहासिक निर्णय या वरिष्ठ सभागृहांतील चर्चेतून आले.

आता मात्र वरच्या समजल्या जाणाऱ्या या सभागृहांमध्ये अनेकदा अत्यंत खालची भाषा वापरली जाते. दोन्हीकडील सदस्यांनी एकमेकांना शिवीगाळ केल्याने त्यांचे निलंबन झाल्याच्या घटना वारंवार घडल्या आहेत.

याच सभागृहांसाठी पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातून सदस्य निवडले जातात. पण, या निवडणुका कधी होतात हेही अनेकदा मतदारांना कळत नाही. या निवडणुकांसाठी दर सहा वर्षांनी नव्याने नोंदणी करण्याची सक्ती कशासाठी, हेही न उमगण्यासारखे आहे.

एकदा एखाद्या विभागात पदवीधर म्हणून नोंदणी केली की प्रत्येक निवडणुकीत मतदान करता यायला हवे. या निवडणुका त्यांच्या मतदारांपासून इतक्या लांब गेल्या आहेत की, आपला शिक्षक आणि पदवीधर आमदार कोण, हेही त्या मतदारांना माहीत नसते.

लोकशाहीमध्ये लोकांमधून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे महत्त्व आहेच. त्यातून अगदी अल्पशिक्षित व्यक्तीलाही राज्यकर्ता बनण्याची संधी मिळते, हे या व्यवस्थेचे वेगळेपण आहे. पण म्हणून सुशिक्षित वा उच्चशिक्षितांना संधी मिळू नये, असा याचा अर्थ नाही.

अशी संधी राज्यसभा आणि विधान परिषदेसारख्या सभागृहांमुळे उपलब्ध होते. राज्यकर्ते आणि कल्याणकारी राज्याची व्यवस्था कशी असावी, हे सांगताना प्लेटो म्हणतो- विचारी, बुद्धिमान आणि तत्त्ववेत्ते राज्यकर्ते बनत नाहीत, तोपर्यंत शहरांची त्रासापासून पूर्ण मुक्तता होणार नाही. म्हणून तत्त्ववेत्त्यांना सामावून घेणाऱ्या सभागृहांचे पावित्र्य जपले जाणे आवश्यक आहे, एवढे मात्र नक्की सांगता येईल.

■ ■ ■

# मंगन से क्या मांगिए, बिन मांगे जो देय...

हेमकिरण पत्की



कबीरांच्या पदातील, दोह्यांतील प्रतिकांतून त्यांची चिंतन-भूमी जीवनाचीच असल्याचं जाणवतं. रोजच्या जगण्याशी जोडलेल्या या प्रतिकांमुळं कबीरांची सत्य सांगण्याची रीत प्रत्ययकारी होते.

कबीरांची भाषा अनेक बोली-भाषांच्या मिश्रणातून तयार झाली असल्यानं तिच्यात लोकभाषेचा बाज आहे. भाषेतील शब्दांशी आपण अडून राहिलो, तर कबीरांचं ह्यमसि कागद छुओ नही आणि लिखालिखी की है नही, देखादेखी बात यांतलं मर्म आपल्या ध्यानात येणार नाही.

कबीरांचं अनुभवकथन हे प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवण्याच्या तीव्र तळमळीतून घडलेलं आहे. एक भक्त म्हणून ज्या अवस्थांमधून त्यांना जावं लागलं, त्या अवस्थांची वर्णनं कबीरांच्या पदात, दोह्यांत आपल्याला दिसतात. देवाजवळ केलेल्या प्रार्थनेत आणि मागणीत फरक असल्याचं कबीर सांगतात.

साधारण भक्त देवाजवळ कुठल्या न कुठल्या सुखाचं मागणं मागतो. कबीर म्हणतात की, या मागणीत सुख पहिल्या स्थानावर आणि देव दुस?्या स्थानावर असतो. मात्र, प्रार्थनेत आपल्या हृदयाच्या स्थितीचं अपेक्षा नसलेलं निवेदन असतं. कबीर हृदयातून गातात...

*मोर फकिरवा मांगि जाय,*
*मैं तो देखहू न पौल्यौं।*

ते म्हणतात, मी तर फकीर आहे. घरादारातल्या माणसांना जवळून निरखतो, तर तिथं आधीच मला कित्येक मागणारे दिसतात. देणारं कुणी नाहीच काय, असं माझ्या फकीर- मनात येतं. कित्येक जण सधन असतात, पदं-उपाधी असलेली असतात. एवढी प्रस्थापित असूनही आपल्या वासनांच्या पलीकडचं ती पाहू शकत नाहीत. नसून असण्यातली फकिरी त्यांना जाणवत नाही. जोवर ही जगण्यात उणेपणाची भावना आहे, तोवर मागायची वृत्ती राहते. गरजा भागलेले अजून काहीची मागणी करतात, न भागलेले तर असंतुष्ट मनाचं भिक्षापात्र घेऊन देवाच्या दारात उभे असतात!



*मंगन से क्या मांगिए,*
*बिन मांगे जो देय।*

कबीर म्हणतात, आपण ज्या संबंधित माणसाला मागतो, त्याच्या हातात भिक्षापात्र असेल, तर त्याला काय मागावं?मागितल्यावर मिळतं त्यात मौज कुठली? आत्मप्रतिष्ठा कसली? देव तर आईवडिलांकडून जन्माला आल्याचा अनुभव देतो, असतेपणाचं भान देतो, सृष्टीदर्शनाची रीत शिकायची स्थिती निर्माण करतो आणि अंतिम सत्याचा बोध घडवून आणतो. अशा महादानी देवाला सोडून ज्यांच्या मागण्या कधीच संपणार नाहीत त्यांना भिक्षा कशाला मागायची? न मागता देव आपलं मन, हृदय जाणतो, त्याला काहीच न मागता हृदयाची स्थिती निवेदन करणं उचित! कबीरांना हीच ख?या भक्ताची हृदयस्थिती वाटते. म्हणून कबीर या पदातून सुचवतात की, भक्त देवाजवळ काहीच मागत नाही आणि त्याच्यावर मनाच्या शांततेची, हृदयाच्या समाधानाची अनायासे कृपावर्षा होते.

देवाजवळ काहीच न मागण्याच्या मनाच्या स्थितीतून आपण ह्यजे आहेह्ण त्याचं स्वस्थपणे आकलन करून घेऊ शकतो. आपली अधिकाची हाव आणि इंद्रियगत सुखाच्या बदलांमागे धावण्याची वृत्ती आपल्याला उमजते. आपल्या श्रद्धावान मनाला ह्यदेणाराह्ण उमजतो आणि आतला घेणाराही उमजतो. कबीर म्हणतात...

*कहै कबीर मैं हौं वाही को,*
*होनी होय सो होय।*

आता मी कधीच म्हणत नाही की असं व्हावं तसं व्हावं. मनाच्या अपेक्षा विरलेल्या असतात, इच्छा बाळगण्यातली निरर्थकता उमजलेली असते, परिस्थिती आणि मन:स्थिती बदलण्याचे सायास त्यांच्या मर्यादेसह जाणिवेत आलेले असतात, या अशा चित्ताच्या स्थितीत कबीर म्हणतात की, आपले प्राण ईश्वरावर सारं सोपवून देतात.

यामुळं हृदयावरचा भार हलका होतो. चित्त चिंतामुक्त झाल्यानं आता जीवनात जे घडेल ते ईश्वराच्या इच्छेनं घडेल, अशी दृढता चित्ताला येते, असं ते अनुभवातून सांगतात. कबीरांनी दिलेलं यांतलं नियतीचं सूचन स्मरणीय आहे. केवळ भक्तालाच नियती दृष्टीसमोरच्या वस्तूसारखी लख्ख दिसू शकते आणि त्याच्या चित्ताला प्रार्थनेचा अर्थ उमजू लागतो. कबीरांच्या पदाचा हा भावार्थ आपल्याला प्रार्थनाशील करतो.

■ ■ ■

# लढा दिल्याशिवाय मागण्यांची पुर्तता होणे नाही

प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com



गोवारी समाजाला आदिवासी दर्जा मिळावा व त्यांना जातप्रमाणपत्रे मिळावीत या मागणीसाठी गोवारी बांधवांनी 23 नोव्हेंबर 1994 रोजी महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन उपराजधानी नागपुरात सुरू असताना आदिवासीत्वाबाबत अडचणी दूर व्हाव्यात या मागणीसाठी विदर्भातून आदिवासी गोवारी जमातीचे लोक लेकरांबाळांसह फडक्यात भाकरी बांधून मोर्चाने विधान भवनावर येऊन धडकले होते.

दिवसभर अनेक मंत्र्यांना विनवण्याकरूनही एकही मंत्री मोर्च्याला सामोरा आला नाही. त्यावेळी तत्कालीन राज्य शासनाच्या नेत्यांच्या हेकेखोर धोरणामुळे व पोलिसांच्या लाठीमारामुळे चेंगराचेंगरी होऊन 114 गोवारी बांधव शहीद झाले. या निराशेतून जमाव हिरमुसला. याचवेळी मोर्चातील उपस्थितांमध्ये चलबिचल सुरू झाल्याचे हेरून नेतृत्त्वहीन समाजबांधवावर पोलिसांनी अंधाधुंद लाठीमार केला. भरदिवसा काळ्याकुट्ट ढगातून कडकडाडत विजा पडाव्यात तशा चारही दिशांनी कोंडी करीत शेकडो पोलिसांनी गोवारींवर लाठ्यांचा वर्षाव केला. मळणीच्या खळ्यात बैलांच्या पाथेकडून कणसे तुडविली जातात तसे गोवारी तुडविल्या गेले.

जीव वाचविण्यासाठी एकच धावाधाव झाली आणि न्याय मिळेल या आशेने आलेल्या गोवारींपैकी 114 निरपराध गोवारी शहीद झाले. त्यात पुरुष, स्त्रिया, बालके यांचा समावेश होता. या शहीदांना शतशः नमन.

शासनाकडून एकतर्फी झालेल्या यांच्या मरणोत्तर कार्यवाहीतून प्रकट झालेला हा शासकीय आकडा आहे. मृतांची संख्या यापेक्षा अधिक असू शकते. या व्यतिरिक्त पोलिसांच्या लाठीमारामुळे व चेंगराचेंगरीतून हे हत्याकांड घडल्याचे शासन सांगत असले तरी इतर अन्य बाबी जबाबदार असल्याची शक्यता वा ऊहापोह ना समाज नेत्यांनी केला ना हत्याकांडांच्या चौकशीसाठी नेमलेल्या दाणी आयोगाने. या दुर्दैवी हत्याकांडास शासन, पोलिस, नेता, सरकारी यंत्रणा मोर्चेकरी यापैकी कोणीही दोषी नव्हते. तर या आत्महत्या होत्या असे शासनाला दाखवायचे होते काय?

अमानुष गोवारी हत्याकांडांचा तीव्र संताप त्यावेळी महाराष्ट्रातच नव्हे तर शेजारील राज्यातूनही उमटला. तमाम जनतेने आपला राग व संताप कार्यरत सरकारे बदलवून व्यक्त केला. गरीब गोवारींप्रती आमजनतेकडून लाभलेल्या सहानुभूतीचा तो परिपाक होता.

महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास स्वातंत्र्यानंतर ते गोवारी कांडापर्यंतच्या 40 वर्षांच्या कालखंडात एकदाही सत्तेवर न आलेले भाजप-शिवसेना पक्ष प्रथमच सत्तारूढ झाले. समाजाप्रती सर्वत्र सहानुभूती आणि परिवर्तनाचे वारे वाहत असताना समाज मात्र धृवपदी अढळ नेतृत्त्वही यास अपवाद नाही. समाजाचा मुख्यप्रश्न नजरेआड करीत वैयक्तिक लाभावर नजर ठेवून राजकीय नेत्यांशी सौदेबाजी करण्यात गोवारींचे नेतृत्त्व मश्गुल आहे आणि नेतृत्त्वाने उर्मीत कां राहू नये? जे नेतेपण विनाकायास रातोरात मीडियाकडून बहाल झाले होते. हत्याकांडाचा शोध आणि बोध घेत वेळीच सर्व समाज घटकांना विश्वासात घेऊन, सोबत एकत्र बसून मागणी पदरात पाडून घेण्यासाठी काहीही केले नाही.

सरकारवर दबाव दडपण आणण्यासाठी संघर्षाची भूमिका घेण्याचे सोडून नेतृत्त्वाचे एकला चलो तच धन्यता मानली. परिणामतः समाजाचा एकोपा निर्माण होण्याऐवजी दुभंगतच राहिला. ही समाजमन व हुतात्म्याशी कृतघ्नता ठरावी. समाजाला आदिवासीत्व बहाल करण्याची एकमेव मागणी अद्याप अडगळीत पडून आहे. त्यामुळे विकासाअभावी एक पिढी बर्बाद झाली आहे. अजून किती पिढ्यांच्या बर्बादीची वाट पाहणार आहोत की कायमच अंगावर अंधार पांघरून 114 गोवारींचे बलिदान वाया घालविणार आहोत? याचा गांभीर्यपूर्वक विचार करण्याची वेळ आली आहे.

गोवारी जमात मुळातच नागरी संस्कृतीपासून कोसो मैल दूर असल्याने महत्त्वाकांक्षाहीन व अल्पसंतुष्ट आहे. अज्ञात दारिद्यात खिचपत पडलेल्या या लोकांना स्वातंत्र्यानंतरच्या 77 वर्षांत योग्य समाजसंस्करण आणि राजकारणाशी थोडाही स्पर्श झाला नाही. अंधश्रद्धा व दारू यांच्या पाचवीला पुजलेली.

संपूर्ण समाजाची आजीविका श्रमाधारित, परावलंबी असल्याने यांच्यात निर्णय शक्तीचा अभाव आहे. बरे-वाईट, फायदा-हानी कशात आहे, विकास-अविकास यातील अंतर समजून घेणे यांच्या आकलनाबाहेरची बाब आहे. वाघ-सपार्शी भिडणारी ही जमात खरं तर हत्याकांड घडल्यानंतर अधिक संघटित व आक्रमक होणे अपेक्षित होते. पण घडतय उलटच.

हत्याकांडानंतर समाजात नित्य नव्या नेत्यांचे पेव फुटले आहे. एक नेता शोधताना पन्नास मिळतील. सभेत भलेही श्रोत्यांची वाणवा राहो याची त्यांना ना पर्वा ना खंत. नेता म्हणून मिरवण्याची यांना भारी हौस असल्याने यांच्यात नेतागिरीसाठी कुतरओढ सुरू आहे. त्यामुळे समाजात एकता प्रस्थापित होण्यास आडकाठी निर्माण होते. गारुड्याने डमरू वाजविताच साप-मुंगसाची लढाई पाहण्यासाठी लहान मुले गारुड्याच्या सभोवताल गोळा होतात.

तो तसा प्रचार करीत असला तरी प्रत्यक्षात साप-मुंगसाची लढाई गारुडी कधीच दाखवित नाही. परंतु भावनिक आर्जव करून बघ्यांना खिशात हात घालायला भाग पाडून पसार होतो. त्याप्रमाणे वासरात लंगडी गाय शहणी म्हणून छोटा-मोठा कार्यक्रम घेणे, राजकीय नेत्यासोबत फोटो काढून छापून आणणे व वाहवा मिळविणे असल्या चमकोगिरीतच धन्यता मानून कृतार्थ होत आहेत.

केवळ शासनाकडूनच या जमातीवर अन्याय होत असल्याचे पूर्णतः खरे नाही. यास समाज घटकही काही अंशी जबाबदार राहीले आहेत. समाजातच एकवाक्यता नसतांना सरकारला दूषणे देण्यात अर्थ नाही. वेगवेगळ्या संघटनांकडून शासनाकडे दाखल करीत असलेल्या मागणी पत्रात मोठ्या प्रमाणात तफावती आणि विसंगती असतात. त्यामुळे मागणीचे गांभीर्य आणि विश्वासार्हता संपुष्टात येते. एक संघटना गोंडगोवारी या शब्दात स्वल्पविराम टाकून गोंड व गोवारी वेगळे करण्याची मागणी नोंदवितात तर दुसरी संघटना गोंडगोवारी नावाची जात आहे. म्हणून गोवारी ना नव्याने समाविष्ट करा म्हणून सांगते. तर तिसरी संघटना गोवारीं नाच गोंडगोवारी समजून सवलती मागतात.

या व्यतिरिक्त काही संघटना अनुसूचित जमातीच्या यादीत, तर काही संघटना अनुसुचित जातीच्या यादीत, तर काही इतर मागास प्रवर्गात समावेश करण्याचा तर काही संघटना इतर मागास प्रवर्गातून काढून टाकण्यासाठी आग्रह धरतात. एकाच जमातीकडून मागणी नोंदविण्याच्या अशा तीन तऱ्हा!

शासनाने नेमकी कोणाची कोणती मागणी विचारार्थ घ्यावी? लोकशाहीत समाजात किती संघटना असाव्यात यावर निर्बंध नाही. समाजाची सेवा करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. याबद्दल दुमत नसावे.

मुद्दा हा आहे की सर्वांनीच एकत्रित बसून तज्ज्ञांकडून समाजाचा घटनात्मक प्रश्न का हाताळला जाऊ नये? समजतात तसा हा प्रश्न साध सोपा अन् सरळ नाही. 1985 नंतर विरोधकांनी हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा करून ठेवला आहे. तेव्हा हा प्रश्न हाताळताना प्रश्नांची उत्पत्ती व व्याप्ती, सामाजिक व अनुवंशिक शास्त्र, विविध जाती जमातींचा अभ्यास, घटना, कायदे इत्यादी बाबत सखोल जाण व अभ्यास असणे आवश्यक आहे. अन्यथा विंचवाचा मंत्र बाळगून नाही अन् सर्पाच्या बिळात हात घालतो असाच हा धोकादायक प्रयत्न आहे. या मुद्यावर शासनासोबत चर्चा करीत असतांना अनेक नेते तोंडघशी पडल्याच्या घटना घडल्या आहेत.

गोवारींची मागणी योग्य आहे. पण प्रयत्नाकृतीत कमतरता व अज्ञान आहे. यावर आत्मचिंतन करावे लागेल. संघटना कितीही असल्या तरी समाजाचे हित डोळ्यासमोर ठेवून आपापसात सलोखा अन् एकवाक्यता आणावीच लागेल. यापूर्वी केलेल्या चुकांची पुनरावृत्ती टाळून एका झेंड्याखाली आत्मविश्वासाने कार्यप्रवण होण्यातच भलाई आहे.

यासाठी आपसातील मत्सर, श्रेय लाटण्याची चढाओढ आणि अहंकाराला तिलांजली द्यावी लागेल. बळीचा बकरा बनून मान खाली घालून होकारार्थी मान हलवून अपयशाचे धनी होऊ नका. शहिदांप्रती निव्वळ अश्रू गाळण्याच्या दिखावू पूर्ततेत धन्यता न मानता त्यांच्या राखेतून फिनिक्स पक्षाप्रमाणे उड्डाण भरा! आता रडण्याने नव्हे तर लढण्यानेच जिंकू असा निर्धार करा!! यश दूर नाही. गोवारी हत्याकांड होऊन 30 वर्षे उलटली. तरीही गोवारी बांधवांची दुर्दशा संपलेली नाही. आज आदिवासी गोवारी शहीद स्मृतीदिनानिमित्त शहीद गोवारी बांधवांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन !

■ ■ ■

महासागर
ग्लॅम वर्ल्ड
रविवार ■ दि. २४ नोव्हेंबर २०२४

# करिअरच्या शिखरावर असताना इंडस्ट्री सोडल्याचा पश्चात्ताप नाही



नुकतीच माधुरी दीक्षित 'भुलभुलैया 3' या चित्रपटात दिसली आहे. सध्या अभिनेत्री चित्रपटाच्या यशाचा आनंद घेत आहे. दरम्यान, एका मुलाखतीत तिने आपले जुने दिवस आठवले. यादरम्यान माधुरीने इंडस्ट्री सोडून पतीसोबत अमेरिकेला जाण्याबाबतही मोकळेपणाने मत मांडले.

माधुरीने तिच्या करिअरमध्ये अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. अभिनेत्रीचे करिअर शिखरावर असताना तिने लग्न केले. माधुरी दीक्षितने 1999 मध्ये डॉ. श्रीराम नेनेंशी लग्न केले आणि लग्नानंतर तिने बॉलिवूड इंडस्ट्री पूर्णपणे सोडली.

गलाटा इंडियाशी बोलताना माधुरी म्हणाली की, डॉ.श्रीराम नेने यांच्याशी लग्न करून परदेशात जाण्याच्या निर्णयाने मी खूप आनंदी आहे. मी जे करते ते मला आनंदित करते. माज्या कोणत्याही निर्णयाचा मला कधीही पश्चात्ताप होत नाही. मला अभिनय, नृत्य आणि माज्या कामाशी संबंधित सर्व गोष्टी आवडतात. आणि जर लोकांनी तुम्हाला स्टार मानले तर ते सर्व बोनस आहे. देवा, मी लोकांच्या नजरेपासून दूर जात आहे, असे मला कधीच वाटले नाही. करिअरच्या शिखरावर असताना मी लग्न केले.



माधुरीने तिच्या लग्नाबद्दलही सांगितले, ती म्हणाली- मला वाटले की भेटलेली व्यक्ती माझ्यासाठी योग्य आहे. हा माणूस आहे ज्याशी मला लग्न करायचे आहे आणि मी या माणसाशी लग्न करणार आहे, कारण प्रत्येकजण स्वतःसाठी स्वप्न पाहतो. मीही घर, नवरा, कुटुंब आणि मुलांची स्वप्ने पाहिली होती. मला मुलं आवडतात. म्हणून, मुले होणे हा त्या स्वप्नांचा एक मोठा भाग होता.

**कधीही पश्चात्ताप झाला नाही - माधुरी**

मुलाखतीदरम्यान जेव्हा माधुरीला विचारण्यात आले की, बॉलीवूडमध्ये व्यतीत केलेल्या आयुष्याची तिला आठवण येते का, तेव्हा माधुरी म्हणाली - जेव्हा लोक म्हणतात, अरे तू इंडस्ट्रीपासून दूर होतीस, तेव्हा तुला हे सर्व मिस केले नाही? म्हणून मी म्हणते, 'नाही, मी चुकले नाही कारण त्यावेळी मी माझे स्वप्न जगत होते.

माधुरी दीक्षितने 1999 मध्ये डॉ. श्रीराम नेनेंशी लग्न केले होते. माधुरीने 2005 मध्ये त्यांच्या दुसऱ्या मुलाला जन्म दिला. त्याच वेळी, 2007 मध्ये माधुरीने आजा नचले या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पुनरागमन केले. ती सद्धयाही बॉलीवुडमध्ये कार्यरत दिसते.

■ ■ ■

# काजोलला शाहरुखची बहीण करू इच्छित होते मन्सूर



निर्माते मन्सूर खान यांनी नुकतेच 'जोश' चित्रपटाविषयी सांगितले. त्यांनी सांगितले की, या चित्रपटात शाहरुखच्या बहिणीच्या भूमिकेत काजोलला कास्ट करायचे होते, पण ते दोघेही रोमँटिक कपल म्हणून आधीच प्रसिद्ध झाले होते. अशा परिस्थितीत मन्सूर यांनी ऐश्वर्या राय बच्चनला शाहरुख खानच्या बहिणीच्या भूमिकेत कास्ट केले.

इंडिया नाऊ अँड हाऊशी संभाषणात, मन्सूर खान यांनी जोश चित्रपटात शाहरुख आणि ऐश्वयार्ला भाऊ आणि बहीण म्हणून कास्ट करण्याचा निर्णय का घेतला हे स्पष्ट केले. मन्सूर खान म्हणाले, 'जोश या चित्रपटात भावा-बहिणीची भूमिकाही होती, जी शाहरुख खान आणि ऐश्वर्याने साकारली होती.

मात्र, मला ऐश्वर्याऐवजी काजोलला कास्ट करायचे होते. मी तिला चित्रपटाची कथाही सांगितली. पण काजोलने कथा ऐकताच ती रागाने उठली आणि निघून गेली. मग मी तिला विचारले, तू फिल्म करत आहेस का? तर ती म्हणाली नाही मला मॅक्सची भूमिका हवी आहे आणि मग ती निघून गेली.

मन्सूर खान म्हणाले, 'काजोल आणि शाहरुख खान यांनी यापूर्वी 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' व्यतिरिक्त इतर अनेक चित्रपट केले होते, ज्यामुळे त्यांची रोमँटिक जोडी म्हणून प्रतिमा निर्माण झाली होती. त्यामुळे अशा परिस्थितीत काजोलला बहिणीच्या भूमिकेत कास्ट करणे चुकीचे ठरले असते.

मन्सूर खानच्या म्हणण्यानुसार, त्यांना भीती होती की मॅक्सच्या बहिणीची भूमिका कोणी करू इच्छित नाही, परंतु ऐश्वयार्ने आनंदाने हा चित्रपट करण्यास होकार दिला. ती पूर्णपणे व्यावसायिक होती. तिने कधीही तक्रार केली नाही किंवा कॅमेरा कुठे असावा असे सांगितले नाही.

मन्सूर खान पुढे म्हणाले, 'मॅक्सच्या भूमिकेसाठी मी नेहमीच शाहरुखचा विचार करत होतो आणि आमिरला चंद्रचूर सिंगच्या भूमिकेत कास्ट करायचे होते. जेव्हा मी आमिरला कथा सांगितली तेव्हा त्याला वाटले की तो मॅक्सची भूमिका करेल. मग मी शाहरुखशी बोललो, तो खूप खुश झाला. पण जेव्हा मी त्याला विचारले, तू चित्रपट करतोस का? तो म्हणाला की तो करणार नाही, कारण त्याला माहित आहे की मी आमिरला चित्रपटात घेत आहे. मात्र, तसे नव्हते, मला चित्रपटात फक्त शाहरुखलाच कास्ट करायचे होते.

जोश हा चित्रपट 2000 साली प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात शाहरुख आणि ऐश्वर्या जुळे भाऊ-बहीण झाले. शाहरुखचे डोळे ऐश्वयार्सारिखे दिसावेत म्हणून मन्सूर खानने शाहरुखला संपूर्ण चित्रपटात कॉन्टॅक्ट लेन्स घालायला लावल्या.

■ ■ ■

# सना म्हणते.. आमचा छोटा पाहुणा येणार



बिग बॉस फेम सना खान पुन्हा एकदा आई होणार आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तिने ही माहिती दिली. गरोदरपणाची बातमी समोर आल्यापासून सनावर तिच्या मित्र आणि चाहत्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आम्ही तुम्हाला सांगतो, सना खान आणि तिचा पती मुफ्ती अनस सईद हे आधीच एका मुलाचे पालक आहेत.

सना खानने तिच्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर करून तिच्या दुसऱ्या गर्भधारणेची घोषणा केली. व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे- 'अल्हमदुलिल्लाह, या अल्लाह, मला तुज्या (शक्तीने) एक चांगले मूल दे. अर्थात तुम्ही प्रार्थना ऐकणारे आहात. हे माज्या अल्लाह, आम्हाला आमच्या भागीदारांमध्ये आणि आमच्या मुलांमध्ये शांती दे आणि आम्हाला अल्लाहचे भय बाळगणारे बनवा.'

सनाला 'बिल्लो रानी' या डान्स नंबरवरून ओळख मिळाली. ती सलमान खानसोबत 'जय हो' चित्रपटातही दिसली होती. याशिवाय सना 'वजाह तुम हो' आणि 'टॉयलेटः एक प्रेम कथा'मध्येही दिसली आहे.

सना 'बिग बॉस 6' ची फायनलिस्टही राहिली आहे. मात्र, त्यानंतर एके दिवशी तिने अचानक इंडस्ट्री सोडण्याचा निर्णय घेऊन सर्वांनाच चकित केले. सनाने ऑक्टोबर 2020 मध्ये चित्रपटसृष्टी सोडण्याची घोषणा केली होती. यानंतर तिने 21 नोव्हेंबर 2020 रोजी सुरत येथे इस्लामिक विद्वान मुफ्ती अनस सय्यद यांच्याशी विवाह केला. 2023 मध्ये सनाने तिच्या पहिल्या मुलाचे, सय्यद तारिक जमीलचे स्वागत केले.

■ ■ ■

# एका चुकीमुळे हातून गेला मणिरत्नमचा बॉम्बे

1995 मध्ये प्रदर्शित झालेला बॉम्बे हा चित्रपट प्रचंड गाजला होता. मणिरत्नम दिग्दर्शित या चित्रपटात मनीषा कोईराला आणि अरविंद स्वामी मुख्य भूमिकेत होते. मात्र, अरविंदच्या आधी ही भूमिका साऊथ स्टार चिया विक्रमला दिली जाणार होती. त्याने या चित्रपटासाठी ऑडिशन देखील दिले, परंतु जेव्हा त्याला बंद कॅमे?यासमोर अभिनय करण्यास सांगितले तेव्हा त्याने स्पष्टपणे नकार दिला. या चुकीमुळे चियान विक्रमला चित्रपटात कास्ट करण्यात आले नाही, यासाठी तो 2 महिने रडत राहिला.

अलीकडेच, सिद्धार्थ काननशी झालेल्या संवादादरम्यान चियान विक्रमला विचारण्यात आले की, त्याने मणिरत्नमचा बॉम्बे चित्रपट नाकारला होता का? यावर अभिनेता म्हणाला, नाही, मी तो चित्रपट सोडला नाही. माझ्याकडून चूक झाली होती. त्यांनी मला ऑडिशनसाठी बोलावलं, पण त्यांच्याकडे व्हिडिओ कॅमेरा नव्हता.

त्यांच्याकडे फक्त स्थिर कॅमेरा होता. तेव्हा त्यांनी मला अभिनय करायला सांगितले. मुलीकडे बघा, ती तिथून पळत आहे. पण मी थिजून गेलो होतो. ते मला म्हणाले, थांबू नकोस, चालू ठेव, पण मी खूप गोंधळलो. त्यांच्याकडे कॅमेरा नव्हता. व्हिडिओ कॅमेरा नव्हता, या वाईट अनुभवानंतर चियान विक्रमला तो चित्रपट मिळू शकला नाही , याचे त्याला खूप खेद आहे . यावर तो म्हणाला, मणिरत्नम सरांसोबत काम करणं हे माझं स्वप्न होतं. त्या चित्रपटानंतर मी निवृत्त होण्यास तयार होतो. त्या चित्रपटानंतर मला काहीही नको होते.

■ ■ ■

# पुष्पा-2 वर बहिष्काराची धमकी



दाक्षिणात्य चित्रपट पुष्पा-2 विरोधात हरियाणाच्या हिस्सार जिल्ह्यातील एका गावात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीत धार्मिक भावना दुखावल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी अद्याप कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही.

या प्रकरणाचे तपास अधिकारी गौतम कुमार सांगतात की, नुकतीच तक्रार आली आहे. वरिष्ठांशी चर्चा करूनच पुढील कार्यवाही केली जाईल. हिसार येथील जुगलान येथील रहिवासी कुलदीप कुमार यांनी ही तक्रार दाखल केली आहे.

पैशासाठी एका विशिष्ट धमार्चा जाणीवपूर्वक अपमान करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे कुलदीपने म्हटले आहे. हा चित्रपट असाच सुरू राहिला तर तो हिसार (हरियाणा) येथे प्रदर्शित होऊ देणार नाही, असे कुलदीपने सांगितले.

कुलदीप कुमारने तक्रारीत लिहिले आहे, 'पुष्पा 2 द रुल' या चित्रपटाचा ट्रेलर रविवारी, १७ नोव्हेंबर रोजी पाटणा येथील गांधी मैदानावर लाँच करण्यात आला. हा चित्रपट 5 डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे, या कार्यक्रमाला अभिनेता अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदान्ना यांनीही हजेरी लावली होती. मी पाहिले की ट्रेलरमध्ये मां कालीसारखे चित्र दाखवले आहे.

अभिनेता अल्लू अर्जुन अर्धनारीश्वर अवतारात दिसला, त्यामुळे धर्माच्या श्रद्धा दुखावल्या आहेत. जर हा सीन चित्रपटातून हटवला नाही तर 'पुष्पा 2 द रुल' हिसार, हरियाणात प्रदर्शित होऊ देणार नाही. तक्रारीत अभिनेता अल्लू अर्जुनचा ईमेल आयडी आणि कायमचा पत्ता देण्यात आला आहे.

■ ■ ■

# ऋषी कपूर यांना पाहायचे होते रणबीरचे लग्न



दिवंगत बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते ऋषी कपूर यांचे ३० एप्रिल २०२० रोजी निधन झाले. आता अलीकडेच रिद्धिमा कपूर साहनीने तिचे वडील ऋषी कपूर यांच्या दोन शेवटच्या इच्छांबद्दल सांगितले. ती म्हणाली की त्यांच्या वडिलांना रणबीरचे लग्न आणि त्याचे वांद्रे येथील घर पूर्णपणे तयार झालेले पाहायचे होते.

झूमसोबतच्या संभाषणात रिद्धिमा कपूर साहनी म्हणाली, 'पप्पाच्या शेवटच्या दोन इच्छा होत्या, पहिली रणबीरचं लग्न आणि दुसरी घराची तयारी. आता घर जवळजवळ तयार झाले आहे आणि रणबीरचेही लग्न झाले आहे. त्यांच्या दोन्ही इच्छा पूर्ण होत असताना आम्ही सगळेच भावूक झालो होतो. ते इथे आमच्यासोबत असण्याची माझी मनापासून इच्छा आहे, पण मला वाटते की देवाच्या इतर योजना होत्या.

रिद्धिमा पुढे म्हणाली, 'माझे लग्न मोठ्या थाटामाटात व्हावे अशी त्यांची नेहमीच इच्छा होती आणि त्यांनी ते पूर्ण केले. पण जेव्हा रणबीरच्या लग्नाची वेळ आली तेव्हा रणबीरने स्पष्टपणे सांगितले की, कुटुंबात आधीच मोठे लग्न झाले आहे, त्यामुळे आता माझे लग्न साधेपणाने व्हावे अशी माझी इच्छा आहे. आलिया आणि रणबीर दोघेही खूप साधे लोक आहेत.

याशिवाय रिद्धिमा साहनीनेही आलिया भट्टचे कौतुक केले. ती म्हणाली, 'कठीण काळात आलिया कुटुंबाच्या पाठीशी उभी राहिली. जेव्हा माझे वडील ऋषी कपूर उपचारासाठी गेले तेव्हा माझ्या आजीचे निधन झाले तेव्हा आलिया माझ्यासोबतच राहिली नाही तर तिने वैयक्तिकरित्या सर्व व्यवस्था केली.

ऋषी कपूर रक्ताच्या कर्करोगाने ग्रस्त होते. न्यूयॉर्कमध्ये दीर्घकाळ उपचार सुरू होते. त्यानंतर 2019 मध्ये ते भारतात परतले. 30 एप्रिल 2020 रोजी त्यांचे निधन झाले. ■ ■ ■

# बीग बॉस -18 मध्ये हिना खान पाहुणीच्या भूमिकेत दिसणार

'बिग बॉस 18' मध्ये अभिनेत्री हिना खान खास पाहुणी म्हणून दिसणार आहे. आज म्हणजेच 22 नोव्हेंबरला ती 'वीकेंड का वार' या एपिसोडसाठी शूट करणार आहे. मजबूत व्यक्तिमत्व आणि प्रेरणादायी प्रवासासाठी ओळखली जाणारी हिना घरातील स्पर्धकांना प्रेरणा आणि सकारात्मकतेचा संदेश देईल. हिना आणि सलमान खानमध्ये घट्ट नाते आहे. 'बिग बॉस 11' दरम्यान सलमानने तिच्या दमदार व्यक्तिमत्त्वाची अनेकदा प्रशंसा केली होती. त्या हंगामात हिनाने आपल्या खेळाने आणि स्पष्टवक्ते शैलीने सर्वांना प्रभावित केले. 'बिग बॉस'च्या मंचावर सलमान आणि हिनाला पुन्हा एकदा एकत्र पाहणे हा प्रेक्षकांसाठी खास क्षण असेल.



काही महिन्यांपूर्वी हिनाने तिच्या स्टेज-3 ब्रेस्ट कॅन्सरबद्दल सर्वांसमोर खुलासा केला होता. यानंतर तिने आपला प्रवास सोशल मीडियावर शेअर केला. कठीण परिस्थितीचा सामना करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी तिची कथा प्रेरणादायी आहे. प्रेक्षकांना आशा आहे की ती आपल्या अनुभवांनी घरातील स्पर्धकांना प्रेरित करेल आणि शोमधील चढ-उतारांना सामोरे जाण्यासाठी सल्ला देईल.

हिनाचे बिग बॉसशी जुने आणि खास नाते आहे. ती 'बिग बॉस 11' मध्ये फर्स्ट रनर अप होती. तिचा आत्मविश्वास आणि गेम प्लॅनने चाहत्यांची मने जिंकली. यावेळी पाहुणी म्हणून तिचे पुनरागमन प्रेक्षकांसाठी खास असणार आहे.

मात्र, हिना अलीकडेच फॅशन शोमध्ये रॅम्प वॉक करताना दिसली आणि तिच्या धाडसाचे खूप कौतुक झाले. पण तिचे पडद्यावरचे हे पहिलेच पुनरागमन असेल. निर्मात्यांना आशा आहे की 'बिग बॉस 18' मधील तिची उपस्थिती केवळ शोला खास बनवणार नाही तर त्याच्या चाहत्यांसाठी एक प्रेरणा म्हणूनही काम करेल.

■ ■ ■